सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १० डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ३४ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### पश्चिम बंगालमध्ये उभारणार बाबरी मशीद

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये बाबरी मशीद उभारली जाईल, अशी घोषणा तृणमूल काँग्रेसचा आमदार हुमायूं कबीरने केली. मुर्शिदाबाद परिसरातील बेलडांगा येथे नवीन बाबरी मशीद उभारली जाईल. बंगालमध्ये ३४ टक्के मुस्लिम आहेत. मान ताठ ठेवून त्यांना जगण्याची ÷इच्छा आहे. त्यांच्या अधिकारासाठी मला एक प्रस्ताव ठेवायचा आहे. पैशांची कोणतीही चिंता नाही. बेलडांगा तसेच बहराममधील मदरशांचे अध्यक्ष व सचिवांसह १०० पेक्षा जास्त जणांची बाबरी मशीद ट्रस्ट स्थापन केली जाईल. या ट्रस्टद्वारे बेलडांगा परिसरात दोन एकर जमिनीवर बाबरी मशीद उभारण्याचे काम सुरू केले जाईल, असे हुमायूं कबीरने सांगितले. हुमायूं कबीर मुस्लिम बहूल मुर्शिदाबाद जिल्हयाच्या भरतपूर विधानसभा मतदारसंघाचा आमदार आहे.

### ईव्हीएम-व्हीव्हीपॅटमधील मतांच्या पडताळणीत फरक नाही

**संभाजीनगर :** ७५ व्हीव्हीपॅट मशिनची ईव्हीएमसोबत केलेल्या पडताळणीत मतांमध्ये कोणताही फरक आढळला नसल्याचे नांदेड जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले, अशी माहिती अधिकाऱ्याने सोमवारी दिली. निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाच्या आधारे मतमोजणी आणि पडताळणी प्रक्रिया करण्यात आली. जिल्हयातील प्रत्येक मतदारसंघातील पाच मतदान केंद्रांवरील ईव्हीएममधील उमेदवारनिहाय मतांची पडताळणी व्हीव्हीपॅटसोबत करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले.

### बांगलादेशात चिन्मय प्रभू यांच्यावर आणखी एक खटला

**ढाका :** बांगलादेशातील चितगाव येथे हिंदू धर्मगुरू चिन्मय प्रभू आणि त्यांच्या समर्थकांवर न्यायालयाच्या आवारात झालेल्या हाणामारीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ढाका ट्रिब्यूननुसार, २६ नोव्हेंबर रोजी कोर्टातून परतत असताना चिन्मय कृष्ण दास यांच्या समर्थकांनी इस्लामिक वकिली संघटना हेफाजत-ए-इस्लाम बांगलादेशचा कार्यकर्ता ईनामुल हक यांच्यावर हल्ला केला.



हिमाचल प्रदेशच्या शिमला आणि चारधाम यात्रेचे ठिकाण असलेल्या बद्रीनाथ व केदारनाथच्या उंच पर्वतीय भागांमध्ये सोमवारी यावर्षीची पहिली बर्फवृष्टी झाली. सकाळपासून सुरू असलेल्या बर्फवृष्टीमुळे वातावरण आल्हाददायक तर झाले, पर्यटकांचा आनंदही द्विगुणित झाला होता. इन्सेट : केदारनाथ मंदिर

# हिवाळी अधिवेशन १६ पासून नागपुरात

## महायुती सरकारने जिंकला विश्वास प्रस्ताव

◆ **मुंबई, ९ डिसेंबर**

महायुती सरकारची सोमवारी बहुमत चाचणी घेण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने विधानसभेत आवाजी मतदानाने सहजपणे विश्वासदर्शक प्रस्ताव जिंकला. विशेष अधिवेशन संस्थगित करण्याची घोषणा करतानाच विधानसभा अध्यक्षांनी हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून नागपूर येथे होणार असल्याचे जाहीर केले.

शिवसेनेचे आमदार उदय सामंत, राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील, भाजपाचे संजय कुटे आदींनी सरकारचा विश्वासदर्शक प्रस्ताव मांडला. तो आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. सभागृहाने हा विश्वासदर्शक प्रस्ताव बहुमताने मंजूर केला, अशी घोषणा विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केली. २८८ सदस्यांच्या विधानसभेत महायुतीकडे २३० आमदारांचे प्रचंड मोठे संख्याबळ असल्याने बहुमत चाचणी ही केवळ औपचारिकता राहिली होती.

**विशेष अधिवेशन संस्थगित**

सरकारची स्थापना आणि नवर्निवाचित आमदारांना शपथ देण्याच्या प्रक्रियेसाठी म्हणून आयोजित करण्यात आलेले विधिमंडळाचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन आज संस्थगित करण्यात आले. याबाबतचा राज्यपालांचा संदेश विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सभागृहात वाचून दाखविला. त्यानंतर राष्टगीताने अधिवेशनाची सांगता झाली.

◄*(तभा वृत्तसेवा)*

# जॉर्ज सोरोसचे सोनिया गांधींशी संबंध

### राज्यसभेत गोंधळ कामकाज स्थगित

◆ **नवी दिल्ली, ९ डिसेंबर**

अमेरिकेन उद्योगपती जॉर्ज सोरोस यांचे काँग्रेस पक्ष आणि त्या पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्याशी संबंध असल्याच्या बातम्या काही दैनिकांत येत आहेत. यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याची भीती वर्तवत, या मुद्यावर तातडीने चर्चा घेण्याची मागणी भाजपा सदस्यांनी केल्यामुळे आज राज्यसभेत गदारोळ झाला. यामुळे सभागृहाचे कामकाज आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.



आज शून्य तासात भाजपा सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला. त्यावर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आक्षेप घेतला. यामुळे दोन्ही बाजूंच्या सदस्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप झाले. सत्ताधारी सदस्य सोरोस मुद्यावर चर्चेची मागणी करीत होते, तर विरोधी सदस्य अदानी मुद्यावर. त्यामुळे सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. गोंधळामुळे आज राज्यसभेत शून्य तसेच प्रश्नोत्तराचा होऊ शकला नाही.

काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी विविध मुद्यांवर नियम २६७ नुसार दिलेल्या स्थगनप्रस्तावाच्या सूचना अध्यक्ष धनकड यांनी फेटाळून लावल्या. सभागृहाचे कामकाज चालू द्यायचे नाही, असे सत्तापक्षाने ठरवलेले दिसते, असा आरोप करत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे म्हणाले की, असे करून तुम्ही लोकशाहीची हत्या करीत आहात. खडगे यांच्या विधानावर धनकड यांनी आक्षेप घेतला. तुम्हाला दिलेल्या संधीचा तुम्ही दुरुपयोग करीत आहे, असा आरोप त्यांनी केला.

देशातील एका राजकीय पक्षाचे काही परकीय शक्तींशी संबंध असल्याच्या बातम्या येत आहेत, यामुळे आमच्या पक्षातील सदस्य अस्वस्थ आहे. या मुद्यावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे, असे सत्ता पक्षनेते जे. पी. नड्डा यांनी म्हटले. या मुद्यावर आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाचे नाव घेतले नाही.

देशातील राष्ट्रविरोधी शक्तींचा चेहरा समोर आला पाहिजे, असे भाजपाचे राधामोहन अग्रवाल म्हणाले. सोनिया गांधी आणि जॉर्ज सोरोस यांच्याबाबत ज्या बातम्या येत आहेत, त्या धक्कादायक आणि देशाच्या दृष्टीने धोकादायक आहे, असे घनश्याम तिवाडी म्हणाले. ◄*(तभा वृत्तसेवा)*

### चार नवनिर्वाचित सदस्यांना शपथ

**मुंबई :** विशेष अधिवेशनात सोमवारी चार नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास निळकंठ कोळंबकर यांनी सदस्यपदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली. शपथ घेतलेल्या सदस्यांमध्ये जयंत राजाराम पाटील, विनय विलासराव कोरे (सावकार), सुनील शंकरराव शेळके, उत्तम शिवदास जानकर यांचा समावेश आहे. या विशेष अधिवेशनाच्या कालावधीत एकूण २८३ सदस्यांनी सदस्यपदाची घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह सदस्य उपस्थित होते. ■




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# लोकअदालत होण्यापूर्वीच थकबाकीदार भरताहेत मिळकतकर

**आतापर्यंत २५० जणांकडून ६५ लाख जमा** | **महापालिकेत १४ डिसेंबरला लोकअदालत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

महापालिका प्रशासनाने थकीत मिळकतकर वसुलीसाठी १४ डिसेंबर रोजी लोक अदालतीचे आयोजन केले आहे. यासंदर्भातील नोटिसा प्राप्त होताच आतापर्यंत सुमारे २५० मिळकतदारांनी लोक अदालतीच्या तारखेची वाट न पाहता कर भरणे पसंत केले आहे. यामुळे महापालिकेच्या तिजोरीत ६५ लाखांचा महसूल जमा झाला आहे.

महापालिकेचा मिळकतकर मोठ्या प्रमाणात थकीत आहे. त्याच्या वसुलीसाठी यापूर्वीच्या धोरणानुसार थकीत मिळकतदारांचे नळ कनेक्शन तोडणे, मालमत्ता सील करणे आदी स्वरूपाची कारवाई केली जात होती. खुल्या जमिनीबाबत लाखाहून अधिक रक्कम थकीत ठेवणाऱ्यांच्या मालमत्ता जप्त करून त्यांचा लिलाव करण्याची कटू कारवाई देखील काही वर्षांपूर्वी करण्यात आली होती. यंदाच्या वर्षी मात्र महापालिकेने थकीत मिळकतकर प्रभावीपणे वसूल करण्यासाठी लोकअदालतीचा पर्याय निवडला आहे.

**प्रतिसाद न दिल्यास बोजा चढविण्याची कारवाई**

थकीत मिळकतकर वसूल करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीला प्रतिसाद न दिल्यास संबंधित मिळकतदारांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात येणार आहे. तत्पूर्वी जाहीर प्रसिद्धीकरण करून अशांची नावे जाहीर करण्यात येणार आहे व त्यांना कर भरण्याची शेवटची संधी देण्यात येणार आहे. यालादेखील प्रतिसाद न दिल्यास मालमत्तेवर बोजा चढवून पुढील टप्प्यात लिलावाची कटू कारवाई करण्यात येणार आहे.

काही महिन्यांपूर्वी महापालिकेतर्फे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यासंदर्भातील माहिती मिळकतदारांपर्यंत न पोहोचल्याने या लोकअदालतीला थंडा प्रतिसाद मिळाला होता. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होताच महापालिका प्रशासनाने आपला मोर्चा पुन्हा एकदा थकीत मिळकतकर वसूलीकडे वळविला आहे.

महापालिका प्रशासनाने थकीत मिळकतदारांना दिलासा मिळावा यासाठी १४ डिसेंबर रोजी लोकअदालतीचे आयोजन केले आहे. २५ हजारापेक्षा जास्त कर थकीत ठेवणाऱ्या सुमारे २५ हजार मिळकतदारांना लोक अदालतीच्या नोटीसा देण्याचे काम महापालिका प्रशासनातर्फे सुरू आहे. अशा नोटिसा प्राप्त झालेल्या सुमारे २५० मिळकतदारांनी लोक अदालतीच्या १४ डिसेंबर तारखेची वाट न पाहता तत्पूर्वीच कर भरणार करण्याचे सौजन्य दाखवले आहे. परिणामी गत आठवडाभरात महापालिकेच्या तिजोरीत ६५ लाखांचा महसूल जमा झाला आहे. दरम्यान, १४ डिसेंबर रोजी महापालिकेच्या आवारात लोक अदालत होणार आहे. या लोकदालतीचा थकीत मिळकतदारांनी लाभ घेऊन महापालिकेची कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात आली आहे.



# शटडाऊनमुळे शहराला एक दिवस उशिरा पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

सोलापूर शहराचा पाणीपुरवठा वीजविषयक कामांमुळे बुधवार दिनांक ११ डिसेंबरपासून एका रोटेशन करिता एक दिवस उशिरा होणार आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस १३२ केव्ही मंद्रूप सबस्टेशन मधील ३३ केव्ही ब्रेकर सर्व्हिसिंग/ओव्हर हॉलिंग करणे व लाईन मेन्टेनन्स करण्याकरीता बुधवार, दि.११ डिसेंबर रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ पर्यंत शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे टाकळी हेड वर्क्स ते सालापूर येथील पंप हाऊसकरीता १३२ केव्ही मंद्रूप सबस्टेशनहून येणारी ३३ केव्ही लाईन बंद राहणार आहे. या कामामुळे टाकळी हेड वर्क्स येथून पाण्याचा उपसा कमी होणार आहे. परिणामी बुधवार, दि.११ डिसेंबर रोजीचा शहरातील काही भागातील पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने व तसेच १ रोटेशन पाणीपुरवठा पुढे जाणार आहे. तरी कृपया नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य अभियंता विभागाने केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अचानक रिक्षा वळाल्याने दुचाकीस्वार पडून जखमी

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

रेल्वे स्टेशन चौकीजवळ रिक्षाचालकाने त्याची रिक्षा अचानकपणे वळविल्याने त्याच्या बाजूने जाणारा दुचाकीस्वार पडून जखमी झाला. ऋषिकेश दत्ता माळी (वय १९, रा. कासेगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमी दुचाकीस्वाराचे नाव आहे. सोमवारी दुपारी पावणे एकच्या सुमास ऋषिकेश हा सात रस्ता ते रेल्वे स्टेशन या रस्त्यावरून दुचाकीवरून जात होता. त्यावेळी स्टेशन चौकीजवळ बाजूने जाणारी रिक्षा अचानकपणे वळाल्यानो माळी याच्या दुचाकीला धडक लागून दुचाकीवरून माळी खाली पडला. त्यामध्ये माळीला मुका मार लागल्याने त्यास उपचारसाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मोबाईलवर फोटो काढण्याच्या कारणावरून दोन महिलांना मारहाण

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

मोबाईलवरून फोटो काढण्याच्या कारणावरून दोन महिलांना मारहाण करून जखमी करण्यात आले. पार्वती रामसिंग शिवशिंगवाले (वय ५४, रा. कालभैरव मठ, बापूजी नगर, सोलापूर), अनिता किसनसिंग परदेशी (वय ३५, रा. कालभैरव मठ) अशी जखमीं महिलांची नावे आहेत. सोमवारी सकाळी ८ च्या सुमारास तु आमचे मोबाईलवरून फोटो का काढतो असे विचारले असता तुला काय करायचे असे म्हणून विराज शिवशिंगवाले व इतर पाचजणांनी मिळून पार्वती व अनिता यांना लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये पार्वती व अनिता यांच्या सर्वांगाच मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती कारणावरून महिलांकडून महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

घरगुती कारणावरून महिलांकडून महिलेला मारहाण करून जखमी करण्यात आले. प्राजक्ता समाधान कांबळे (वय २२, रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. ८ डिसेंबर रोजी रात्री राहत्या घरी घरगुती वादातून अपर्णा कसबे व गोकुळा कांबळे यांनी प्राजक्ताला ढकलून देऊन लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये प्राजक्ता यांच्या कमरेस व सर्वागास मुका मार लागून त्या जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### शेकोटीत भाजून ९ वर्षाची बालिका जखमी

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

शेकोटीतील आगीचा भडका उडून ९ वर्षाची बालिका भाजून जखमी झाली.बुशरा एजाज तांबोळी (वय ९, रा. ढोकी, जि. धाराशिव) असे जखमी बालिकेचे नाव आहे. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास ढोकी येथे राहत्या घराजवळ बुशरा ही दूध घेण्यासाठी गेली होती. त्यावेळी दुकानाच्या बाजूला शेकोटे लावलेली होती. त्या शेकोटीतील आगीचा अचानक भडका उडाल्याने बुशरा हिची पाठ भाजून ती जखमी झाली. तिला धाराशिव येथे उपचार करून पुढील उपचारासाठी वडील एजाज यांनी सोमवारी दुपारी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चाटला साडी सेंटर येथून कपड्याच्या मालाचे गाठोड्याची चोरी

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

शहरातील भवानी पेठेतील चाटला साडी सेंटर येथून कपडे असलेले गाठोडे चोरून नेले. हा प्रकार पाच डिसेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास घडला. याबाबत आकाश सिध्देश्वर सोनवणे (वय २६,रा. राजेंद्र चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भवानी पेठेतील चाटला साडी सेंटरमध्ये विक्रीसाठी १२ पिस लेडीज टॉप व १६८ लेडीज प्लाझो असे कपडे आणण्यात आले होते. ते कपड्याचे गाठोडे दुकानाच्या परिसरात ठेवले होते. ते अज्ञाताने चोरून नेले. त्यातील कपड्यांची किंमत ४४ हजार ४० रुपये इतकी असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. पोलिस हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

# शहरात वेगवेगळ्या ठिकाणी आत्महत्येच्या पाच घटना

## विडी घरकुलमधील म्हाडा विहिरीत एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

शहरातील जुने विडी घरकुलमधील सागर चौकाजवळील म्हाडा विहिरीत एकाने आत्महत्या केल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. नागेश पेंटप्पा कोंडा (वय ४७, रा. नविन विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास सागर चौकाजवळील म्हाडा विहिरीतील पाण्यावर नागेश कोंडा हे बेशुध्दावस्थेत तरंगत असताना मिळून आले. त्यामुळे त्यांना एमआयडीसी पोलिस ठाण्याडिल पोलिस हवालदार एस एन शेख यांनी पाण्यातून बाहेर काढून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अक्षय इमडे यांनी कोंडा यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### प्रॉपर्टीच्या वादातून तरूणीचा प्रयत्न

शहरातील भारतरत्न इंदिरा नगर मध्ये राहणाऱ्या तरूणीने प्रॉपर्टीच्या वादातून गोळ्या खाऊन आत्म हत्येचा प्रयत्न केला. धानम्मा धानप्पा उटगे (वय २७) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरूणाचे नाव आहे. सोमवारी सकाळी ११ च्या सुमारास राहत्या घरी धानम्मा हिने प्रॉपर्टीच्या वादातून घरातील ३० ते ३५ गोळ्या खाल्या. त्यामुळे धानम्मा हिस त्रास होऊ लागल्याने तिला भाऊ शिवयोगी यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलिस नोंद करण्यात आली आहे.

### सडा मारण्याचा पिवळा कलर पिऊन प्रयत्न

सडा मारण्याचा पिवळा कलर पिऊन आत्म हत्येचा प्रयत्न करणाऱ्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिरूपती रामय्या बुधाराम (वय ५७, रा. नविन विडी घरकुल, कुंभारी) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी सकाळी पावणे नऊच्या सुमारास अज्ञात कारणावरून रहात्या घराबाहेर तिरूपती यांनी अंगणात सडा मारण्याचा पिवळा कलर पाण्यात घालून प्राशन केला. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने पत्नी गिता बुधाराम यांनी तिरूपती यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### विषारी औषध प्राशन करून तरूणाचा प्रयत्न

अज्ञात कारणावरून तरूणाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

रविंद्र शंकर चव्हाण (वय ३२, रा. मुस्ती, जि. सोलापूर सध्या रा. म्हैसगाव, ता. माढा) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. ८ डिसेंबर रोजी रात्री म्हैसगाव येथील मालकाच्या शेतात फवारणी करण्यासाठी रविंद्र चव्हाण हा गेला असता अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे चव्हाण यास माढा येथील रुग्णालयात उपचार सुरु पुढील उपचारासाइी सुनिल राठोड यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### रेल्वे स्टेशनजवळील शिवानंद लॉजमध्ये बिहारच्या तरूणाची

शहरातील रेल्वे स्टेशनजवळील शिवानंद लॉजमध्ये बिहारच्या तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. सरफराज आलम शेख (वय २६, रा. शेरपूर सोंधा, किशनगंज, जि. बिहार) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. सोमवारी सकाळी ९ च्या पूर्वी रेल्वे स्टेशनजवळील शिवानंद लॉजमधील रूम नं. ११ मध्ये अज्ञात कारणावरून सरफराज शेख याने टॉवेलच्या सहाय्याने लोखंडी अँगलला गळफास घेतल्याचे लॉजमधील कर्मचाऱ्याला दिसून आले. त्यामुळे कर्मचाऱ्याने याबाबत सदर बझार पोलिस ठाण्याला कळविले असता पोलिस हवालदार एस एन शेख यांनी घटनास्थळी येऊन शेख यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. पुजा लवटे यांनी शेख यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# विश्वनाथ करवा यांच्या स्मृती दिनानिमित्त सामाजिक संस्थाना निधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

नीलकंठ बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. विश्वनाथ करवा यांचा ९ वा स्मृती दिन आज बँकेच्या सभागृहात साजरा करण्यात आला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त करवा परिवारकडून राजस्थानी विकास मंडळ या संस्थेस रु.२१ हजार व प्रवीण तळे यांना रु २५ हजार रुपये धनादेश देवून कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री मार्कंडेय रुग्णालयाचे चेअरमन सत्यनारायण बोल्ली यांचे हस्ते गौरव करण्यात आला.



राजस्थानी विकास मंडळाकडून दरवर्षी नेत्र शिबीर घेतले जाते व गरजू व गरीब लोकांना भिंग रोपणची शस्त्रक्रिया मोफत केली जाते. दि.१२ डिसेंबर रोजी ओम सच्चीतानंद वाचनालय येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. हे कार्य श्रीमती मिश्रीबाई गुलाबचंद तोष्णीवाल नेत्र पिढीच्या संयुक्त विद्यमाने होत आहे. ह्यात डॉ. नवनीत तोष्णीवाल यांचा मोठा सहयोग असतो.

यावेळी स्व. विश्वनाथ करवा यांच्या पत्नी नंदा करवा, निकिता करवा, नीलकंठ बँकेचे चेअरमन विजयकुमार उपाध्ये, व्हा. चेअरमन सी.ए. धनराज नोगजा, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, प्रख्यात बिल्डर अंकुर पंधे, किशोर चंडक, पवन सोनी, सुत व्यापारी संघ अध्यक्ष यल्लप्पा यलदी, राजस्थानी विकास मंडळाचे अध्यक्ष माणिकचंद डागा, सदस्य विजय जाजू, विधिज्ञ नितीन हबीब, नीलकंठ बँकेचे संचालक जमनादास भुतडा, चंद्रकांत तापडिया, शरद कालानी, सी.ए आनंद झंवर, सौ नंदा भट्टड, सचिन कोठारी तसेच व्यापारी महेश बँकेचे संचालक असीम सिंदगी, तुळशीदास भुतडा उपस्थित होते. सूत्रसंचालन मंजुषा गाडगीळ, आभार कौस्तुभ करवा यांनी मानले.



## काँग्रेस भवन येथे खा. प्रणिती शिंदे यांचा वाढदिवस साजरा

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा काँग्रेस प्रसिद्धी विभाग वतीने देशाच्या नेत्या सोनिया गांधी व खासदार प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त काँग्रेस भवन येथे वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ते सातलिंग शटगार यांच्या वतीने अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मोतीराम चव्हाण, सेवादलाचे माजी अध्यक्ष अशोक कलशेट्टी, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, जहांगीर शेख, बाळ दळवी, तिरुपती परकीपंडला, चिदानंद सुंटे, अप्पू शेख, शिवशंकर अजनाळकर, शंकर अण्णा नरोटे, धीरज खंदारे, आशुतोष अचूगटला आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर मिठाईचे वाटप करण्यात आले.

## निधन वृत्त

### सुदर्शन द्यावरकोंडा



**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

उद्योजक सुदर्शन नारायणराव द्यावरकोंडा यांचे ८ डिसेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ७६ होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, पत्नी, सुन व नातवंडे असा परिवार आहे.

### सोमशेखरय्या सालीमठ



**मैंदर्गी, दि. ९ डिसेंबर-**

येथील वेदमूर्ती सोमशेखरय्या महांतय्या सालीमठ (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मंगळवारी दुपारी १ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. गदग येथील पुट्टराज गवई संस्थेतील संगीत शिक्षक शिवचलकुमार सालीमठ व ग्रामपंचायतीचे विस्तार अधिकारी महांतेश सालीमठ यांचे वडील तर अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे ते बंधू होत.

### पुतळाबाई अलकुंटे



**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

येथील पुतळाबाई नागनाथ अलकुंटे (वय ९०) यांचे सोमवारी (दि.९) सायंकाळी आठच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या मागे मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंतयात्रा मंगळवारी (दि.१०) दुपारी एक वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. माजी स्थायी समिती चेअरमन कै. नागनाथ अलकुंटे यांच्या त्या पत्नी होत.

# स्मशानातील हिरवट, धूसर प्रकाशाने भयानकतेत भर

**८ डिसेंबर रोजी अखिल भाविक वारकरी संप्रदायिक मंडळ, संस्थेने 'विक्रमाचा घातांक क्ष' हा नाट्यप्रयोग सादर केला. या नाटकाचे लेखक - रविशंकर झिंगरे तर दिग्दर्शक अमोल देशमुख यांनी केले.**

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

आपण लहानपणा पासून ऐकत आलो विक्रम आणि वेताळ या गोष्टी. त्यावेळी गोष्ट या पलीकडे आपण लक्ष घालत होतोच असं नाही. पण कालौघात विसरून जातो आणि आपला 'विक्रम' कधी होतो कळतही नाही. आयुष्य जगताना कित्येक घटना आपल्या मनाविरुद्ध घडतात. त्या घटनेत कोण कोण असतील त्यांचा सूड घ्यावा, खून करून वाटेतला काटा दूर करावा असा विचार असतो त्यात आई-वडील, शिक्षक, संगे संबंधी सर्व असतात पण आपण काही करू शकत नाही. मनात वेताळ दबा धरून सतत प्रश्न विचारत असतो. जगताना नाती, प्रेम, संबंधीत लोक या विषयीची चीड, स्वतःची हतबलता यासह जगताना कित्येक वेळा मनात खुनाचा विचार येतो पण करू शकत नाही म्हणून त्या विचारांचा (वेताळाला) खून करून जगतो.

अशा मन, समाज, नातेसंबंध आणि वर्तणूक यांच्या गुंतागुंतीचे चित्रण म्हणजे हे नाटक. नाटक सुरू होते. स्मशानातील एका दृश्यावर. भुतंखेतं त्यांच्या हातात झोके खाणारं प्रेत. ई. समूह. आणि विक्रम आणि वेताळ गोष्टीला सुरुवात होते. विक्रमाच्या मनात आपण खून केला आहे, हाताला लागलेले रक्त धुवायचे आहे. वेताळाचा प्रश्न खून कुणाचा विक्रमाचे उत्तर नाही. शेवटी या विचारातून सुटण्यासाठी विक्रम वेताळाचा खून करतो. हे कथानक.

नेपथ्य-अमोल देशमुख, श्रावण डावरे. स्मशानात मोठ्या कापडी सुट्या विंगांचा उपयोग करून दाखवलेली झाडे, कोळ्याचे जाळे त्यात अडकलेले फुलपाखरू. मागे लेव्हल, मोडे इ. प्रतिकात्मक वस्तूंचा वापर करून सुटसुटीत पणा आणला आणि कलाकारांना मोकळेपणाने हालचालींना जागा मिळाली. सुरवातीला धूर पसरवून गूढ वातावरण निर्माण केले. नेटके नेपथ्य. पार्श्वसंगीत जैदहसन शेख-संगीतात स्मशानात कुत्र्याचे भेसूर रडणे, बाळाचे रडणे या पार्श्वभूमीवर डफ, कडे, डग्याचा घुमारा भेसूर पणा वाढवत होता. मुखोपाध्यायच्या ऑफिसमधील कॉम्प्युटर कमीज, टेबल बेलचा आवाज वेताळ गोष्ट सांगताना पुढे घटना घडताना व्हायोलिन वरील देस रागाचा वापर, शिक्षकांनी हातावर मारलेल्या पट्ट्या, विक्रमची जगण्याची धडपड दाखवताना 'बॉम्बे' सिनेमातील तूही रे तूही रे तेरे बिना मैं कैसे जिऊ? 'गाण्याचा वापर, बाबाकडे गेल्यावर घुमणारे आणि मागे डफाचा आवाज. प्रसंगाच्या गांभिर्यात भर घालत होता. वेताळाच्या मरणसमई लावलेली सरगम. संगीताचा बारकाईने, खुबीने वापर केला आहे. प्रकाश योजना-उमेश बटाणे. स्मशानातील हिरवट, निळसर, धूसर प्रकाश भयानकतेत भर घालत होती. विक्रम आणि रचना प्रेम प्रसंग, आई-वडील, नातेवाईक, बाबावरील हिरवट स्पॉट, वेताळाच्या मरणप्रसंगी वापरलेला अंबर छान. रंगभूषा- ओम् प्रकाश श्रावण, नमिता देशमुख. रंगभूषा बाबत बराच विचार केला होता. विक्रमाच्या कपाळावरील नाम्, वेताळाच्या कपाळावरील खूण, रचनांचा किंचित गॉडी आणि पत्नीचा साधेपणा मेकपमधून स्पष्ट होत होता. वेताळाची उंची, पुढे आलेले दात पाठीचे कुबड, पायाची जाडी बोटे पण हाताची बोटे जाडी का नाहीत? डोळे अजून गडद केले असते, नाक रुंद फेंदारलेले दाखवले असते तर मेकपमधे छान भर पडली असती. आई- वडील, मुखोपाध्याय यांची रंगभूषा ठीक. वेशभूषा - मल्हार वेताळ आणि विक्रम प्रमुख पात्र आणि प्रत्येक वेळचा समूह यांच्या वेशभूषा लक्षात राहण्या जोग्या. काळे पोशाख कधी लाल तर कधी सिल्व्हर चश्मे. विक्रमाचे काम करणारे कुबेर शास्त्री भूमिकेत शोभून दिसले. प्रेयसीची ताटातूट हतबल आणि विव्हलता छान स्पष्ट केली. जॉनी जॉनी येस पप्पा वडिलांचा कडक पणा जॉनी चा हळूहळू रडवेला होत जाणारा आवाज, अनेक भावनांचा खून करण्याचा प्रसंग शेवटी चवताळून वेताळाचा खून करणे हे काम उठावदार पणे झाले. पण प्रेयसीला बॉस घेऊन जातो तिथे विक्रमाची प्रतिक्रिया कुठेच जाणवली नाही. पत्नीचे काम करणाऱ्या एकता शास्त्री आणि प्रेयसी रचना अमृता इनामदार यांनी विक्रमला समजून साथ दिली. दिग्दर्शक आणि वेताळ झालेले अमोल देशमुखांनी नाटकाचा बारकाईने अभ्यास केलेला दिसून येत होता. वेताळाचे दात विचकाऊन, मान वाकडी करून हसणे भूमिकेला उठावदार पणा आणत होते. वेताळाची उंची दाखविण्याचा खटाटोप पात्राच्या हालचाली मर्यादित करणारा होता. यामुळे सहजता कमी होत होती याकडे दिग्दर्शक म्हणून स्वतःच्या भूमिकेकडे लक्ष देणे आवश्यक होते. नाटकाच्या सरावाच्या वेळी कदाचित ही प्रॉपर्टी वापरली नसावी. सांघिक नृत्य सदृश्य हालचाली सुंदर बसविल्या होत्या. नाटकाच्या प्रयोगाने प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळवत उंची गाठली. NSD किंवा FTI च्या कार्यशाळेत प्रयोग झाल्याचा फील होता.



- **आजचे नाटक** : मोनालिसा
- **वेळ व ठिकाण** : सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक व दिग्दर्शक** : इम्तियाज दस्तगीर मालदार

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, १० डिसेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# राहुल नार्वेकरांनी मी पुन्हा येईन म्हटले नव्हते, तरी आले : फडणवीस

## सभागृहात पिकला एकच हशा

◆ **मुंबई, ९ डिसेंबर**

महाराष्ट्र विधानसभाध्यक्ष म्हणून ॲड. राहुल नार्वेकर यांची निवड बिनविरोध झाली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदनपर भाषणाच्या सुरुवातीलाच 'राहुलजींनी मी पुन्हा येईन, असे म्हटले नव्हते, पण ते आले,' असे म्हणून केली. तेव्हा सभागृहात एकच हशा पिकला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राहुल नार्वेकर यांनी मी पुन्हा येईन, असे म्हटले नव्हते, तरीही तुम्ही पुन्हा एकदा निवडणून आलात, त्याबद्दल अभिनंदन. तुम्ही खुर्चीला न्याय देण्याचे काम कराल, यात शंका नाही. नार्वेकर हे अभ्यासू आणि संयमी व्यक्तिमत्त्व आहे. मुंबई-कोकणात अनेक दिग्गजांनी जन्म घेतला. सलग दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याचा मान फक्त चार लोकांनाच मिळाला आहे. त्यात आपण गणले जाणार आहात. सभागृहाचे काम आणि नियम यांचा अध्यक्षांचा चांगला अभ्यास आहे. यावेळी त्यांनी नाना पटोले, तुम्ही वाट मोकळी केली म्हणून राहुल नार्वेकर यांना संधी मिळाली. असे म्हणत नाना पटोलेंना चिमटा काढला.

अध्यक्ष डावीकडील आणि उजवीकडील दोन्ही बाजूचे आवाज ऐकतात. त्यांना डावीकडील आवाज सूक्ष्मपणे ऐकावा लागणार आहे. आम्ही विरोधी पक्षाचा आवाज ऐकूच, असे म्हणत फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला. कोणता पक्ष खरा, खरा प्रतोद कोण, हे समजत नव्हते, असे म्हणत जयंत पाटील यांना उद्देशून टोला लगावला. काहींनी अध्यक्षांवर पातळी सोडून टीका केली, पण त्यांनी त्यांचे काम केले. त्यांनी खरी बाजू पाहून काम केले. श्रद्धा आणि सबुरी या गोष्टी राजकारण्यांना समजल्या, तर वाट सोपी होते. विधानमंडळ आणि न्यायपालिकेतील अधिक्षेपात विधानमंडळाची बाजू ठामपणे त्यांनी मांडली, अशा शब्दांत त्यांनी राहुल नार्वेकर यांच्या कामाचे कौतुक केले. या विधानमंडळाला ॲड. नार्वेकरांसारखा न्यायबुद्धीचा अध्यक्ष लाभला आहे. या विधानमंडळाची उंची उत्तरोत्तर वाढवतील, अशी अपेक्षा देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ◂(तभा वृत्तसेवा)

### पीठासीन अधिकाऱ्यांच्या समितीचे अध्यक्ष

पक्षांतर बंदी कायद्याच्या अनुषंगाने देशातल्या सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची एक समिती तयार करण्यात आली आणि त्या समितीचे अध्यक्ष म्हणून ॲड. राहुल नार्वेकर यांची निवड करण्यात आली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी याबाबतची घोषणा केली. ही बाब महाराष्ट्रासाठी गौरवास्पद आणि कौतुकास्पद असल्याचे फडणवीस म्हणाले.



तीन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी विधानभवनात आलेले महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले

# 'कर नाही त्याला नाही डर, उसका नाम राहुल नार्वेकर' : एकनाथ शिंदे

## विरोधकांवर जोरदार हल्ला

◆ **मुंबई, ९ डिसेंबर**

मागील अडीच वर्षांच्या कार्यकाळात विरोधी पक्षांचे नेते, विश्वप्रवक्ते, प्रवक्ते आणि भोंगे सतत आरोप करून दबाव आणण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, या दबावाला न जुमानता, न डगमगता बेधडक काम केले, अशा शब्दांत ॲड. राहुल नार्वेकरांचा गौरव करीत, 'कर नाही त्याला नाही डर, उसका नाम राहुल नार्वेकर', अशी चारोळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हणताच, सभागृहाने त्यांच्या चारोळीला साद दिली.

भाजपा नेते राहुल नार्वेकर यांची विधानसभाध्यक्षपदी निवड एकमताने निवड करण्यात आली. याबाबतची औपचारिक घोषणा विशेष अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सोमवारी करण्यात आली. यानंतर एकनाथ शिंदे यांनी राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षपदाच्या निवडीचा अभिनंदन प्रस्ताव मांडला. यावेळी त्यांनी जोरदार फटकेबाजी करीत विरोधकांना धारेवर धरले.

मी पुन्हा येईन, असे न बोलता नार्वेकर पुन्हा आले. तर, 'मी पुन्हा येईन' सांगून देवेंद्र फडणवीस पुन्हा आले. मी एकदा सभागृहात म्हणालो होतो की, आमचे २०० पेक्षा जास्त आमदार निवडून येतील, नाही तर मी शेती करायला जाईल. तो शब्द आम्ही पूर्ण केला. अजित पवार आमच्यासोबत आल्यामुळे आम्हाला बोनस मिळाला. आता राज्यात विकास आणि प्रगतीचे नवीन पर्व सुरू झाले आहे. गेल्या अडीच वर्षांत आपल्यावर अनेकांकडून आरोप करण्यात आले. इतके आरोप होत असताना सुद्धा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी संयम ठेवला. ते घाबरले नाही. 'त्यामुळे कर नाही त्याला नाही डर, उसका नाम राहुल नार्वेकर' असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी नार्वेकरांचे कौतुक करीत अभिनंदन केले. राहुल नार्वेकर यांच्यावर पुन्हा अध्यक्षपदाची जबाबदारी आली आहे. गेल्यावेळी नाना पटोले, त्यांना डाव्या बाजूची जास्त काळजी घ्या, असे म्हणाले होते. पण जनतेनेच डाव्या बाजूची जास्त काळजी घेतली. आता विधानसभा अध्यक्ष डाव्या बाजूला अधिक लक्ष देतील, असे शिंदे म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

### 'नो बॅलेट ओन्ली बुलेट'

मविआवाले ईव्हीएम घोटाळा म्हणून सतत गैरसमज पसरवतात. घोटाळा असता तर, तुम्ही इथे नसता. लोकसभेत २ कोटी ४८ लाख १२ हजार ६२७ मते महायुतीला आणि २ कोटी ५० लाख मते मविआला मिळाली. केवळ २ लाख मते जास्त. पण, मविआच्या जागा आल्या ३१ आणि आमच्या आल्या १७. तेव्हा तुम्ही का नाही मागितला बॅलेट. बॅलेट, बॅलेट ऐकायलायच येत नव्हते. कारण, यशाने हे बुलेटवर सुसाट निघाले होते. तेव्हा यांचे 'नो बॅलेट ओन्ली बुलेट' होते, असा टोमणा शिंदे यांनी लगावला.

# आपला करेक्ट कार्यक्रम झाला, हे मान्य करा : अजित पवार

## विरोधकांना टोला

◆ **मुंबई, ९ डिसेंबर**

नौटंकी आणि स्टंटबाजीतून बाहेर या, जनतेने आपल्याला नाकारले आहे, हे स्वीकारा, आपला करेक्ट कार्यक्रम झाला हे मान्य करा, असा टोला मारकडवाडीमध्ये सुरू असलेल्या आंदोलनावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांना लगावला.

ॲड. राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी निवड एकमताने निवड झाल्यानंतर अजित पवार यांनी अभिनंदन प्रस्ताव मांडला. या प्रस्तावावेळी त्यांनी विरोधकांना डिवचलेच, पण मारकडवाडीच्या मुद्यावरूनही हल्ला चढवला. पवार म्हणाले की, विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. यावेळी त्यांनी त्यांचा मोर्चा विरोधकांकडे वळवला. विरोधकांवर हल्लाबोल करीत अजित पवार म्हणाले, निवडणुकीच्या काळात अनेकजण स्टेजवर संविधान हातात घ्यायचे. संविधान हातात घेतले तरच संविधानाबद्दल आदर वाटतो का, असे नाही. एकनाथ शिंदे म्हणाले की, ते कोरे होते. संविधानाच्या तरतुदी त्यांनी वाचलेल्या नाहीत, असे माझे मत आहे किंवा वाचून ते त्याचे उल्लंघन करीत आहेत, असे म्हणावे लागेल. संविधानाच्या अनुच्छेद १८८ मधील तरतुदीनुसार प्रत्येक निवडून आलेल्या सदस्याने त्यांचे स्थान ग्रहण करण्यापूर्वी शपथ घेणे आवश्यक आहे. शपथेवर बहिष्कार म्हणजे या तरतुदीचा सरळसरळ भंग आहे. जरा कळ काढल्यानंतर शपथ घेण्यात आल्या.



संविधानाच्या अनुच्छेद कलम ३२४ नुसार निवडणूक घेण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाला दिला आहे. कायद्याने, नियमाने आणि देशाने हा अधिकार दिला आहे. सामान्य जनतेला हा अधिकार नाही. अनुच्छेद ३२९ मधील तरतुदीनुसार एखाद्या सदस्याच्या निवडीला आव्हान द्यायचे असेल, तर निवडणूक याचिका दाखल करावी लागते. उगीच काहीतरी स्टंटबाजी करायची, मारकडवाडीकरिता आम्हालाही आपलेपणा आणि प्रेम आहे. पण, कारण नसताना बाऊ केला जात आहे. त्यामुळे लक्षात घ्या की, आपला करेक्ट कार्यक्रम झालेला आहे. तुम्हाला जनतेने नाकारलेले आहे. आमची बाजू खरी आहे, त्यात कुठलीही खोट नाही, असे म्हणत अजित पवार यांनी विरोधकांना खडेबोल सुनावले. ◂(तभा वृत्तसेवा)

### तेव्हा गार गार वाटायचे

लोकसभेत आमच्या जागा कमी झाल्या. पण आम्ही रडत बसलो नाही. महाविकास आघाडीचा मोठा विजय मिळाला. तेव्हा ईव्हीएम बरे वाटले. तेव्हा गारगार वाटायचे. आता कसे गरम वाटते, ते तुम्हालाच माहिती, अशी मिश्किल टिप्पणी अजित पवारांनी केली.

# 'अमृता'हुनी गोड नाम तुझे 'देवा'

## रोहित पाटलांच्या वाणीला फडणवीसांनीही हसून दिली दाद

◆ **मुंबई, ९ डिसेंबर**



विधानसभा अध्यक्षांचे अभिनंदन केल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांचे अभिनंदन करण्यासाठी संत तुकारामांच्या वाणीतील 'अमृताहूनी गोड नाम तुझे देवा' या अभंगाद्वारे मी तुमचे अभिनंद करतो, या रोहित पाटील यांच्या वक्तव्यानंतर फडणवीसांनीही खळखळून हसत दाद दिली. संतांच्या वाणीतून आपले नाव इतक्या गोड पद्धतीने घेतले गेले आहे, त्यामुळे पुढच्या काळात काम करताना तुम्ही विरोधी पक्षांना गोड पद्धतीची वागणूक द्याल, अशी विनंती पाटील यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांनी आज विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात प्रतोद म्हणून पहिले भाषण केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ज्या प्रकारे अभिनंदन केले, ते पाहून स्वतः फडणवीसांनाही हसू आवरता आले नाही. खरे तर, मी 'अमृताहुनी गोड मुद्दामच म्हटले. कारण, पुराणातसुद्धा अमृताला वेगळे महत्त्व होते आणि आजही आहे. विरोधी पक्षांनासुद्धा तुम्ही सहकार्य कराल, अशी मी तुम्हाला विनंती करतो. उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही मी अभिनंदन करतो, असेही रोहित पाटील म्हणाले.

तासगाव कवठेमहांकाळ विधानसभेतून शरद पवार गटातून रोहित पाटील विजयी झाले आहेत. ते वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी आमदार बनले. महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्रातील राजकारणाच्या इतिहासातील सर्वांत कमी वयाचे आमदार होण्याचा मान त्यांनी पटकावला आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# ॲड. नार्वेकरांची विधानसभा अध्यक्षपदी एकमताने निवड

◆ **मुंबई, ९ डिसेंबर**



भाजपाचे वरिष्ठ नेते ॲड. राहुल नार्वेकर यांची पुन्हा विधानसभा अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. याबाबतची औपचारिक घोषणा सोमवारी करण्यात आली.

विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडीबाबतचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात मांडला. त्याला अनिल पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रस्तावाला ॲड. आशिष शेलार यांनी आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मांडलेल्या प्रस्तावाला चंद्रकांत पाटील यांच्याकडून अनुमोदन देण्यात आले. त्यानंतर राहुल नार्वेकर यांची आवाजी मतदानाने एकमताने विधानसभा अध्यक्षपदी निवड झाली.

भाजपाचे उमेदवार म्हणून राहुल नार्वेकर कुलाबा विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आहेत. राहुल नार्वेकर सलग दुसऱ्यांदा या मतदारसंघातून विजयी झाले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, विधानसभा अध्यक्षपद शक्यतो एखाद्या ज्येष्ठ नेत्याला दिले जाते; मात्र तरुण विधानसभा अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला आहे. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्यांदा ते अध्यक्षपद भूषवित आहेत.

ही निवडणूक केवळ एक औपचारिकाच उरली होती; कारण, महाविकास आघाडीकडे नार्वेकर यांच्याविरोधात उमेदवार उभा करण्याची क्षमता आणि संख्याबळही नव्हते. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी होणार होती. असे असतानाही, विरोधी आघाडीने वाटाघाटीचा मार्ग खुला ठेवताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची रविवारी भेट घेत, विधानसभेचे उपाध्यक्षपद आणि विरोधी पक्षनेतेपद मिळावे, अशी मागणी केली होती. ◂(तभा वृत्तसेवा)

# आम्ही लॉलिपॉप घेऊन बसू का?

### बांगलादेशच्या राजकारण्यांवर ममतांचा प्रहार

◆ **कोलकाता, ९ डिसेंबर**

बांगलादेश काही दिवसांतच बंगालचा ताबा घेऊ शकतो, अशी वल्गना करणाऱ्या बांगलादेशी राजकारण्यांना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी चांगलेच फटकारले. त्यांचे वक्तव्य अर्थहीन आहे. तुम्ही बंगाल, बिहार आणि ओडिशाचा ताबा घ्याल, तर आम्ही हाती लॉलिपॉप घेऊन बसणार आहोत का, असा सवाल त्यांनी केला.

सीमेच्या या बाजूला काही बनावट व्हिडीओ प्रसारित केल्याबद्दल ममता बॅनर्जी यांनी विधानसभेला संबोधित करताना कुणाचेही नाव न घेता निषेध केला. राज्यात तणाव निर्माण करण्यामागे एक विशिष्ट राजकीय पक्ष असल्याचे त्यांनी सांगितले. बांगलादेशात अल्पसंख्यकांवर होत असलेल्या अत्याचारांचा त्यांनी निषेध केला. हा प्रकार अस्वीकार्ह आहे असे सांगताना भारतातील धार्मिक समुदायांत ऐक्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. सीमेपलीकडील चिथावणीखोर वक्तव्यांचा त्यांनी निषेध केला. यात बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या नेत्याचाही समावेश आहे. बंगाल, बिहार, ओडिशावर बांगलादेशचा हक्क असल्याचे आणि बांगलादेशच्या लष्करातील दिग्गजांच्या एका व्हायरल व्हिडीओत, देश काही दिवसांतच पश्चिम बंगालवर ताबा मिळवू शकतो अशी टिप्पणी करीत असल्याचे हा नेता दिसून आला. ◂(वृत्तसंस्था)

# धनकड यांच्याविरोधात येणार अविश्वास प्रस्ताव

◆ **नवी दिल्ली, ९ डिसेंबर**

राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी केली आहे. कदाचित, मंगळवारीच हा प्रस्ताव आणला जाऊ शकतो.

धनकड यांच्या सभागृहाचे कामकाज चालवण्याच्या पद्धतीवर तसेच विरोधी पक्षांशी करीत असलेल्या भेदभावपूर्ण वागणुकीवर विरोधी पक्षांचे सदस्य नाराज आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला जाणार असल्याचे समजते. राज्यसभेत आज जॉर्ज सोरोस यांचा मुद्दा सत्ताधारी पक्षाने उपस्थित केल्यानंतर धनकड यांनी जी भूमिका घेतली, त्यावर विरोधी सदस्य नाराज झाले.

या अविश्वास प्रस्तावावर आतापर्यंत विरोधी बाजूच्या ७० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. विशेष म्हणजे, काही मुद्यांवर काँग्रेसशी असहमत असलेल्या समाजवादी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनीही या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या असल्याचे समजते. मंगळवारी विरोधी पक्ष हा अविश्वास प्रस्ताव दाखल करणार असल्याचे समजते.

कोणत्याही सभागृहात अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी ५० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात. धनकड यांच्याविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर ७० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. पावसाळी अधिवेशनातही धनकड यांच्यावर विरोधी पक्ष अविश्वास आणणार अशी चर्चा होती. पण, तेव्हा विरोधी पक्षांनी ती कल्पना सोडून दिली होती. ◂(तभा वृत्तसेवा)



गौतम अदानी आणि मणिपूरमधील स्थितीवरून सभात्याग केल्यानंतर विरोधी आघाडीच्या नेत्यांनी संसदभवनाच्या परिसरात सोमवारी आंदोलन केले. यात मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी प्रामुख्याने उपस्थित होते

# बांगलादेशातील हिंदूंची तीव्र चिंता

## परराष्ट्र सचिवांची उच्चस्तरीय चर्चा

◆ **ढाका, ९ डिसेंबर**

बांगलादेशातील अल्पसंख्यकांच्या सुरक्षेवर भारताने सोमवारी तीव्र चिंता व्यक्त केली आणि शेजारी देशासोबत सकारात्मक, रचनात्मक तसेच परस्परांच्या फायद्याचे संबंध असल्याचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी बांगलादेशच्या सचिवांसोबत सोमवारी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत सांगितले.

५ ऑगस्ट रोजी सरकार कोसळल्यानंतर शेख हसीना यांनी भारतात पळ काढल्यानंतर दोन्ही बाजूंची ही पहिलीच उच्चस्तरीय बैठक होती. बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीम उद्दीन यांच्याशी स्पष्ट आणि रचनात्मक विचारांची देवाण-घेवाण झाली, असे मिस्री यांनी सांगितले.



विक्रम मिस्री यांनी मोहम्मद युनूस यांच्यासोबतही चर्चा केली

मी अल्पसंख्यकांच्या सुरक्षा आणि कल्याणाशी संबंधित असलेल्या आमच्या चिंता व्यक्त केल्या. आम्ही सांस्कृतिक, धार्मिक आणि राजनयिक संपत्तीवरील हल्ल्यांच्या काही खेदजनक घटनांवरही चर्चा केली, असे मिस्री यांनी पत्रकारांना सांगितले. भारत बांगलादेशसोबत सकारात्मक, रचनात्मक आणि परस्पर फायदेशीर संबंध ठेवू इच्छितो, यावर भर दिल्याचे त्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# देश अस्थिर करण्याच्या सोरोस यांच्या प्रयत्नाला काँग्रेसची साथ

## जे. पी. नड्डा यांचा घणाघाती आरोप

◆ **नवी दिल्ली, ९ डिसेंबर**



फोरम ऑफ डेमोक्रेटिक लीडर्स इन एशिया ही संस्था जॉर्ज सोरोस यांच्याशी संबंधित आहे आणि या सभागृहातील एक सदस्य या संस्थेची कार्यकारी अध्यक्ष आहे, असा आरोप सत्ता पक्षनेते जे. पी. नड्डा यांनी केला.

हा फोरम जम्मू-काश्मीरकडे वेगळ्या भूमिकेतून पाहतो. काश्मीरला भारताचा भाग मानत नाही. राजीव गांधी फाऊंडेशन तसेच या फोरममध्ये आर्थिक संबंध आहेत. भारताची प्रतिमा मलिन करण्याचे काम हे फोरम करते. यामुळे देशाच्या सुरक्षेला धोका पोहोचत आहे. काँग्रेस पक्ष देशाच्या हितासोबत खेळत आहे, त्यामुळे या मुद्यावर चर्चा झाली पाहिजे, अशी भाजपा सदस्यांची मागणी असल्याचे नड्डा यांनी स्पष्ट केले.

जॉर्ज सोरोस आणि त्यांच्या संस्था जी भारतविरोधी भाषा बोलतात, त्याचीच री काँग्रेस नेते देशात आणि परदेशात जाऊन ओढतात, असा आरोप त्यांनी केला.

भारतात अस्थिरता आणण्याचा सोरोस आणि कंपनीचा प्रयत्न आहे आणि काँग्रेस पक्ष त्याचे माध्यम आहे, असा आरोप नड्डा यांनी केला. नड्डा बोलत असताना काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्य वेलमध्ये येत घोषणाबाजी करीत होते. नड्डा यांनी केलेले आरोप विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी खोडून काढले आणि भाजपावरच प्रतिआरोप केले. ◂(तभा वृत्तसेवा)

# लोकसभेत गोंधळ, कामकाज स्थगित

◆ **नवी दिल्ली, ९ डिसेंबर**

अदानी मुद्यावरून आज लोकसभेत गदारोळ झाला, त्यामुळे सभागृहाचे कामकाज आधी तीनदा आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करावे लागले.

लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला प्रारंभ होताच विरोधी पक्षांनी विविध मुद्दे उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. विरोधी सदस्यांनी दिलेल्या स्थगनप्रस्तावाच्या सूचना सभापती ओम बिर्ला यांनी फेटाळून लावल्या. त्यामुळे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य खवळले आणि त्यांनी सभागृहात घोषणाबाजी सुरू केली. प्रश्नोत्तराचा तास चालवण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केले.

कामकाज पुन्हा सुरू होताच गोंधळाला प्रारंभ झाला. काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत होते. पिठासीन सभापती संध्या राय यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करून घेतली. सदस्यांनी शांतता पाळावी, कामकाज चालू द्यावे, असे आवाहन राय करीत होत्या; मात्र त्याला विरोधी सदस्य प्रतिसाद देत नव्हते. त्यामुळे त्यांनी कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित केले. त्यानंतरही गोंधळाची स्थिती कायम होती.

रेल्वेसंदर्भातील विधेयकावर झालेल्या चर्चेला उत्तर देण्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव तयार होते. पण, सभागृहात सुरू असल्यामुळे त्यांना उत्तर देता आले नाही. अर्थमंत्रालयाशी संबंधित विधेयकावर अर्थमंत्री निर्मला सीतारामन् बोलणार होत्या, पण त्यांनाही बोलता आले नाही. गोंधळ थांबत नसल्यामुळे अखेर कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# जाणता, अजाणता...

महाराष्ट्राच्या जनतेने स्पष्ट कौल देऊन संपूर्ण नाकारल्यानंतर निवडणुकीच्या निकालावर अविश्वास दाखवत अप्रत्यक्षपणे मतदारांच्या मानसिकतेवरच प्रश्नचिन्हे उमटविणारा आणि याआधी कधीच सिद्ध करता न आलेला मतदान यंत्रांतील फेरफाराचा जुनाच आरोप करत विधिमंडळ सदस्यत्वाच्या शपथविधीवरच बहिष्कार घालणारा एक अपरिपक्व प्रकार महाराष्ट्राच्या विधानसभेत विशेष अधिवेशनकाळात विरोधकांकडून घडल्याचे पाहावयास मिळाले. मरकडवाडीच्या ग्रामपंचायत निवडणुकीत मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याच्या मागणीस पाठिंबा देत व मतदानयंत्रांचा विरोध नोंदविण्याचे कारण सांगत विरोधकांनी उचललेले हे पहिले पाऊल अखेर विधानसभेतील विरोधी पक्षनेत्याची जागा मिळविण्याच्या व उपाध्यक्षपद विरोधकांना मिळावे या मागणीवर येऊन थांबले आणि बहिष्काराच्या निर्णयातून चुकलेले ते पाऊल मागे घेण्याचा मध्यममार्ग स्वीकारत विरोधकांनी सदस्यत्वाची शपथ घेण्याचा समंजसपणा दाखविला. मुळात, मतदानयंत्रांच्या विरोधातील कृती म्हणून शपथविधीवरच बहिष्कार घालण्याचा राजकीय निर्णय महाविकास आघाडीतील ज्या कोणा नेत्याच्या दबावामुळे अथवा मुत्सद्दीपणामुळे घेतला गेला असेल, त्याच्या या निर्णयाचे समर्थन महाविकास आघाडी जनतेसमोर कसे करणार ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. कारण, शपथविधीवरच बहिष्कार घालण्याचा प्रकार कोणत्याच आघाडीने, पक्षाने किंवा जनतेने निवडून दिलेल्या उमेदवाराने याआधी केल्याची नोंद बहुधा विधिमंडळाच्या कामकाजाच्या इतिहासात पहिल्यांदाच झाली असावी. फेरफार झाल्याचा विरोधकांचा आरोप काही नवा नाही. ज्या ज्या वेळी विरोधकांना मतदारांनी पराभवाचे पाणी चाखावयास लावले आहे, तेव्हा तेव्हा मतदारांवर थेट अविश्वास न दाखविता आपल्या पराभवाचे खापर सत्ताधाऱ्यांवर फोडण्याचा सोपा मार्ग म्हणून विरोधकांनी याआधीही अनेक निवडणुकांत मतदानयंत्रांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्हे उपस्थित केली आहेत.

मुळात, महाराष्ट्र, हरयाणामधील निवडणुकांत महाराष्ट्रातील महाविकास आघाडीची किंवा विरोधकांच्या राष्ट्रीय पातळीवरील इंडिया आघाडीची धूळधाण उडाल्यानंतर तिची शकले होणे आता अपरिहार्य असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. या निवडणुकांत इंडिया आघाडीची धोरणे चुकली, दिशा भरकटली आणि नेतृत्वाची धुरा ज्यांच्या खांद्यावर सोपविण्याचा निर्णय इंडिया आघाडीने सार्वमताने घेतला, तो निर्णयदेखील चुकला. काँग्रेस हा आघाडीचा आधारस्तंभ ठरेल अशा समजुतीत असलेल्या जाणत्या नेत्यांना लोकांच्या मानसिकतेचा अंदाजदेखील आला नाही, हेच स्पष्ट झाले. नेतृत्वासाठी ज्यांच्यावर विश्वास टाकला ते नेतृत्व कुचकामी निघाल्याची भावना आता निकालानंतर उमटू लागली असल्याने, मुळात राहुल गांधी यांच्यावर नेतृत्वाची झूल चढविताना पराभवाचे खापर फोडण्याची तयारी सर्वांनीच केली होती का अशा शंकेसच अधिक वाव आहे. या निवडणुकांत काँग्रेसऐवजी शरद पवारांकडे किंवा ममता बॅनर्जींकडे इंडिया आघाडीचे नेतृत्व असते, आणि निवडणुकांची रणनीती त्यांनी आखली असती, तरी निकालात फारसा फरक पडला नसता याची बहुधा या जाणत्या नेत्यांना जाणीव असावी. त्याप्रमाणे झाले असते, तर पराभवाची जबाबदारी स्वीकारून आपल्या प्रदीर्घ राजकीय अनुभवाचा आणि कारकीर्दीचाच स्वहस्ते पंचनामा करावा लागला असता. ही शक्यता टाळण्यासाठीच या नेत्यांनी काँग्रेसचे राहुल गांधी यांना नेतृत्वाची झूल पांघरली असावी, अशी कुजबूज आता सुरू आहे. लोकसभेच्या निकालानंतर इंडिया आघाडीतील लहानमोठे पक्ष काँग्रेसच्या वळचणीस जाऊन या पक्षाचा आधार घेतील किंवा थेट काँग्रेसमध्ये विलीन होतील असे शरद पवार यांनी भविष्य वर्तविले होते, हे अनेकांस आठवत असेल. इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्यास काँग्रेसच योग्य आहे, यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी व काँग्रेसच्या गळ्यात नेतृत्वाची माळ घालून पुढे पराभव पत्करावा लागल्यास त्याचे खापर फोडणेही सोपे व्हावे यासाठीच त्यांनी काँग्रेसला हा बहुमान देण्याची धूर्त खेळी केली असावी, असे आता बोलले जात आहे. त्यामुळेच, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसनेच नेतृत्व केल्यास संभाव्य पराभवाचे खापर त्यांच्यावर फोडून पुढे त्या नेतृत्वास आव्हान देता येईल हीच कूटनीती होती, हे आता महाविकास आघाडीत व राष्ट्रीय पातळीवरील इंडिया आघाडीत उमटू लागलेल्या सुरावरून स्पष्ट होऊ लागले आहे. राहुल गांधी यांनी निवडणूक काळात उचलून धरलेला मुद्दा जनतेवर प्रभाव टाकू शकला नाही, किंबहुना तो प्रचाराचा मुद्दाच नव्हता, हे पराभवानंतर उमजावे, एवढे हे नेते निश्चितच अपरिपक्व नाहीत, तरीही त्यांनी काँग्रेसच्या या प्रचारनीतीबाबत फारशी प्रतिकूलता दाखविली नाही. अदानी-अंबानी यांच्या नावाने सातत्याने मोदी सरकारवर टीका करण्याचा एककलमी कार्यक्रम राहुल गांधी यांच्या आग्रहामुळे काँग्रेसलाही बहुधा नाईलाजानेच राबवावा लागत आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत प्रचाराचा मुद्दा म्हणूनही काँग्रेसने याच मुद्यावर भर दिला आणि त्याचा कोणताही प्रभाव मतदारांवर पडला नाही हे स्पष्ट झाल्यानंतरही, संसदेच्या अधिवेशनातही काँग्रेसला याच मुद्याची री नाईलाजाने ओढावी लागत असल्याचे दिसू लागताच आता इंडिया आघाडीच्या भविष्याला नव्या वाटा फुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अदानींच्या मुद्यावरून लोकसभेतील काँग्रेसच्या पवित्र्यास पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी असहमती दर्शविली आहे आणि हेच कारण पुढे करत आता इंडिया आघाडीच्या नेतृत्वाची झूल राहुल गांधी यांच्या पाठीवरून उतरविण्याच्या हालचालीदेखील सुरू झाल्या आहेत. इंडिया आघाडीत लहानमोठ्या प्रादेशिक पक्षांचे विलीनीकरण होणे दूरच, पण आता आहे त्या आघाडीतून बाहेर पडण्याचे निमित्त मात्र हे पक्ष शोधू लागले आहेत. थोडक्यात, जाणता नेता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवार यांनी निकालांबाबतचे त्यांचे निवडणूकपूर्व भाकीत प्रामाणिकपणाने केले असेल, तर ते साफ चुकले असे तरी म्हणावे लागेल किंवा केवळ पराभवाचे खापर फोडण्यासाठी काँग्रेसी नेत्यांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने केले असे मानल्यास, त्यांचा तो डाव सफल झाला असेही म्हणता येईल. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारकाळात पवार यांनी इंडिया आघाडीस आणखीही एक आश्वासन दिले होते. देशात बदल घडवून आणण्यासाठी आम्ही इंडिया आघाडीच्या झेंड्याखाली एकत्र आलो असून सत्ता परिवर्तन घडवून महाराष्ट्रास योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय हा म्हातारा स्वस्थ बसणार नाही, या त्यांच्या वाक्याने तेव्हा माध्यमांचे रकाने रंगले होते आणि इंडिया आघाडीच्या अपेक्षाही उंचावल्या होत्या. गेल्या निवडणुकीच्या प्रचारकाळात पावसात भिजून पवार यांनी विजय मिळवून दिला, तसा एखादा नवा चमत्कार ते घडवतील, असे त्यांच्या ज्या काही मोजक्या निष्ठावंतास खात्रीने वाटू लागले होते, त्यांना आतादेखील पवार यांच्या जाणतेपणाविषयी शंका वाटू लागल्या असतील, तर त्यात नवल नाही. थोडक्यात, आघाडीने आशेने पाहावे असे नेतृत्व नव्याने शोधण्याची किंवा आघाडी गुंडाळून आपापल्या दिशेने वाटचाल करण्याची वेळ आता इंडिया आघाडीतील लहानमोठ्या घटक पक्षांकरिता जवळ येऊ लागली आहे. शिवसेनेतील महाफुटीनंतरचा सर्वांत मोठा पराभव उद्धव ठाकरे यांना पाहावा लागल्याने, शिल्लक राहिलेल्या त्यांच्या पक्षासमोर अंतर्गत नेतृत्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. ठाकरे यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्हे उमटवूनच गेल्या काही दशकांत अनेक नेत्यांनी शिवसेनेचा निरोप घेतला होता. या पराभवामुळे सेनेतून बाहेर पडलेल्यांनी पूर्वी उमटविलेली ती प्रश्नचिन्हे अधिक ठळक केली आहेत. शरद पवार यांना अजित पवार यांनी थांबण्याचा सल्ला दिला होता. पवार यांनी तो धुडकावला, मी अजून म्हातारा झालो नाही, अशा आवेशपूर्ण उद्‍गारांनी त्यांनी आपल्या हाती उरलेल्या पक्षात उमेद भरण्याचा प्रयत्न केला, पण जनतेने मात्र अजित पवार यांच्याच सल्ल्यावर शिक्कामोर्तब केले असेही आता अनेकांस वाटू लागले असेल. असे असले, तरी आघाडीतून बाहेर पडण्याची वेळ आलीच, तर स्वबळाची जमवाजमव करण्याचे नवे आव्हान या पक्षांसमोर कायमच राहणार आहे.

---

## आंतरराष्ट्रीय

### वसंत गणेश काणे

# २१ वी हवामान बदल परिषद यशस्वी की अयशस्वी?

अझरबैजान हा कॅस्पियन समुद्र आणि कॉकेशस पर्वतरांगा यात वसलेला देश आहे. अझरबैजानची राजधानी असलेले बाकू हे एक मुलखावेगळेच शहर असून ते समुद्रसपाटीपेक्षा २८ मीटर म्हणजे ९२ फूट खाली आहे. जगातल्या २०० देशांची उष्णतामान वाढ आणि हवामानातील बदल या विषयीची २९ वी परिषद बाकू येथे ११ ते २२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सुरू होती. या परिषदेचे पूर्ण नाव 'कॉन्फरन्स ऑफ पार्टीज' (कॉप) असे आहे. सध्या 'हवामान बदल' या विषयावर जगभर संशोधन सुरू आहे. जगभरातील शास्त्रज्ञ, सरकारे, राजकीय नेते दरवर्षी एकत्र येऊन दोन आठवडे या प्रश्नावर चर्चा करीत असतात. यावरून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात यावे. हवामानात होत असलेले बदल हे आता केवळ बदल राहिले नसून त्यांना संकटाचे रूप प्राप्त झाले आहे. या संकटाचे निवारण कसे करता येईल, यावर या परिषदेत विचारविनिमय केला जात असतो. २७ वी परिषद इजिप्तमधील शर्म-अल-शेख येथे आणि २८ वी परिषद संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे पार पडली होती. या परिषदांना हजारोंच्या संख्येत प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थितांचा हा आकडा नोंद घ्यावी असाच आहे.

'हवामान अर्थपुरवठा' आणि 'नुकसान निधी' हे दोन मुद्दे 'कॉप २९' मध्ये अतिशय महत्त्वाचे ठरले आहेत. २००९ साली संयुक्त राष्ट्रांची हवामान बदल परिषद, ७ ते १८ डिसेंबर दरम्यान डेन्मार्कमधील कोपनहेगन येथील बेला सेंटर येथे आयोजित करण्यात आली होती. ही कोपनहेगन समिट म्हणून ओळखली जाते. या परिषदेत विकसित राष्ट्रांनी विकसनशील देशांना हवामान बदलाशी लढण्यासाठी निधी म्हणून दरवर्षी १०० अब्ज डॉलर द्यावेत, असे ठरले होते. २०१५ मध्ये पॅरिस करार संमत करण्यात आला. यावेळी या योजनेला २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता २०२४ मध्ये बाकू येथील कॉप २९ मध्ये हवामान बदलावर नव्याने विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. आता हवामान बदलामुळे जे देशांचे नुकसान होते आहे, त्याचे निवारण करण्यासाठी नुकसान भरपाई निधीही उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी ६६१ दशलक्ष डॉलरचे आश्वासन मिळाले असून ही जमेची बाजू आहे.

हवामान बदलाबाबत जे काही करायचे ते या शतकाच्या शेवटाच्या आधी करावेच लागणार आहे. कारण २२ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच हवामान बदलाचे स्वरूप एवढे भयंकर असेल की, परिणामांवर नियंत्रण मिळविणे अशक्यप्राय होईल. १९९७ मध्ये कॉपची तिसरी परिषद जपानमधील यमाशिरो प्रांतातील क्योटो या शहरी झाली होती. या परिषदेत सकारात्मक निर्णय झाले होते. म्हणून ही परिषद विशेष महत्त्वाची मानली जाते. फ्रान्समधील पॅरिस येथे पार पडलेली २१ वी परिषदही अशीच पथदर्शक मानली जाते. हरित वायूंमुळे तापमान वाढीचे परिणाम नक्की कसे होतील, हे या परिषदांमध्ये विशद करण्यात आले होते. अतिपर्जन्यवृष्टी, त्यामुळे महापूर, कधी उष्णतेची लाट तर कधी थंडीचा कडाका, चक्रीवादळे आणि मुख्य म्हणजे समुद्राच्या पातळीत वाढ ही संकटे येतील, अशी सावधगिरीची सूचना देण्यात आली होती. हे टाळायचे असेल तर उष्णतामानातील वाढ १.५ अंश सेल्सिअसच्या आत राखावीच लागेल. समाधानाची बाब ही आहे की, या संकटाची गंभीर दखल घेण्यात आली आणि पुढे कॉप २२ ते कॉप २८ या कालखंडात म्हणजे २०१६ ते २०२३ या काळात काही भरीव कारवाईही झाली.

**बाकू परिषदेत चर्चिले गेलेले मुद्दे :** हवामान बदलाचा परिणाम कमी करणे. यानुसार हरित वायूंची निर्मिती एकदम थांबवता यायची नाही. पण सौर ऊर्जा किंवा वायू ऊर्जा निर्मितीचे प्रमाण वाढविता येणे सहज शक्य आहे तसेच यांची कार्यक्षमताही वाढविता येऊ शकते. संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे १३ ते ३० डिसेंबर २०२३ या काळात पार पडलेल्या २८ व्या परिषदेत या मुद्यावर सहमती झाली होती. बाकू परिषदेत या दिशेने आणखी वेगाने प्रयत्न करण्याचे ठरले. २१०० पर्यंत उष्णतामानवाढ १.५ अंश सेल्सिअसने कमी करायचे ठरले आहे. यासाठी हे प्रयत्न पुरेसे पडणार नाहीत. २०५० पर्यंत 'नेट झीरो' हे उद्दिष्ट गाठायचे आहे. नेट झीरो म्हणजे जेवढी हरित वायूंची निर्मिती तेवढेच त्यांचे निरसन होय. तसेच कर्ब आणि खनिज व इतर तेले यांचा वापर कोणी किती कमी करायचा याबाबतही विचारविनिमय झाला. जगात समुद्र किनारा असलेले, महासागरांनी वेढलेले अनेक लहान-मोठे देश आहेत. उष्णतावाढीमुळे लहान देशांवर संकटे यायला सुरुवातही झाली आहे. यांना आर्थिक मदत व सामना करण्यासंबंधीचे तंत्रज्ञान विकसित देशांनी पुरवावे, यावर बाकू परिषदेत एकमत झाले. हे साध्य करायचे तर पैसाच हवा; पण विकसित देश मदत करायला नाखूश असतात. आज देतो, उद्या देतो असे म्हणत उशीर तरी करतात; नाहीतर पुरेशी मदत न करताच अंग काढून घेतात. हे थांबले पाहिजे. जेमतेम १०० मिलियन डॉलरचा हवामान निधी (क्लायमेट फंड) २०२० मध्ये कसाबसा सुरू झाला. म्हणून एक नवीन फंड उभारण्यात आला. त्याला 'लॉस ॲण्ड डॅमेज फंड' असे नाव देण्यात आले. त्यात फक्त ८०० दशलक्ष डॉलरच गोळा झाले. म्हणून आता २९ व्या बाकू परिषदेत फक्त पैसा गोळा करणे, यावरच लक्ष केंद्रित करण्याचे ठरले आणि 'न्यू कलेक्टिव क्वांटिफाईड गोल' हा फंड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. पण हे केवळ शब्दांचे बुडबुडे ठरू नयेत.

कॉप परिषदेचा भाग मानली जाणारी संयुक्त राष्ट्रांची जैवविविधता परिषद (बायोडायव्हर्सिटी कॉन्फरन्स) संपन्न होत असते. यावर्षी ही कोलंबियातील काली या शहरी २१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२४ या काळात पार पडली. यात जो विचारविनिमय झाला, त्यातील निष्कर्ष चिंताजनक आहेत. यानुसार अ) येत्या काही दशकात १० लाख प्रजाती नष्ट होतील. ब) कोट्यवधी हेक्टर जंगल दरवर्षी नाहीसे होत जाईल. तसेच ७ व ८ जून २०२४ मध्ये महासागर परिषद इटलीतील व्हेनिस येथे पार पडली. कॉप २७ इजिप्तमध्ये, कॉप २८ संयुक्त अरब अमिरातीमध्ये आणि कॉप २९ अझरबैजान येथे आयोजित होती. या तिन्ही देशांत लोकशाही नाही, तिथे हुकूमशाही आहे. संयुक्त अरब अमिरात आणि अझरबैजान हे खनिज तेल आणि वायूचे उत्पादन करणारे देश आहेत. या दोन देशांतच जगातील एकचतुर्थांश तेलाचे उत्पादन होते. तेलाचे उत्पादन कमी करा, असा आग्रह धरणाऱ्या कॉपचे शिखर संमेलन या दोन प्रचंड तेल उत्पादक देशात संपन्न व्हावे, हा फार मोठा विनोदच म्हटला पाहिजे. हवामान बदल वगैरे सर्व बकवास आहे. 'डिग बेबी डिग' म्हणजे अधिकाधिक तेल विहिरी खोदा म्हणून प्रचार करणारे डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाले आहेत. अशा परिस्थितीत अझरबैजानमध्ये पार पडलेली बाकू परिषद जेमतेम यशस्वी झाली, असेच म्हणावे लागते.

९४२२८०४४३०

---

## वेध

### पुंडलिक आंबटकर

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार?

मागील साडेतीन-चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार, असा प्रश्न विधानसभा निवडणुकीतंनर ऐरणीवर आला आहे. कधी कोरोनाच्या कारणामुळे तर कधी ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून या निवडणुका दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ठोस कारणाशिवाय रोखता येऊ शकत नसल्याची टिप्पणी केल्याने आगामी दोन-तीन महिन्यांत या निवडणुकांचा कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता बळावली आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या निवडणुकांबाबत सकारात्मकता दर्शविल्याने राज्यात हालचाली सुरू झाल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कार्यकर्त्यांना आपली योग्यता सिद्ध करण्यासाठी साहाय्यभूत ठरत असल्याने या निवडणुकांमध्ये युतीची शक्यता पूर्णतः गृहीत धरता येत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर स्पष्ट केले. अनेक जिल्हा परिषदांवर भाजपा आणि काँग्रेस अथवा राकाँ मिळून सरकार स्थापन झाल्याचे जनतेने पाहिलेले आहे. काही ठिकाणी मात्र समन्वयाने समविचारी पक्षांची युती अथवा आघाडी बघावयास मिळाली आहे. त्यामुळे युती करायची की नाही, हा स्थानिक पुढारी आणि कार्यकर्त्यांचा प्रश्न आहे. परंतु, या संस्थांवर दीर्घकाळापासून लोकप्रतिनिधीच नसल्याने विकासकामांना ब्रेक लागला आहे. त्यामुळे या निवडणुका होणे अत्यंत गरजेचे आहे. ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक अधिष्ठान मिळाले. परंतु, दीर्घ काळापासून एकाही महानगरपालिका अथवा जिल्हा परिषदेवर लोकप्रतिनिधी नसल्याने शहरांसह ग्रामीण भागातील विकासकामांचा खोळंबा झाला आहे. महाराष्ट्रात जालना ही नवीन महापालिका धरून एकूण २९ महानगरपालिका आहेत. तसेच २३२ नगरपालिका तर १२५ नगरपंचायती कार्यरत आहेत. एकूण ३६ जिल्ह्यांपैकी ३४ जिल्ह्यांचा कारभार जिल्हा परिषदांमार्फत चालतो. तर या जिल्हा परिषदांतर्गत एकूण ३५१ पंचायत समित्या कार्यरत आहेत. मात्र, या संस्थांवर लोकप्रतिनिधी नसल्याने सर्व कारभार प्रशसकांच्या हाती एकवटला आहे. शिवाय २८ हजार ८१३ ग्रामपंचायतींपैकी बहुतांश ग्रामपंचायतींच्या निवडणुका शेष असल्याने ग्रामीण भागात अनेक समस्या निर्माण झाल्या आहे. या सर्व समस्यांवर निवडणुका घेणे हाच एकमेव उपाय आहे.

२९ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा राखली जात नसल्याच्या सबबीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण रद्दबातल ठरविले. तत्कालीन ठाकरे सरकारने न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली. परंतु, योग्यरीत्या बाजू मांडण्यास हे सरकार असमर्थ ठरल्याने न्यायालयाने आपला निर्णय बदलविण्यास स्पष्ट नकार दिला. त्यावेळी केवळ सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसींचे राजकीय आरक्षण संपुष्टात आल्याचा आरोप झाला. परंतु, ठाकरे सरकारवर काहीही परिणाम झाला नाही. तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सरकारला वारंवार सूचित केले. परंतु, सरकारने त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयात ओबीसी आरक्षण टिकू शकले नाही. आता पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने ओबीसी आरक्षणाबाबत सकारात्मकता निर्माण झाली आहे. परंतु, दीर्घ काळापासून रखडलेल्या निवडणुका घेण्याचा आदेश न्यायालयाने दिल्यास या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय घ्याव्या लागू शकतात. कारण, इतक्या कमी वेळात ओबीसी आरक्षणावर निर्णय येण्याची शक्यता कुठल्याही अंगाने वाटत नाही.

वर्धेचे तत्कालीन खासदार रामदास तडस यांनी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा वारंवार लावून धरला होता. आता या विषयावर गांभीर्य राखणारे सरकार सत्तेत आल्याने ओबीसी नेत्यांच्या अपेक्षांना पुन्हा बळ मिळाले आहे. अशाही परिस्थितीत आगामी दोन-तीन महिन्यांत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यास या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय घ्याव्या लागण्याची दाट शक्यता आहे. ग्रामीण भागाच्या उत्थानासाठी शासनाच्या हजारावर योजना आहेत. परंतु, योजना राबविणारे सरपंच आणि सदस्यांचे मंडळच कार्यरत नसल्याने ग्रामीण भागातील बहुतांश विकासकामे ठप्प पडली आहेत. ग्रामसभाच होत नसल्याने गावातील समस्या मांडायच्या तरी कोणाकडे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासन आणि न्यायालयीन व्यवस्थेने किमान नागरिकांची गरज म्हणून तरी या विषयावर तोडगा काढावा, अशी रास्त अपेक्षा संपूर्ण महाराष्ट्राची आहे.

९८८१७१६०२७

---

## दखल

### पंकज जयस्वाल

# मोहम्मद युनूस आणि हिंदूंवर अत्याचार



जर तुम्ही हिंदू असाल आणि बांगलादेशात राहात असाल तर ही पृथ्वीवरील नरकाची जिवंत व्याख्या आहे. १९४६ च्या नोआखली दंगलीने बांगलादेशात हिंदूंविरुद्ध मुस्लिम हिंसाचाराची सुरुवात केली, जी आजही सुरू आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणारे जघन्य गुन्हे जगभरातील सर्व हिंदूंसाठी एक इशारा आहे. मी हे का म्हणत आहे? तथाकथित मानवतावादी गट किंवा विविध क्षेत्रांतील सेलिब्रिटी, विशेषतः अनेक बॉलिवूड तारे, गाझा, सीरिया, लेबनॉनमध्ये जे घडत आहे त्याचा निषेध करण्यासाठी वेळ काढतात; परंतु पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि आता बांगलादेशात हिंदू अत्याचाराविरुद्ध कधीच निषेध करताना दिसत नाही. पाकिस्तानातही हिंदूंवरचे अत्याचार काही संपत नाहीत. जरी आपण १९२१ चा मोपला नरसंहार किंवा १९९० चा काश्मीर हिंदू नरसंहार पाहिला नसला, तरी अफगाणिस्तान आणि बांगलादेशात आपण दररोज हिंदूंवर अत्याचाराचे साक्षीदार आहोत.

काही तथाकथित मानवतावादी, अनेक भारतीय राजकीय पक्ष आणि स्वार्थासाठी दहशतवादी संघटनांना मदत करणाऱ्या काही देशांसाठी हिंदू असणं अयोग्य आहे का? नोबेल शांतता पारितोषिक विजेते बांगलादेशचे अंतरिम पंतप्रधान मोहम्मद युनूस यांच्या नाकाखाली होणारे अत्याचार हे उर्वरित जगासाठी एक इशारा आहे की, दहशतवाला समर्थन करणाऱ्या आणि मानवताविरोधी माणसाला शांततेचा नोबेल पुरस्कार कसा दिला गेला. मोहम्मद युनूस हा शांतता प्रस्थापित करणारा नसून मानवतेचा खुनी आहे. त्यांचे नोबेल पारितोषिक रद्द करावे का? अमेरिकेचे डीप स्टेट कसे मोहम्मद युनूसचा वापर करून बांगलादेश आणि हिंदूंना कमकुवत करण्यासाठी स्वतःच्या स्वार्थासाठी वापरत आहे. अमेरिकेसाठी किंवा मानवतेसाठी कोणतेही चांगले हेतू नसलेल्या या डीप स्टेट घटकांवर डोनाल्ड ट्रम्प आक्रमक कारवाई करतील, अशी आमची अपेक्षा आहे. पाकिस्तान हा बांगलादेशचा सर्वांत मोठा शत्रू आहे, परंतु युनूसचे पाकिस्तानशी असलेले संबंध दहशतवाद्यांबद्दलची सहानुभूती आणि भारतविरोधी भूमिका दर्शवतात. हिंदू संत आणि व्यावसायिकांनी बांगलादेशच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीला चालना देण्यासाठी कठोर परिश्रम केले, कठीण काळात मोठ्या संख्येने मुस्लिमांना मदत केली. मात्र, याच व्यक्तींचा अमानुष छळ करून त्यांची हत्या करण्यात आली. हिंदूंनी हा आकृतिबंध आणि वैचारिक पैलू खरोखर समजून घेतले पाहिजेत; सोप्या भाषेत सांगायचे तर 'शत्रुबोध' असणं महत्त्वाचं आहे.

अनेक राजकीय पक्षांचे, विशेषतः अनेक इंडिया आघाडीतील पक्षांचे हिंदूंविरुद्धच्या अत्याचारांबद्दल मौन असते. सर्व हिंदूंना एक स्पष्ट संदेश यातून मिळतो, तुम्ही या पक्षांसाठी निवडणुकीचे एक साधन आहात आणि जर तुम्ही या शक्तींविरुद्ध एकजूट झाला नाही, तर तुम्ही पुन्हा गुलाम व्हाल. हे पक्ष हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचे समर्थन करत आहेत का? बॉलिवूड सेलिब्रिटींनी हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांवर टीका करताना कधी हिंदूंनी ऐकले आहे का? फक्त काही मोजक्या सेलिब्रिटींनी केलेली आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही करोडो हिंदूंचे घर आहे. तथापि, बांगलादेशातील हिंदूंच्या विरोधात मुस्लिम कट्टरतावाद्यांनी केलेल्या क्रूर हिंसाचाराबद्दल चिंता किंवा तिरस्काराचे आवाज फारच कमी आहेत. भारतातील काही मीडिया आऊटलेट्स अशा अत्याचारांवर चर्चा किंवा हायलाईट करीत आहेत. हिंदूंनो, हे लक्षात ठेवा की, आपण कधीही कोणावर अन्याय केला नाही आणि भविष्यातही करणार नाही. तथापि, आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सर्वस्वी हिंदू एकता मजबूत करणे, कोणत्याही अत्याचाराविरुद्ध संघटित होणे, बालपणापासून स्वसंरक्षण तंत्रासह सनातन संस्कृतीचे पालन करणे. संपूर्ण संत समुदायासाठी, लाखो अनुयायांसह जगाला हे दाखवण्यासाठी की, आम्ही हिंदूंवर कोणताही अन्याय किंवा मानवतेच्या विरोधात काहीही खपवून घेणार नाही. जगाला हिंदूंचे सामर्थ्य पाहू द्या. सनातन धर्म हा कोणत्याही धर्मविरोधी नाही, तर मानवतेसाठी कार्य करून जागतिक शांतता वाढविण्याची क्षमता त्यात आहे. सनातन धर्माची हानी मानवतेची आणि जागतिक शांततेची हानी आहे. त्यामुळे जगातील प्रत्येकाने ज्यांना शांतता हवी आहे, त्यांनी युनूस सरकार आणि तेथील लोकांनी हिंदूंवर केलेल्या गुन्ह्यांचा तीव्र निषेध केला पाहिजे आणि कारवाई केली पाहिजे. युनूसला समजू द्या की, तो डीप स्टेटच्या पाठिंब्याने मानवजातीविरुद्ध काम करू शकत नाही.

**हिंदूंच्या स्थितीकडे जगाने कसे पाहावे? :** ब्रिटिश कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे खासदार बॉब ब्लॅकमन यांनी बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांचा तसेच इस्कॉनचे पुजारी कृष्ण दास यांना तुरुंगात टाकल्याचा तीव्र निषेध करीत म्हटले की, धार्मिक अल्पसंख्यकांचा छळ होऊ नये. ब्लॅकमनने यूकेच्या संसदेत हा मुद्दा उपस्थित केला, अल्पसंख्यक हिंदू लोकसंख्येची दुर्दशा अधोरेखित केली. त्यांनी सांगितले आहे की, हिंदूंची घरे आणि मंदिरांची जाळपोळ आणि प्राणघातक हल्ल्यांसह हिंसाचाराचा समावेश आहे. बांगलादेशातील एका हिंदू साधूच्या अटकेवर ब्लॅकमन यांनी ब्रिटनच्या संसदेत प्रश्न उपस्थित केला. बांगलादेशात इस्कॉनवर बंदी घालण्याच्या प्रयत्नाला 'हिंदूंवर थेट हल्ला' असे ते म्हणाले. जगाला हे माहीत असणे आवश्यक आहे की, भारतातील अल्पसंख्यक सुरक्षित आहेत आणि प्रगती करीत आहेत. कारण हिंदू बहुसंख्य आहेत. हिंदू बहुसंख्य नसताना काय होते हे पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेश दर्शवतात. मुस्लिम बहुसंख्य असलेल्या पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातील अल्पसंख्यकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सक्तीचे धर्मांतर, खून, बलात्कार आणि देशातून हाकलून दिल्याने अल्पसंख्यक लोकसंख्येमध्ये लक्षणीय घट झाली आहे. मानवतावादी संघटना, विचारवंत आणि राजकीय नेते हिंदू अल्पसंख्यकांच्या या सर्वांत वाईट परिस्थितीकडे डोळेझाक करीत आहेत का? भारतात याच्या उलट घडत आहे, जिथे बहुसंख्य हिंदू जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये प्रगती करायला मदत करीत आहेत.

**भारतात संविधान सुरक्षित का आहे? :** संविधानाची मूळ वस्तुस्थिती अशी आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जोपर्यंत हिंदू बहुसंख्य आहेत तोपर्यंत सुरक्षित आहे. त्यामुळे जातीच्या आधारावर हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करणारे राजकारणी आणि डीप स्टेट प्रत्यक्षात डॉ. आंबेडकरांच्या राज्यघटनेला विरोध करतात, असे मानायचे का? हिंदूंची संस्कृती कमकुवत का करायची आहे? हिंदूंनी व्यापक संशोधन आणि विश्लेषण केले पाहिजे. ते निःसंशयपणे हिंदू ऐक्याचे महत्त्व आणि विभाजित हिंदू समुदायाचे वाईट परिणाम जाणून घेतील.

हिंदूंनो, कृपया लक्षात ठेवा, 'एक है तो सुरक्षित है... बटेंगे तो कटेंगे.'

७८७५२१२१६१

---

## भ्रष्टाचार विरोधी दिवस

९ डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी दिवस म्हणून साजरा करतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी याच मुद्यावर २०१४ साली निवडणूक लढले व प्रचंड बहुमताने निवडून आले. एक सामान्य माणूस या घोषणेने प्रभावित झाला. कारण प्रत्येक ठिकाणी लाच दिल्याशिवाय काम होतच नव्हते. त्यामुळे जनतेने मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपाला सत्ता मिळवून दिली. २०१४ साली जेव्हा मोदींचे सरकार बनले तेव्हा आपला देश १८० देशांमध्ये भ्रष्टाचारात ८५ व्या नंबर वर होता तोच २०२३ साली ९५ वर आला याचा अर्थ असा आपल्या देशात भ्रष्टाचार कमी न होता वाढला. याला काय कारण असावे हे सरकारने शोधायला पाहिजे. सामान्य जनतेने भ्रष्टाचार हा त्यांच्या जीवनाचा भाग झाला आहे हे मान्य केले आहे असे वाटते. कोणाचेही सरकार येवो भ्रष्टाचार हटवणे हे मृगजळ आहे. सामान्य नागरिक एक एक पैशाकरिता मेहनत करतो व भ्रष्टाचारी लोक दोन नंबरच्या पैशावर ऐषआरामात जगतात, हीच वस्तुस्थिती आहे.

**राजेंद्र मनोहर वाडी**/नागपूर

## उद्धवजी, आता तरी आत्मचिंतन करा

नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्या. महाविकास आघाडी व महायुती यामध्ये अटीतटीची लढत होईल असे एक्झिट पोल व तज्ज्ञांचे अंदाज असतानाही, ही



लढत एकतर्फी झाल्यासारखी होऊन महायुतीने २८० पैकी २३४ जागा मिळवून महाविकास आघाडीचा सुपडा साफ केला. विधानसभेतील दारुण पराभव पाहून उद्धव ठाकरेंना धक्का बसलेला दिसतो. त्यांनी व त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी कुछ तो गडबड है म्हणत ईव्हीएमला दोष देऊन पराभव अमान्य केला. एक प्रकारे जनमताचा अनादर केला. भारतात निवडणुकीत पराभूत पक्ष ईव्हीएमवर दोषारोपण करतो. त्याप्रमाणे याही निवडणुकीत झाले त्याबद्दल काही विशेष नाही. जर खरोखरच ईव्हीएममध्ये दोष असेल किंवा तो आढळला तर विरोधी पक्षापैकी कोणीही त्याबद्दल योग्य पुरावे देऊन तो सिद्ध करावा जनतेच्या समोर आणावा. जर त्यात दोष सिद्ध झाला तर जनताच योग्य तो न्याय करेलच व ईव्हीएममधील दोष समोर आणल्याबद्दल तुमचेही कौतुक करेल.

ईव्हीएममध्ये खरोखरच दोष असेल तर तो उघडकीस येऊन सिद्ध होईपर्यंत उद्धवजी आपण आजपर्यंतच्या यशापयशाबद्दल आता तरी थोडे आत्मचिंतन करावे असे वाटते. आता तरी यासाठी म्हणतो की, जेव्हा एकनाथ शिंदे व सहकाऱ्यांनी आपली साथ सोडली तेव्हाही तुम्हाला आत्मचिंतनाची संधी होती. जरा प्रथमपासूनच सुरुवात करू या. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा-सेना युतीचा प्रचार करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्टपणे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवीत असल्याचे जाहीर सभेत सांगत असताना जर आपल्या म्हणण्याप्रमाणे अमित शाह यांनी बंद खोलीत आपल्याशी मुख्यमंत्र्याबाबत आश्वासन दिले होते असे म्हणता तर आपण स्टेजवर त्याचवेळी याचे खंडन का केले नाही. म्हणून वाटते, हिंदुत्वाची कास धरा, पुन्हा एकदा सेनेला भरभराटीचे दिवस येतील. मतदारांच्या सूचनांचे पालन करून आपण आत्मपरीक्षण करावे, हीच इच्छा.

**भालचंद्र ठोंबरे**/९८३४३५०८९५

## वाचक पत्रे

## आता खरी परीक्षा आर्थिक आघाडीवर

'आता महाराष्ट्र थांबणार नाही' ही बातमी वाचली. बहुचर्चित निवडणुका आटोपून महायुतीचे पर्व नव्याने सुरू झाले. भाजपाला देदीप्यमान यश मिळाले तरी युती-धर्माचे पालन करत भाजपाने इतर दोन सहकाऱ्यांशी सामंजस्याचीच भूमिका ठेवली हे कौतुकास्पद आहे. निवडणुकांआधी मतदारांना आकृष्ट करण्यासाठी अनेक आश्वासने देण्यात आली. आचारसंहितेआधी मंत्रिमंडळाने अनेक फटाफट निर्णय घेतले, ज्याचा आर्थिक भार राज्याच्या तिजोरीवर पडेलच. विशेषतः १५०० रुपये महिना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा वार्षिक भारच ४६००० कोटींचा आहे. आता या योजनेअंतर्गत २१०० महिना देण्याचेही आश्वासन दिले गेले आहे. ज्यामुळे तिजोरीवरील भार ६०००० कोटींपर्यंत जाईल असा अंदाज आहे. राज्याच्या तिजोरीच्या स्थितीनुसार अंदाजे ६७ टक्के खर्च हा कर्मचारी वेतन, निवृत्ती वेतन, जुन्या कर्जावरील व्याज यावर होतो असे तज्ज्ञ सांगतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सर्व क्षेत्रातील बाबींचा अनुभव आणि जाण आहे. आता त्यांच्या समोर आपल्या मंत्रिमंडळातील दोन प्रमुख सहकाऱ्यांच्या तसेच राज्यातील इतर कोणाच्याही आर्थिक बोजा वाढवणाऱ्या अवाजवी अपेक्षांना लगाम लावून राज्याची आर्थिक घडी ताळ्यावर आणायचे प्रमुख आव्हान असेल. या सरकारला येणाऱ्या पाच वर्षांत राजकीय अस्थिरतेचा यत्किंचितही धोका नाही त्यामुळे देवेंद्र फडणवीस आत्मविश्वासाने राज्यहिताचे निर्णय कोणाचाही मुलाहिजा न ठेवता घेतील आणि राज्याचा गाडा निर्विघ्नपणे चालवतील अशी अपेक्षा ठेवू या.

**राम राजे**/९४२१७७९९४५

# वाहतूक शाखेच्या पोलीस हवालदाराची लाच प्रकरणात जामीनावर मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

वाहतूक शाखेच्या पोलीस हवालदाराची लाच प्रकरणात जामीनावर मुक्तता करण्यात आली.

याची हकीकत अशी की, तक्रारदार यांची लोकसेवक पोलीस हवालदार बसप्पा शिवाजी साखरे, नेमणूक सोलापूर शहर वाहतूक शाखा, उत्तर यांनी त्यांची बुलेट थांबवून सदर बुलेटचा सायलेन्सर हा कंपनीचा नसून त्या बुलेटवर यापूर्वीची रक्कम ३ हजार रुपये दंड पेंडिंग असल्याचे सांगून पोलीस हवालदार साखरे यांनी तक्रारदाराची बुलेट ताब्यात घेऊन ती स्वतः चालवत जेलरोड पोलीस स्टेशन जवळील ट्रॅफिक डंपिंग यार्ड येथे आणून लावली. त्यानंतर पोलीस हवालदार साखरे यांनी तक्रारदार यांना त्यांच्या बुलेटवरील पूर्वीचा असलेला दंड रक्कम ३ हजार रुपये माफ करतो व सायलेन्सर बाबत देखील कोणतीही कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे २ हजार रुपयाची मागणी केली. त्यावेळी तक्रारदाराने रकमेची पावती मिळेल का? याबाबत विचारणा केली असता, आरोपीने पावती वगैरे काही नसते, असे सांगितले त्यानंतर त्यांच्यात तडजोड होऊन तडजोडीअंती पंधराशे रुपये स्वीकारण्याचे कबूल केले.

आरोपी हे तक्रारदार यांच्याकडे लाच मागत असल्याचे तक्रारदार यांना खात्री झाल्याने सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आरोपी पोलीस हवालदार साखरे यांच्याविरुद्ध तक्रार नोंदवलेली. त्यानुसार लाचेबाबतची सरकारी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली असता, आरोपी साखरे हे पंधराशे रुपयेची लाच मागत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध पुढील लाचेसंदर्भातील सापळा रचण्यात आला. त्यावेळी तक्रारदार यांच्याकडून रक्कम रु. पंधराशेची लाच स्वीकारताना पोलीस हवालदार साखरे यांना रंगेहात पकडण्यात आले व त्यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलमानुसार जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन मे. न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

त्यावेळी आरोपी पोलीस हवालदार बसप्पा साखरे यांच्यावतीने अ‍ॅड. निलेश जोशी यांनी जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. सदर जामिनाच्यावेळी अ‍ॅड. निलेश जोशी यांच्यावतीने करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरून सोलापूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आर. जी. कटारिया सो। यांनी आरोपी बसप्पा साखरे यांची रक्कम रु. ५० हजार रुपयाच्या जामीनावर मुक्तता केली. यात आरोपीच्यावतीने अ‍ॅड. निलेश जोशी, अ‍ॅड. यशश्री जोशी, अ‍ॅड. राणी गाजूल, अ‍ॅड. ओंकार परदेशी यांनी काम पाहिले.


## सोलापूर महानगरपालिका सोलापूर
**नगर अभियंता सो.म.पा.**
**निविदेसाठी सुचना**

सोलापूर महानगरपालिका हद्दीत महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे विविध विकास कामे करणे नगर अभियंता सोलपूर महानगरपालिका नामांकित व अनुभवी कंपन्याकडून / कंत्राटदरांकडून स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी **सोलापूर महानगरपालिका हद्दीत महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे विविध विकास कामे करणे** प्रस्ताव मागवित आहे.

तपशिलवार निविदा दस्तऐवजसाठी इच्छुक निविदाकारांनी महाराष्ट्र शासन http//:www.Mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भेट देऊन माहिती घ्यावी. निविदा ऑनलाईन सादर करावी व सादर करण्याची अंतिम दि.२६/१२/२०२४ (वेळ दुपारी १.०० वाजता पर्यंत आहे.)

Tendar ID :- 2024_SMC_1122309_1

जा.क्रं./पंनपं/नअ/५४४३/२०२४
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर
दिनांकः ०२ डिसेंबर २०२४

## पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर
**बांधकाम विभाग**
**ई-निविदा क्र.९/२०२४-२५**

पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या व अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणारे ठेकेदाराकडून कामासाठी ई-निविदा मागवित आहे. ई-निविदा व संच http//:www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर या संकेतस्थळावर दि. १०/१२/२०२४ ते २४/१२/२०२४ पर्यंत उपलब्ध आहेत.

सही/-
(डॉ. प्रशांत जाधव)
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर

## जाहीर प्रसिध्दीकरण
### तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी माढा यांचे न्यायालयात

**अनिल दाजी चौधरी** -- **अर्जदार**
रा. मानेगाव ता. माढा जि. सोलापूर
**विरुध्द**
**ग्रामसेवक ग्रामपंचायत मानेगाव** -- **सामनेवाला**
ता. माढा जि. सोलापूर

ज्याअर्थी अर्जदार याने त्यांचे मुलगा आदित्य अनिल चौधरी यांचा जन्म दिनांक ०७/०५/२०११ रोजी मानेगांव ता. माढा येथे झालेला आहे परंतु त्याचा जन्माची नोंद पुर्वीचे ग्रामपंचायत/न.पा. मानेगांव येथे केलेली नसलेने अर्जदार यांनी ग्रामपंचायत/न.पा मानेगांव येथील रजिस्टरला नोंदवून तसा दाखल मिळणेकमी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्याचे मुलगा आदित्य अनिल चौधरी यांचे जन्म घटणेची नोंद धरणे कामी व दाखला देणेकामी कुणाची काही लेखी अथवा तोंडी तक्रार असल्यास अथवा कोणाचा काही हितसंबंध असल्यास पुढील नेमलेली तारीख १७/०१/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार माझे समक्ष तहसिल कार्यालय माढा येथे मांडावी. सदर मुदतीत कुठलीही हरकत/तक्रार प्राप्त न झालेस त्यानंतर वरील अर्जदार यांना वरीलप्रमाणे यांचे जन्म दिनांक ०७/०५/२०११ रोजीचे जन्म नोंद धरुन तसा दाखला देण्याबाबत योग्य ते आदेश करण्यात येईल तदनंतर कोणाची काहीएक तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक ०९/१२/२०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिली.

**तहसिल कार्यालय माढा**
क्र.२०२४/कुका(जन्म नोंद)
एसआर/१७९/२०२४
दिनांक : ०४/१०/२०२४

शिक्का

सही/-
तहसिलदार तथा
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
माढा

## जाहीर प्रसिध्दीकरण

नेमलि तारीख २१/१२/२०२४
नि.नं. ८
किरकोळ अर्ज नंबर ७६/२०२४

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि साहेब, यांचे कोर्टात

१) **श्रीमती तारामती गोरख बोकेफोडे**, धंदा घरकाम
रा. वय ७५ वर्षे मु.पो. धोत्रे, ता. बार्शी, जि सोलापूर. --**अर्जदार**
२) **नवनाथ गोरख बोकेफोडे** वय ५६ वर्षे, धंदा मजुरी
रा.धोत्रे ता. बार्शी, जि. सोलापूर
**विरुध्द**
**कोणी नाही** -- **सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं १ चा विवाह गोरख मारुती बोकेफोडे यांच्याबरोबर झालेला होता व आहे. व सदर विवाह संबंधातुन अर्जदार नं १ हीस अर्जदार नं २ नवनाथ व अविनाश, व कमलाकर असे ३ मुले झालेले असून त्यापैकी कमलाकर हे २८/०७/२००७ रोजी व अविनाश हे ०५/०५/२३ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार नं १ यांचे पती गोरख मारुती बोकेफोडे जिल्हा परिषद शिक्षक म्हणुन नौकरीस होते. व गोरख मारुती बोकेफोडे हे जि.प. प्रशाला प्रशाला इटकुर ता. कळंब जि. धाराशिव येथुन दि. ३०/०९/१९९१ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांना आर्थिक लाभ मिळालेले असुन ते सेवानिवृत्त शिक्षकाची पेन्शन घेत होते. गोरख बोकेफोडे यांनी मुळ सेवापुस्तीका व पेन्शनची सर्व कागदपत्रे वरिष्ठ कार्यालयात दाखल केलेली होती. गोरख मारुती बोकेफोडे हे दिनांक ०४/०४/२०२४ रोजी मौजे धोत्रे येथे मयत झालेले आहे. मयत गोरख यांना अर्जदार नं १ ही कायदेशीर वारस पत्नी व अर्जदार नं २ हा वारस मुले आहेत. याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. गोरख मारुती बोकेफोडे हे मयत झालेमुळे अर्जदार हिस फॅमिली पेंन्शन मिळणे नितांत गरजेचे व जरुरीचे झाले म्हणुन अर्जदार नं १ हिने वरीष्ठ कार्यालयात शोधा शोध केली असता सेवापुस्तीका कार्यालयात दिसुन येत नसलेबाबत संबंधीत कार्यालयातुन प्रमाणपत्र देण्यांत आले. अर्जदार ही मयत गोरख मारुती बोकेफोडे यांची कायेशीर वारस पत्नी व अर्जदार नं २ नवनाथ हा वारस मुले आहेत. अर्जदार नं १ हिने अर्जदार नं २ यांना एकटीचे नावे वारसप्रमाणपत्र मिळविणेसाठी संम्मतीची मागणी केली असता अर्जदार नं २ यांनी अर्जदार नं १ हिस तोंडी संम्मती दिली. व तुम्ही वारस प्रमाणपत्र मे. कोर्टातुन मिळवा त्यास आमची कोणतीही हरकत राहणार नाही असे सांगितले. त्यामुळे अर्जदार नं १ यांना वारस प्रमाणपत्राची (Heirship Certificate) ची नितांत गरज असलेने अर्जदार नं १ ही मयत गोरख मारुती बोकेफोडे यांची वारस असलेबददल वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे गरजेचे व जरुरीचे झाले आहे. सबब, अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदारास सदर अर्जात नमुद केलेप्रमाणे मयत गोरख मारुती बोकेफोडे यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्र देणेकामी कोणाची काही हरकत वा तक्रार असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दीकरण झालेपासुन ३० दिवसाचे आत अथवा नेमली २१/१२/२०२४ रोजीपर्यन्त या मे. कोर्टात स्वतः अगर विधिज्ञामार्फत हजर राहुन आपल्या हरकती दयाव्यात मुदतीत कोणाची हरकत न आलेस हे न्यायालय अर्जास अनुसरुन पुढील योग्य ते आदेश करतील हे प्रसिध्दीकरण न्यायालयाचे सही व शिक्यानिशी प्रसिध्दी केले असे. ता.११/१०/४२०२४

सही/-
लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी)

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.**<br>१) तंत्रज्ञ - ३ (८०० पदे) | MAHAGENCO<br>ITI (इले/ वायरमन/मशिनिस्ट/फिटर/ इलेक्ट्रॉ/ आय.टी./वेल्डर/इन्स्ट्रू/ बॉयलर/स्विचबोर्ड/पॉवर) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | २६/१२/२४ |
| २) | **भारतीय सर्वोच्च न्यायालय, SCI**<br>१) पर्सनल असिस्टंट (३३ पदे)<br>२) सिनिअर पर्सनल असि(४३ पदे) | पदवी व इंग्रजी शॉर्ट हॅन्ड व टायपिंग<br>पदवी व इंग्रजी शॉर्ट हॅन्ड व टायपिंग | ३० पर्यत<br>३० पर्यत | २५/१२/२४ |
| ३) | **बृहन्मुंबई महानगरपालिका, BMC**<br>१) कनिष्ठ अभियंता(३८० पदे)<br>२) दुय्यम अभियंता (३१० पदे) | दहावी उत्तीर्ण व डिप्लोमा (सिव्हील/ इलेक्ट्रॉ/ऑटो/प्रोडा/इले. पॉवर/ इनस्ट्रू/इलेक्ट्रॉ अ‍ॅन्ड टेली) व MSCIT<br>B.E (सिव्हील/इलेक्ट्रॉ/ऑटो/प्रोडा/ इले. पॉवर) व MSCIT उत्तीर्ण | ३८ पर्यंत<br>३८ पर्यंत | १६/१२/२४ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ४) | **बॉम्बे मर्कंटाईल को. ऑप बँक**<br>१) प्रोबेशनरी ऑफिसर (६० पदे)<br>२) ज्यु. एक्झिकेटीव्ह असि. (७५ पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे<br>पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | ३५ पर्यंत | २५/१२/२४ |
| ५) | **कर्नाटक बँक**<br>१) प्रोबेशनरी ऑफिसर | पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | १०/१२/२४ |
| ६) | **बॉर्डर सिक्युरिटी फोर्स BSF**<br>कॉन्स्टेबल GD (२७५ पदे) | **(फक्त खेळाडूसाठी भरती)**<br>पदवी व संबंधित क्रिडा पात्रता | २३ पर्यंत | ३०/१२/२४ |
| ७) | **भारतीय तटरक्षक दल**<br>असि. कमांडंट GD (११० पदे)<br>असि. कमांडंट टेक्नि (३० पदे) | बारावी (गणित/फिजिक्स) व पदवी<br>BE (मेकॅ/मरिन/मेटा/अ‍ॅरो/इले/ इलेक्ट्रॉ/ टेली/इन्स्ट्रू/पॉवर) उत्तीर्ण | २५ पर्यंत<br>२५ पर्यंत | ३०/१२/२४ |
| ८) | **राष्ट्रीय पात्रता परिक्षा, NET**<br>सहा. प्राध्यापक | पदव्युत्तर पदवी (५५%) किंवा ऑपिअर | -- | १०/१२/२४ |
| ९) | **एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडिया, AAI**<br>सिक्युरिटी स्क्रीनर्स (२७४ पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २७ पर्यंत | १०/१२/२४ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा** १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org

## उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर
यांचे कार्यालय सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित, सोलापूर
सिटी सर्व्हे नं.८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर-४१३००३

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ व त्याखालील नियम १९९१ चे नियम ८६(अ) अन्वये

### जाहीर नोटीस

**योगीनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.. सोलापूर** **- वादी**
**विरुध्द**
**खालील तपशीलातील नमूद केलेले पतसंस्थेचे थकबाकीदार सभासद** **- प्रतिवादी**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | कर्जदार | जामीनदार | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | २११/२०२४ | २२९२६ | | इम्रान नबीलाल शेख | शेळगी गावठाण, शेळगी, सोलापूर |
| २ | २११/२०२४ | २२९२६ | | एजाज सादिक पटेल | शेळगी गावठाण, शेळगी, सोलापूर |
| ३ | २११/२०२४ | २२९२६ | | किशोर मोहन काळे | सरस्वती नगर, शेळगी, सोलापूर |
| ४ | २१२/२०२४ | १३११२१४ | विठ्ठल भानुदास राऊत | | २८ गणेश नगर, हैद्राबाद रोड, सोलापूर |
| ५ | २१२/२०२४ | १३११२१४ | | सिद्राम बापूराव मंठाळकर | मु.पो. दहीटणे, सोलापूर |
| ६ | २१२/२०२४ | १३११२१४ | | दस्तगीर कासीमसो नदाफ | मु. पो. दहीटणे, सोलापूर |
| ७ | २१२/२०२४ | १३११२१४ | | अशोक हरिबा जगताप | मु.पो. दहीटणे, सोलापूर |
| ८ | २१३/२०२४ | ६१६६७ | शांतकुमार सिद्राम सोमशेट्टी | | २/८१, भवानी पेठ मद्दी वरती, सोलापूर |
| ९ | २१३/२०२४ | ६१६६७ | | प्रकाश शिवशरण हडपद | १०४ गरिबी हटाव झोपडपट्टी, विजापूर नाका, सोलापूर |
| १० | २१३/२०२४ | ६१६६७ | | सचिन सुभाष पलंगे | मु.पो.तळे हिप्परगा, वासुदेव नगर, सोलापूर |
| ११ | २१४/२०२४ | १२३२७९ | | प्रशांत कृष्णातराव गुमठे | योगायोग नगर, जोशी गल्ली, शेळगी, सोलापूर |
| १२ | २१४/२०२४ | १२३२७९ | | इरण्णा हणमंतप्पा बामनाळी | योगायोग नगर, जोशी गल्ली, शेळगी, सोलापूर |
| १३ | २१५/२०२४ | ४२४८३ | प्रमोद सुभाष भांबुरे | | घर नं.२१ चक्रवती हौसिंग सोसायटी, दयानंद कॉलेज, सोलापूर |
| १४ | २१५/२०२४ | ४२४८३ | | सचिन अंबादास दुधाळे | मित्र नगर, शेळगी, सोलापूर |
| १५ | २१५/२०२४ | ४२४८३ | | प्रशनपुंडलिक एकबोटे | ६२/अ, वेणुगोपाल नगर शेळगी, सोलापूर |
| १६ | २१६/२०२४ | ८७०४३ | नितीन मधुकर नरूणे | | प्लॉट नं.३० शिवगंगा नगर, शेळगी, सोलापूर |
| १७ | २१६/२०२४ | ८७०४३ | | रत्नाकर मोहनलाल लोंढे | शिवगंगा नगर, शेळगी, सोलापूर |
| १८ | २१६/२०२४ | ८७०४३ | | मंगल मधुकर नरुपणे | प्लॉट नं. ३० शिवगंगा नगर, शेळगी, सोलापूर |
| १९ | २१७/२०२४ | ६६८०३ | दिंगबर लक्ष्मण सगर | | रा ११७ सरवदे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर |
| २० | २१७/२०२४ | ६६८०३ | | अमोल दिगंबर सगर | बाळशेट्टी नगर, शेळगी, सोलापूर |
| २१ | २१८/२०२४ | १८१५५ | मनोज अनंत कमठेकर | | ३६ अ जयलक्ष्मी नगर, शेळगी, सोलापूर |
| २२ | २१८/२०२४ | १८१५५ | | संगीता शंतनू कुमठेकर | ३६ अ जयलक्ष्मी नगर, शेळगी, सोलापूर |
| २३ | २१८/२०२४ | | | आनंद भीमाशंकर गवांडकर | १३८ लक्ष्मी नगर दहीटणे, सोलापूर |
| २४ | २१९/२०२४ | ६८५३४ | तानाजी अशोक जगताप | | दहीटणे हद्दवाढ सोलापूर |
| २५ | २१९/२०२४ | ६८५३४ | | करणसिंग बलरामसिंग बायस | दहीटणे हद्दवाढ सोलापूर |
| २६ | २१९/२०२४ | ६८५३४ | | अशोक हरिबा जगताप | दहीटणे हद्दवाढ सोलापूर |
| २७ | २२०/२०२४ | १०१५१० | मलिक कासीमसाब नदाफ | | ८५ बेघर भोगवटदार, दहीटपणे, सोलापूर |
| २८ | २२०/२०२४ | १०१५१० | | चंद्रकांत रघुराव गुरव | मु.पो. दहीटणे, सोलापूर |
| २९ | २२०/२०२४ | १०१५१० | | श्रीकृष्ण नाथाजी मेजगे | ८९. भवानी पेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर |
| ३० | २२१/२०२४ | ६५६९३ | संजय हणमंतु माळगे | | ९४/३४ रविवार पेठ, सोलापूर |
| ३१ | २२१/२०२४ | ६५६९३ | | अनिल हिरालाल सुरवसे | जोशी गल्ली शेळगी, सोलापूर |
| ३२ | २२१/२०२४ | ६५६९३ | | मलिलकार्जुन विठ्ठल चौगुले | गावठाण शेळगी, सोलापूर |
| ३३ | २२२/२०२४ | २६७०० | भाऊसाहेब नामदेव भोसले | | जोशी गल्ली शेळगी, सोलापूर |
| ३४ | २२२/२०२४ | २६७०० | | अनिल हिरालाल सुरवसे | जोशी गल्ली शेळगी, सोलापूर |
| ३५ | २२२/२०२४ | २६७०० | | विलास दाजीराम भोसले | जोशी गल्ली शेळगी, सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे राहते पत्त्यावर सुनावणी नोटीस पाठविली असता त्या व्यक्ती सदर पत्त्यावर राहत नसल्याने/पत्ता चुकीचा घर बंद असल्याचे नमूद करून नोटीस परत आली आहे. तरी सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः अथवा वकीलामार्फत वार मंगळवार दिनांक २४/१२/२०२४ रोजी दुपारी ठीक १२.१० वाजता कागदपत्रासह उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर यांचे कार्यालय सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित, सोलापूर सिटी सर्व्हे नं.८४१३, दुसरा मजला, जुनेजिल्हाधिकारी आवार, सोलापूर-४१३००३ येथे हजर रहावे. या नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी

आज दि. ०९/१२/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर नोटीस दिले आहे.

सही/-
उपनिबंधक,
सहकरी संस्था,
सोलापूर शहर, सोलापूर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर, सब डि.व तालुका मोहोळ पैकी मौजे मोहोळ येथील जिरायत शेतजमीन, यासी गट नंबर ६३६/५/अ/२ संपूर्ण, क्षेत्र है.०१-६१ आर, आकार रुपये १- २० पैसे यासी चतुःसीमा पूर्वेस गट नंबर ६३६/५/अ/१, पश्चिमेस गट नंबर ६३६/१ ते ४. दक्षिणेस रस्ता, उत्तरेस - ६३६/५/ब व ६३६/५/अ/१ येणेप्रमाणे वर नमूद केलेली शेतजमीन बाळकृष्ण रामचंद्र जोशी, प्रशांत दामोदर जोशी, प्रवीण दामोदर जोशी, रीमा सतीश पराडकर, मनीषा क्रिस्टोफर त्रिभुवन, वर्षा संजय मोकाशी, सुरेश रामचंद्र जोशी, रजनी रामचंद्र जोशी यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीच्या असून ती त्यांनी आमचे अशिलास खुषखरेदीने विक्री करण्याचे ठरवून इसारा दाखल रक्कम स्विकारुन इसारापावती लिहून दिलेली आहे. सदरची शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी तसेच बोजाविरहित असल्याची हमी व खात्री सदरहू जागा मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, याउपरही वर नमूद शेतजमिनीबाबत अन्य कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध, बोजा, टाच, भाडे पट्टा, साठे खत, गहाण खत, पोटगी, दान, लीज अगर इतर अन्य करार, मदार, कोर्ट वाद वगैरे इत्यादी स्वरुपाचे हक्क हितसंबंधाबाबत तक्रार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ (सात) दिवसाचे आत आमचे खाली नमुद पत्त्यावर प्रत्यक्ष लेखी स्वरुपात आणून देवून त्यांच्या हक्काबाबतची खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही कसल्याही स्वरुपाची हरकत / तक्रार न आल्यास वरील शेतजमीन ही निर्वेध, निजोखमी व बोजी विरहीत आहे, असे समजून आमचे अशिल वर नमुद शेतजमीन मालकाशी खरेदी खताचा उर्वरीत व्यवहार पूर्ण करतील. सबब कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. १०/१२/२०२४.

सही/-
अशीलातर्फे अ‍ॅड
**प्रमोद बलभिम जाधव**
बी.ए.एल.एल.बी., सी.सी.एफ. अन्ड एम. जे.
नगर परिषदेजवळ, किल्ला विभाग, करमाळा,
ता. करमाळा, जि. सोलापूर.
मो.नं.- ९९२३४२२३७६/९४०३२९०३०२

## नगर परिषद कार्यालय, औसा जि.लातूर
दुरध्वनीक्र. (०२३८३) २२२०२३ web:www.mcausa.in E-mail ID mcausa195@gmail.com

जा. क्र./नपऔ/पु. पु. वि./कावि- दिनांक : ०९/१२/२०२४

**जाहीर ई-निविदा सूचना : नपऔ/पा.पु.वि./०१/२०२४-२५**

मुख्याधिकारी, नगरपरिषद औसा मार्फत नगरपरिषद निधी नगरपरिषद औसा कार्यालयाच्या अंतर्गत विविध विभागाच्या नागरी सेवा कार्यान्वित ठेवण्यासाठी ११ महिन्याकरीता बाह्य अभिकर्ता निवड करणे कामासाठी नोंदणीकृत ठेकेदार / मनुष्यबळ पुरवठा संस्था म. स. स. अभिकर्ताची निवड करण्यासाठी ई- निविदा ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. सदर कामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असून ई- निविदा बाबतच्या सर्व तारखा व ई-निविदेच्या पूर्व अर्हता अटी व सविस्तर निविदा सुचना शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

स्वा./-
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद औसा

## जाहीर नोटीस

सोलापूर येथील विशेषतः बुधवार पेठ येथील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि व सब डी सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील बुधवार पेठ येथील टी.पी.नं.२, फायनल प्लॉट नं.२२/अ/४ब या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या नागणे देशमुख अपार्टमेंट या अपार्टमेंटमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.८ यांसी बांधकाम क्षेत्र ६८.३५ चौ.मी. इतके असून यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे : पुर्वेसः फ्लॅट नं.७ ची जागा, दक्षिणेस फ्लॅट नं. ११, पश्चिमेस : फ्लॅट नं.९, उत्तरेस : रिकामी जागा व रोड, येणेप्रमाणे चतुःसिमेतील फ्लॅटजागा, तसेच वहिवाटीच्या इजमेंट हक्कासह व इतर तद्गभुत वस्तुसहची मिळकत.

वर नमुद मिळकतीचे दि.०४/०३/१९९३ रोजीचे साठेखत दस्त क्र.५२५/१९९३ चे मुळ साठेखत दस्त व त्याची मुळ नोंदणी पावती व दि. १७/०८/२००२ रोजीचे खरेदीखत दस्त क्र. ३७००/२००२ चे मुळ खरेदीखत दस्त व त्याची मुळ नोंदणी पावती आमचे अशिल अभिजीत अशोककुमार शाह यांच्याकडून एस.टी. स्टॅन्ड ते पार्क चौक, सरस्वती चौक या दरम्यान गहाळ झालेले आहे. त्याबाबत आमचे अशिलांनी फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर येथे रितसर गहाळ रजिस्टर क्र.५५१२/२०२४ अन्वये गहाळ रजिस्टर मध्ये नोंद केलेली आहे. तरी सदरचे साठेखत दस्त, खरेदीखत दस्त व त्यांची मुळ नोंदणी पावत्या कोणास मिळाल्यास त्यांनी त्वरीत खालील नमुद पत्त्यावर आणून द्यावे. तसेच त्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी आपली हरकत नोंदवावी.

ही जाहीर नोटीस दिली ता.०९/१२/२०२४.

सही/-
**दिपक जी. टक्कळकी** अ‍ॅडव्होकेट
बी.कॉम. एलएल.बी.
सी-१४७/१४८, श्रीकांत नगर, जुळे सोलापूर, सोलापूर
मो.नं. ९८९०५१३९५० अशिलातर्फे अ‍ॅडव्होकेट

## जाहीर घोषणा

तमाम लोकांना विशेषतः मौजे चिंचगांव, ता. माढा जि. सोलापूर येथील व आपसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर घोषणेव्दारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डि// सोलापूर सब डि/ व ता. माढा पैकी मौजे चिंचगांव ता. माढायेथील जमीन गट नं. ४९ यांसी क्षेत्र २१ हे. ३० आर, पो.ख ०४ हे. १०, असे एकुण २५ हे. ४० आर, आकार ०३ रु. ३० पैसे ही मिळकत समस्त कामगार रखवालदार या नावाने असुन ती मिळकत ही भोगवटदार वर्ग २ ची अशी आहे. तथापि, सदरची मिळकत ही सर्जेराव तुकाराम माने (बेरड), निवृत्ती बापु माने (बेरड), बाबा बापु माने (बेरड), मनोहर बापु माने (बेरड़े), शामराव बापु माने (बेरड), तंगु दत्ता चव्हाण, छबाबाई दत्ता चव्हाण हे इसम सदरची मिळकत सध्या वहिवाटीत असुन सदरची मिळकतीमध्ये असणारे समस्त कामगार रखवालदार हे नाव कमी करुन सदर सर्जेराव तुकाराम माने (बेरड), निवृत्ती बापु माने (बेरड), बाबा बापु माने (बेरड), मनोहर बापु माने (बेरड), शामराव बापु माने (बेरड), तंगु दत्ता चव्हाण, छबाबाई दत्ता चव्हाण यांचे नाव कब्जेदार सदरी व्हावे म्हणुन सदर सर्जेराव तुकाराम माने यांनी तहसिलदार साहेब तहसिल कार्यालय, माढा ता. माढा, जि. सोलापूर यांचेकडे रितसर अर्ज/प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्ताव चौकशीकामी मंडळ अधिकारी म्हैसगांव, तहसिल कार्यालय, माढा या कार्यालयांकडे प्रलंबित आहे. तथापि, वर नमुद मिळकतीबाबत सहधारक, लगतचे धारक किंवा अन्य कोणाचीही, कसलीही हरकत असल्यास ही जाहीर घोषणा प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांचे आत आपली तक्रार ही लेखी व पुराव्याचे कागदपत्राव्दारे मे. उपविभागीय अधिकारी साहेब, माढा विभाग कुडुवाडी, मे. तहसिलदार साहेब माढा अथवा मे. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे नोंदवाव्यात. जर वरिल मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत अगर लेखी तक्रार आली नाही अथवा दाखल झाली नाही तर वर नमुद मिळकतीवरील कब्जे सदरी असलेले समस्त कामगार रखवालदार हे नांव कमी करुन सर्जेराव तुकाराम माने (बेरड), निवृत्ती बापु माने (बेरड), बाबा बापु माने (बेरड), मनोहर बापु माने (बेरड), शामराव बापु माने (बेरड), तंगु दत्ता चव्हाण, छबाबाई दत्ता चव्हाण यांची नांवे कब्जेदार सदरी दाखल होणेबाबतची पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. मुदती नंतर येणाऱ्या हरकतीचा वा तक्रारीचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही जाहीर घोषणा दिली. असे तारीख ०९/१२/२०२४**

सही/-
**(अ‍ॅड. अनुप बंडोपंत वस्त्रे)**
बी.ए.एल.एल.बी. अ‍ॅडव्होकेट
श्रीराम नगर, माढा ता. माढा जि. सोलापूर

## भा.कृ.अनु.प.- राष्ट्रीय अनार अनुसंधान केन्द्र, सोलापूर
**ICAR-National Research Centre on Pomegranate**
(Indian Council of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway. Kegaon, Solapur-413 255 (MS)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263,F-(0217) 2353533
E mail- nrcpomegranate@gmail.com. Website-propomegranate.icar.gov.in (ISO 9001:2015 Certified Institute)

### WALK-IN-INTERVIEW

A Walk in interview will be held on **08.01.2025 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Evaluation of Spidoxamat 9.6% + Spinetoram 12% WG for Bio-efficacy against Thrips, Mealybughs and Fruit Borer in pomegranate sponsored by Bayer India Pvt. Ltd. | Young Professional - I | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website:
**nrepomegranate.icar.gov.in.**

**Sd/-**
**DIRECTOR**

## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी . ४१३४०१
Email- ID-am_barshi@msamb.com फोन-०२१८४-२२२९७६

दि.

### जाहिर प्रसिध्दीकरण

यान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना कळविणेत येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी व सबयार्ड वैराग येथील अडत गाळे / खुले प्लॉट, फळे व भाजीपाला विभागातील गाळे, शॉपिंग सेंटर मधील गाळे जाहिर लिलावाने बोली डिपॉझीट लिलाव पध्दतीने लिलाव मुख्य कार्यालय बार्शी मधील दि. १७/१२/२०२४ सकाळी ११.३० वा मुख्य कार्यालय येथे व उपबाजार वैराग मधील दि. १७/१२/२०२४ दुपारी ०३.०० वा उपबाजार कार्यालय वैराग येथे करण्यात येणार आहेत. तरी बाजार समितीचे अनुज्ञप्तीधारक आडत्ये, व्यापारी तसेच शॉपिंग सेंटरसाठी व्यवसायिक यांनी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी बाजार समितीकडून रु.५००/- फॉर्म फी भरुन अटी व नियम असलेले फॉर्म खरेदी करुन घ्यावयाचे आहेत.

बाजार समितीकडे लिलावात भाग घेणेसाठी फॉर्म भरुन देतांना रु.५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) बोली डिपॉझीट रक्कम अनामत म्हणून बाजार समितीच्या कार्यालयात दि.१७/१२/२०२४ रोजी पर्यंत सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरावयाची आहे. ज्यांनी रक्कम भरली आहे त्यांनाच लिलाव बोली मध्ये भाग घेता येईल याची नोंद घ्यावी. मागणी अर्ज तसेच अडत गाळे, प्लॉट, फळे भाजीपाला मार्केट गाळे, शॉपिंग सेंटर गाळे, नियम व अटी असलेला फॉर्म बाजार समितीचे कार्यालयात दि. १७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० पर्यंत कार्यालयात वेळेत मिळतील.

सही/-
सचिव मुख्यप्रशासक
कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### कुश मैनीने जिंकली ऐतिहासिक फॉर्म्युला-२ कन्स्ट्रक्टर्स स्पर्धा



**अबुधाबी** : भारतीय चालक कुश मैनीने येथे फॉर्म्युला-२ कन्स्ट्रक्टर्सची शर्यत जिंकून इतिहास घडवला आणि एफआयए कन्स्ट्रक्टर्स जागतिक स्पर्धा जिंकणारा तो देशातील पहिला ठरला. या ऐतिहासिक कामगिरीमुळे मैनीच्या कारकिर्दीत वर्षभरात आणखी एका विजेतेपदाची भर पडली. यापूर्वी त्याने एफ-२ शर्यतीत अव्वल स्थान मिळविले होते. मैनीने अलीकडेच हंगामातील चढ-उतार असूनही हंगेरीमधील शर्यतीत अव्वल स्थान मिळविले होते. या विजेतेपदामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला व त्याला ही स्पर्धा जिंकण्यास मदत झाली. जेद्दाहमधील शर्यतीतही त्याने अव्वल स्थान मिळविले होते. त्याचा फायदा त्याला या स्पर्धेत झाला व त्याने पूर्वीच्या संघ कॅम्पोस रेसिंगवर ३४.५-गुणांच्या फरकाने विजय मिळवला. फॉर्म्युला-२ कन्स्ट्रक्टर्सची शर्यत फार चांगली झाली. या शर्यतीतून सकारात्मक गोष्टीसह अनेक धडे मी घेतले. आता मला पुढील स्पर्धेची प्रतीक्षा असून मला पुढच्या वर्षी जाण्याची उत्सुकता आहे, असे मैनी म्हणाला.

### भारतीय खो-खो संघाचे प्रशिक्षण शिबिर आजपासून

**नवी दिल्ली** : भारत खो-खो विश्वतचक २०२५ स्पर्धेसाठी जोरदार तयारी करत असताना, यजमान भारतीय संघांचे सराव शिबिर नवी दिल्लीतील प्रतिष्ठित जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये १० डिसेंबर मंगळवारपासून सुरू होणार आहे. जागतिक स्पर्धेच्या एक महिना अगोदरपासून भारतीय संघाची तयारी सुरळीत होण्यासाठी भारतीय खो-खो प्रयत्नशील आहे, असे महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल म्हणाले. नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये १३ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान खो-खो विश्वचषक स्पर्धा होणार आहे. मुख्य प्रशिक्षक अश्वनी शर्मा यांच्याकडून एक महिन्याच्या प्रशिक्षण शिबिरात खेळाडूंच्या तंदुरुस्तीकडे लक्ष दिले जाणार आहे. तंत्र शिकण्यासाठी संपूर्ण भारतातून प्रत्येक पुरुष आणि महिला संघातून सुमारे ६० प्रतिभावान आणि नवीन अनुभवी खेळाडू प्रशिक्षण शिबिरात भाग घेतील. शिबिरामुळे खेळाडूंना एक संघ म्हणून एकमेकांसोबत काम करण्याची आणि खेळ जिंकण्यासाठी सर्वोच्च स्तरावर काय आवश्यक आहे शिकण्याची संधी मिळेल. राष्ट्रीय शिबिरे सर्व खेळाडूंना एकत्रित संघ म्हणून तयारीसाठी एकत्र आणतात. प्रशिक्षण शिबिरातील कामगिरीच्या आधारे विश्वचषकासाठी अंतिम संघ निवडला जाणार आहे. सुमारे १६ प्रशिक्षक आणि सहायक कर्मचारी महत्त्वाच्या स्पर्धेच्या तयारीसाठी खेळाडूंना मदत करतील.

### दिल्ली एफसीचा श्रीनिदी डेक्कनविरुद्ध पहिला विजय

**हैदराबाद** : दिल्ली एफसीने सोमवारी येथे डेक्कन एरिना येथे इंडिया लीग फुटबॉल सामन्यात श्रीनिदी डेक्कन एफसीविरुद्ध १-० असा विजय मिळवून गुणतालिकेच्या तळापासून स्वतःला वर काढले. दिल्लीकडून सामन्यातील एकमेव गोल स्टीफन बिनोंगने केला. श्रीनिदी डेक्कनचा हंगामातील हा दुसरा पराभव होता आणि २०२२-२३ हंगामामध्ये डेक्कन एरिना येथे सामने आयोजित केल्यापासून ते आय-लीगमधील घरच्या सामन्यात गोल करण्यात अपयशी ठरण्याची पहिलीच वेळ होती. परिणामी, डेक्कन वॉरियर्सची गुणतालिकेत शीर्षस्थानी जाण्याची संधी कायम असून सध्या ते चार सामन्यांतील सहा गुणांसह पाचव्या स्थानावर राहिले. दिल्ली एफसीने तेवढ्याच सामन्यांतून चार गुणांसह १० वे स्थान मिळविले आहे. आदल्या दिवशी श्रीनगरमध्ये १-१ अशी बरोबरी खेळणाऱ्या इंटर काशी आणि रिअल काश्मीर एफसी यांच्याकडे प्रत्येकी आठ गुण आहेत आणि माजी गोल फरकाने अव्वल स्थानावर आहे. चर्चिल ब्रदर्स आणि डेम्पो एससी प्रत्येकी सात गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहेत.

### डॉ. मांडविया यांच्या हस्ते कर्णबधिर खेळाडूंचा सत्कार

**नवी दिल्ली** : १० व्या आशिया-पॅसिफिक डेफ गेम्समध्ये ऐतिहासिक कामगिरी केल्यानंतर क्वालंपूरहून यशस्वी परतल्यानंतर भारतीय संघाचा सोमवारी येथे केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत भारताने ५५ पदके जिंकलीत. विशेष म्हणजे भारताने २०१५ मध्ये जिंकलेल्या पदकांच्या तुलनेत ११ पटीने जास्त पदके जिंकलीत. गत स्पर्धेत भारताने ५ पदके जिंकली होती. ४२ पुरुष आणि २६ महिलांसह ६८ सदस्यीय भारतीय संघाने अभूतपूर्व कामगिरी करत ८ सुवर्ण, १८ रौप्य आणि २९ कांस्य पदके जिंकून २१ देशांमध्ये पाचवे स्थान पटकावले. १९८४ मध्ये प्रारंभ झालेल्या या स्पर्धेतील ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी ठरली. केंद्रीय मंत्र्यांनी त्यांच्या निवासस्थानी विशेष संवाद साधताना प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफसह भारतीय संघाचे अभिनंदन केले

# रोहितला स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही : कपिल देव

**नवी दिल्ली, ९ डिसेंबर**

संघर्षशील भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माला स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही व काही कमी कामगिरीनंतर त्याच्या कर्णधारपदावर शंका घेणे योग्य नाही, असे मत भारतीय संघाचे माजी कर्णधार कपिल देव यांनी व्यक्त केले.

सहा महिन्यांच्या काळात रोहितने टी-२० विश्वचषक विजेता म्हणून लौकीक मिळविला, मात्र आता कसोटी संघातील त्याचे स्थान चर्चेचा विषय झाला आहे.

बार्बाडोसमधील रात्रीपासून रोहित शर्माची बॅट शांत झाली आहे. कसोटी क्रिकेटमध्ये तो सध्या वाईट परिस्थितीतून जात आहे.

बंगळुरूमधील न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत त्याच्या सर्वात कमी ४६ धावा झाल्या. बॉर्डर-गावस्कर चषकांत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ॲडिलेडमध्ये झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यातही काही चाहत्यांनी रोहितच्या फलंदाजीच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



ॲडिलेडमध्ये भारताला १० गड्यांनी पराभव पत्करावा लागला. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताचा हा सलग चौथा कसोटी पराभवाचा ठरला.

अनुभवी सलामीवीराभोवती शंका व टीका होत असताना, १९८३ च्या विश्वचषक विजेत्या कर्णधार कपिल देवने ३७ वर्षीय रोहित शर्माच्या प्रतिभा व क्षमतेवर विश्वास व्यक्त करून रोहितच्या समर्थनार्थ पुढे आला आहे.

मला वाटते की रोहितला स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही. त्याने अनेक वर्षांपासून उत्तम कामगिरी केली आहे. त्यामुळे आपण कोणावर तरी शंका घेऊ नये. मला आशा आहे की आपल्या फॉर्ममध्ये परत येईल, हे अधिक महत्त्वाचे आहे. एक-दोन कमी कामगिरीमुळे कुणीही त्याच्या कर्णधारपदावर शंका धेऊ नये, असे कपिलने एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांना सांगितले. (वृत्तसंस्था)

# गुकेशला नमवून डिंग बरोबरीत




## दोघांचे प्रत्येकी ६ गुण

**सिंगापूर, ९ डिसेंबर**

येथे आयोजित फिडे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत सोमवारी १२ व्या फेरीच्या सामन्यात गतविजेता चीनच्या डिंग लिरेनने जोरदार मुसंडी मारत भारतीय ग्रॅण्डमास्टर गुकेश डोम्माराजूविरुद्ध ३९ चालीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच लिरेनने गुकेशसोबत प्रत्येकी ६ गुणांची कमाई करत स्पर्धेत बरोबरी मिळविली आहे.

गुकेशने ११ व्या डावांत लिरेनवर मात करून ६-५ अशी आघाडी घेतली होती व २४ तासांनंतर डिंग लिरेनने दमदार पुनरागमन करत महत्त्वपूर्ण विजय मिळवला.

गुकेशवर बोर्ड व वेळेचा प्रचंड दबाव होता व त्याला सात मिनिटांत १५ चाली खेळायच्या होत्या. अखेर चार मिनिटांपेक्षा कमी वेळ शिल्लक असल्यामुळे दोन्ही खेळाडूंकडून झटपट चाली खेळल्या गेल्या. डिंग लिरेनने ३९ व्या चालीत आपला विजय निश्चित केला. अकराव्या फेरीच्या लढतीत गुकेशने लिरेनला डाव सोडण्यास भाग पाडले होते.

आता स्पर्धेच्या दोन फेऱ्या शिल्लक असताना जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत हे दोघेही जण ६-६ गुणांसह समान पातळीवर आहे. आता विश्वविजेता होण्यासाठी डी. गुकेशला पुढील फेऱ्यांमध्ये पुढाकार घेणे आवश्यक आहे.

११ व्या फेरीतील पराभवानंतर डिंग लिरेनचा चुराडा होण्याची शक्यता आहे, असे भाकीत माजी विश्वविजेता मॅग्नस कार्लसनने केले आहे.

तीन आठवड्यांपासून सिंगापूरमध्ये जोरदार रणसंग्राम सुरू आहे. डिंगने वर्ल्ड चॅम्पियनशिपचा पहिला गेम जिंकला. गुकेशने तिसरा डाव जिंकला. तेव्हापासून सात डाव अनिर्णीत राहिले. (वृत्तसंस्था)

# खुल्या गटात प्रथमेश सुपाते, प्रतिमा टोणपे अजिंक्य



## महाविद्यालयीन कराटे शिवदारे महाविद्यालयात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत खुल्या पुरुष गटात श्री. संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढेच्या प्रथमेश सुपाते व महिला गटात संगमेश्वर महाविद्यालयाच्या प्रतिमा टोणपे यांनी अजिंक्यपद पटकाविले.

व्ही. जी. शिवदारे कॉलेजने ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे उद्घाटन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. बी. व्ही. शेटे, प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे, प्राचार्य डॉ. जी. के.कापसे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे, कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र जनरल सेक्रेटरी संदीप गाडे, समन्वयक संगीता जाधव, आंतरराष्ट्रीय कराटेपटू भुवनेश्वरी जाधव, प्राचार्य डॉ. भंडारकवठेकर, झोनल स्पोर्ट्स कौन्सिल चेअरमन डॉ. अनमोल वळसंगे, प्रा. लक्ष्मीपुत्र गोटे, जिल्हा ॲमेचूर स्पोर्ट्स कराटे असोसिएशन प्रमुख भीमराव बाळगे आदी उपस्थित होते.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य प्रा. एन. के. देशपांडे, प्रा. बि.डी. वाघचौरे, प्रा. शरण वांगी, पात्रता समिती सदस्य डॉ. एस. एस. तोरवी, प्रा. डॉ. डी. एम. बिराजदार, विद्यापीठ निवड समितीचे चेअरमन प्रा. एम. बी.पाटील, प्रा.संतोष गवळी, डॉ. आनंद धवन आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. डी. डी. बनसोडे यांनी केले. डॉ. व्ही. एस. अडकी यांनी आभार मानले.

पंच म्हणून मिहीर जाधव, गौतम वाघमारे विश्वजीत हेंबाडे, गणेश जाधव, दत्तात्रय हेमाडे, शिवानी वाघमारे यांनी काम पाहिले .

**स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम व द्वितीय) : पुरुष -** ५० किलो : रितेश शिंदे (केबीपी, पंढरपूर), समर्थ जाधव (वालचंद) ५५ किलो : आशिष कोकाटे ( डॉ. गणपतराव देशमुख कॉलेज, सांगोला), शंतनू कुलकर्णी (वालचंद अभियांत्रिकी). ६० किलो :शिवराज बोळकुटे (एस.बी.पाटील,मंद्रूप), चंद्रकांत तवटे (डीएचबी सोनी). ६७ किलो : संतोष जाधव (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी), मचंक स्वामी (सांगोला महाविद्यालय). ७५ किलो : आदित्य कळसे (माऊली, वडाळा), प्रणित गडहिटे (डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला). ८४ किलो : गणेश जाधव (दलित मित्र कदम गुरुजी कॉलेज, मंगळवेढा). ८४ किलोवरील : प्रथमेश सुपाते (श्री संत दामाजी, मंगळवेढा), कुबेर बनसोडे (सांगोला कॉलेज).

**महिला -** ४५ किलो : रेशम खान (संगमेश्वर), पायल शेंडे (एसएमपी कॉलेज, नातेपुते), ५० किलो : नक्षत्रा पकाले (हिराचंद नेमचंद), प्रीती राठोड (एसबीपी कॉलेज, मंद्रूप). ५५ किलो : दिपाली मदने (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी), प्राची साळुंखे (डीएसजी कॉलेज, मोहोळ). ६१ किलो : सृष्टी पवार (केबीपी, पंढरपूर), स्वामिनी डोळसे (कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी), ६८ किलो : तेजस्विनी वाघमोडे (समीर गांधी महाविद्यालय, माळशिरस), रजनी गायकवाड (सोलापूर विद्यापीठ). ६८ किलोवरील : प्रतिमा टोणपे (संगमेश्वर), निदा शेख (छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज).




# वालचंद, जैन गुरुकुलची विजयी सलामी

## श्रीमान भाऊसाहेब गांधी चषक क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

वालचंद ज्युनिअर कॉलेज व जैन गुरुकुल प्रशालेने श्रीमान भाऊसाहेब गांधी क्रिकेट चषक क्रिकेट स्पर्धेची विजयी सलामी दिली.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर वालचंद ज्युनियरने वालचंद नॉन टिचींगवर ११ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना आठ षटकांत ६ बाद ५५ केल्या. धनंजय शहा यांनी १६ धावा केल्या. प्रसन्न कुमार पल्ली १६ धावात ४ तर राहुल हजारे व अनुप म्हेत्रे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. वालचंद नॉन टीचिंग संघास ८ बाद ४४ धावांच करता आल्या.

दुसऱ्या सामन्यात जैन गुरुकुल प्रशालाने सिक्युरिटी संघाचा ५ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत असताना सिक्युरिटी टीमने ७.४ षटकात सर्व बाद ५२ धावा केल्या. जैन गुरुकुलने अवघ्या ६.२ षटकांत ५ गडी गमावित हे लक्ष्य गाठले. यात वैभव परिचारक १४, नागनाथ येळेगावकर १३ धावा केल्या. अमित दुरुगकर याने नऊ धावांत पाच तर येळेगावकर व मगदूम यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

याचे उद्घाटन संस्थेचे सचिव डॉ. रणजित गांधी, भूषण शहा, वैभव गांधी, ब्रिजेश गांधी, वालचंदचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, हिराचंद नेमचंदचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, जैन गुरुकुलचे मुख्याध्यापक राजकुमार काळे, फिजिओथेरपिस्ट डॉ. संकेत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या स्पर्धेसाठी संस्थेचे विश्वस्त पराग शहा यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांनी केले.

# लाल चषक शरीरसौष्ठव स्पर्धा १८ डिसेंबरला

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

लाल चषक पुरुष व महिला गटाची निमंत्रित शरीरसौष्ठव स्पर्धा बुधवार १८ डिसेंबर रोजी बापूजी नगर येथील मारुती मंदीरजवळील कॉ. मशप्पा विटे क्रीडांगणावर होईल.

श्री. आदि जांबमुनी महाराज रथोत्सव निमित श्रीनिवास म्हेत्रे मित्र परिवाराने महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन, सोलापूर व पुणे बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या संयुकत विद्यमाने आयोजित केली आहे. विजेत्यास ११ हजार तर बेस्ट पोझर व मोस्ट इम्प्रुव्हडला प्रत्येकी ३ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. ही स्पर्धा ५५, ६०, ६५, ७०, ७५, ८० किलो आणि ८० किलोवरील गटात होईल. यासाठी प्रत्येक गटातील प्रथम सहा खेळाडूंना ५ हजार ते पंधराशे रुपयेपर्यंतचे पारितोषिक देण्यात येईल. महिलांची खुल्या गटात स्पर्धा होणार यात प्रथम सहा महिलांना ५ हजार ते पंधराशे रुपयेपर्यंतची बक्षिसे देण्यात येतील.

इच्छुकांनी जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव प्रमोद काटे (मो. ९४२२३८००३३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक श्रीनिवास म्हेत्रे यांनी केले आहे.

# सोलापूरच्या आकृती सोनकुसरेचा मुख्य फेरीत प्रवेश

## ओॲसिस सोलापूर ओपन २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस : ईश्वरी मातेरे, स्मिती भसीन, पूजा इंगळे, बेला ताम्हणकर यांचीही बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एम एसएलटीए-एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत भारताच्या आकृती सोनकुसरे, ईश्वरी माथेरे, स्मिती भसीन, पूजा इंगळे, बेला ताम्हणकर, ललित्या कल्लुरी या खेळाडूंनी मुख्य फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील एम.एस.एल.टी.ए. टेनिस सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत वाईल्ड कार्डद्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या आकृती सोनकुसरे हिने आठव्या मानांकित पवनी पाठकचा ३-६, ६-४, १०-७ असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला. भारताच्या ईश्वरी माथेरेने दहाव्या मानांकित प्रत्युशा रचापुडीवर ६-४, ३-० असा विजय मिळवला. तिसऱ्या मानांकित स्मिती भसीन हिने लक्ष्मीश्री दांडू हीस ६-२, ६-४ असे नमविले. बिगरमानांकीत पूजा इंगळेने तेराव्या मानांकित वंशिता पठणीयाचा ६-१, ६-१ असा सहज पराभव करून मुख्य फेरी गाठली. चौदाव्या मानांकित बेला ताम्हणकरने सिरी पाटीलचा ६-१, ०-६, १०-८ असा पराभव करून आगेकूच केली.

मुख्य ड्रॉ मधील खेळाडूंची मानांकन यादी जाहीर करण्यात आली. एकेरीत थायलंडच्या थासापोर्न नाकलोहिला अग्रमानांकन देण्यात आले आहे. तर भारताच्या सहजा यमलापल्लीले दुसरे मानांकन देण्यात आले आहे.

**मानाकंन यादी : एकेरी:** १. थासापोर्न नाकलो (थायलंड), २ सहजा यमलापल्ली (भारत), ३ राकोटोमंगा राजोनाह, तिएंसोआ सारा (फ्रांस), ४ झिबेक कुलंबायेवा (कझाकस्तान), ५ श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती (भारत), ६ एकतेरिना याशिना (रशिया), ७. व्हॅलेंटीनि जी(ग्रीस), ८ डायना मार्सिन्केविका(लात्विया). **दुहेरी:** १.व्ही ग्रामीतीकोपोलु व्ही(ग्रीस)१ याशिना, एकतेरिना, २.पावलीकोव्स्का, झी(पोलंड) २/ राकोटोमांगा राजानाह, टी(फ्रांस), ३.काझिओनोव्हा, ई ३ /रेयनगोल्ड, एकतेरिना (रशिया) , ४.रिया भाटिया / झील देसाई(भारत)४

**अन्य पात्रता फेरीचे अंतिम निकाल :** इवा गरकुशा१(रशिया) वि.वि. अभया वेमुरी(भारत) १२ ६-१, ६-२; ललित्या कल्लुरी(भारत) वि.वि. व्हॅलेरिया मोंको(रशिया) ०-६, ६-४, १०-६; मारिया मिखाइलोवा(रशिया)४ वि.वि.यशस्विनी पन्वर(भारत)१५ ४-६, ६-२, १०-४;






### सोलापुरने आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करणे कौतुकाची बाब : राज्य उत्पादन शुल्क अधिक्षिका भाग्यश्री जाधव

सोलापूर सारख्या ठिकाणी गेल्या नऊ वर्षापासून खास महिला करिता लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन केलं जातं ही सोलापूरच्या दृष्टिकोनातून कौतुकाची बाब असून याचा आदर्श राज्यातील इतर जिल्ह्यांनी घ्यावा आणि महिलांना खेळांमध्ये चांगल्या प्रकारची संधी उपलब्ध करून द्यावी, असे मत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षिका भाग्यश्री जाधव यांनी व्यक्त केले. या स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रीय टेनिस खेळाडू संध्याराणी बंडगर, बालाजी अमाईन्सचे राम रेड्डी, शर्ली डिसोजा, प्रिसिजनच्या मयुरा शहा, सिद्धार्थ गांधी, डॉ. शंतनु गांधी, डॉ प्रदीप सिंघल, नितीन कन्नमवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भाग्यश्री जाधव यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून या महिला लॉन टेनिस स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी भाग्यश्री कुलकर्णीच्या गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. राजीव देसाई यांनी सूत्रसंचालन केले.



## प्रा. सावंत पुन्हा आरोग्यमंत्री होण्यासाठी शिवसैनिकांचे विठुरायाला साकडे

**सोलापूर,दि. ९ डिसेंबर-**

मागील सरकारच्या काळात राज्याचे आरोग्यमंत्री असलेले तानाजीराव सावंत पुन्हा एकदा आरोग्यमंत्री व्हावेत यासाठी सोलापुरातील आणि जिल्हाभरातील शिवसैनिकांनी विठुरायाला साकडे घालत दुग्धाभिषेक करून महाआरती केली.

प्रारंभी शिवसेनेच्या सोलापुरातील पदाधिकाऱ्यांनी पंढरपुरात जाऊन नामदेव पायरी येथे वारकऱ्यांसमवेत टाळ मृदुंगाच्या तालावर भजन केले. यानंतर श्री विठ्ठलास आणि श्री रुक्मिणीमातेस दुग्धाभिषेक करून, तुळशीहार अर्पण करून महाआरती करण्यात आली. तानाजीराव सावंत पुन्हा एकदा महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री व्हावेत अशी प्रार्थना श्री विठुरायाकडे आणि श्री रुक्मिणीमातेकडे करण्यात आली. याप्रसंगी महिलांनी बा विठ्ठला आमच्या भावास पुन्हा एकदा आरोग्य मंत्री कर असे आशयाचे फलक हाती धरले होते. यावेळी शेकडो लाडक्या बहिणी, शिवसैनिक, युवा सैनिक उपस्थित होते. याप्रसंगी ह.भ.प. वासकर महाराज म्हणाले, आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत यांच्या पुढाकारातून वारकऱ्यांच्या सेवेसाठी अनेक महाआरोग्य शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांच्या माध्यमातून लाखो वारकऱ्यांची तपासणी, औषधोपचार करण्यात आले. या आरोग्य शिबिराची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्येही झाल्याचे ह.भ.प. वासकर महाराज यांनी सांगितले. शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शहर प्रमुख मनोज शेजवाल, युवासेना महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य सुजीत खुर्द, उमेश गायकवाड, युवा सेना शहर प्रमुख समर्थ मोटे, सागर शिंदे, युवा सेना जिल्हाप्रमुख बालाजी बागल, पंढरपूर शिवसेना शहर प्रमुख मुन्ना भोसले, उपजिल्हा प्रमुख संजय बंदपट्टे, संजय सरवदे शिवसैनिक उपस्थित होते.

## जनहित शेतकरी संघटनेच्या अध्यक्षासह ९ जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.९ डिसेंबर-**




लक्ष्मी दहिवडी येथे एका कंपनीच्या गेटचे कुलूप तोडून कंपनीत घुसून ७ लाख रुपये किंमतीचे सामान घेऊन गेल्याप्रकरणी जनहित शेतकरी संघटनेचे प्रभाकर उर्फ भैय्या देशमुख (रा. पाटकूल), किरण जाधव, राधिका जाधव (रा. सिध्देवाडी), दत्ता पवार (रा.बेगमपूर), जकप्पा उर्फ भैय्या शेजाळ (रा. हुलजंती) व अज्ञात ४ आदी लोकाविरुद्ध मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी बाबूराव दादासो बर्गे (रा.लक्ष्मी दहिवडी) हे दि. ५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता तयार झालेले पॅकबंद बाटली बॉक्स घेऊन विक्रीसाठी सांगोला येथे गेले होते. त्यांना दुपारी २ वाजता त्यांची पत्नी अश्विनी हिचा फोन आला. चार चाकी वाहनामध्ये काही लोक आले असून कंपनीच्या गेटचे कुलूप तोडून कंपनीमधील मशिनरी घेऊन जात आहेत, तुम्ही लवकर या असे म्हणताच फिर्यादी हे तात्काळ मोटर सायकलवरुन घटनास्थळी आले. यावेळी त्यांना गेटचे कुलूप तोडलेले व शटर उघडे दिसले. तसेच कंपनीतील मशिनरी काही लोक घेऊन जात असल्याचे निदर्शनास आले. यावेळी फिर्यादीस आरोपी भैय्या देशमुख गच्चीला धरुन म्हणाला तू मला ओळखले नाही का? मला सोलापूर जिल्ह्यातील लोक घाबरतात मी बऱ्याच जणांना कामाला लावले आहे. तू माझे का ऐकत नाही, ही कंपनी राधिका जाधवला का देत नाही असे म्हणून आरोपीने लोखंडी पाईपने फिर्यादीच्या पाठीवर, पायावर मारहाण केली. यावेळी फिर्यादी मारहाण करु नका? असे म्हणत असताना आरोपी किरण जाधव यांनी तुला लय मस्ती आली आहे तुझा माज उतरवतो असे म्हणत त्यानेही मारहाण केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. भांडणे सुरु असताना फिर्यादीची पत्नी मध्ये आल्यावर तिचे केस ओढून मारहाण केली. तसेच प्रभाकर देशमुख याने तिच्या अंगाला स्पर्श करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. घटनेचे मोबाईलमध्ये फिर्यादीची पत्नी शुटिंग करीत असताना तिचा मोबाईल राधिका हिने हिसकावून घेऊन फोडला. त्याच बरोबर फिर्यादीची पत्नी मोबाईलवर शुटिंग करीत असताना तो ही मोबाईल आरोपीने हिसकावून घेऊन जमिनीवर आदळून फोडला. (क्र. एम. एच. १३/ डी. क्यू. ४७३०) या व अन्य एका वाहनातून पेट ब्लाईंग मशिनचा अर्धा भाग, कोडिंग मशीन, लॅबमधील मशिनरी, लॅब केमिकल, व्हर्लफुल कंपनीचा फ्रिज आदी ७ लाख रुपये किंमतीचे साहित्य सदर वाहनात घालून घेऊन गेले. तसेच १ लाखाचे दोन मोबाईल जमिनीवर आदळून नुकसान केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या घटनेबाबत पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद लातूरकर हे करीत आहेत.

## सलगर परिसरातून २१ वर्षीय विवाहिता बेपत्ता; पालकांतून चिंता

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ डिसेंबर-**

सलगर परिसरातून २१ वर्षीय विवाहिता अचानक बेपत्ता झाली असून याची तक्रार तिच्या आईने मंगळवेढा पोलिसात दिल्याने त्या बेपत्ता विवाहितेचा पोलिस कसून शोध घेत आहेत. दरम्यान, गेल्या दोन आठवड्यात मंगळवेढा शहर व ग्रामीण भागातून मुली व विवाहिता बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढल्याने पालक वर्गातून चिंता व्यक्त होत आहे.

८ डिसेंबर रोजी रात्री ८.०० वा. राहत्या घरातून सदर २१ वर्षीय विवाहिता बेपत्ता झाली असून तिचा कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. तिचे वर्णन पुढीलप्रमाणे-रंगाने सावळी, अंगाने सडपातळ, उंची ५ फूट ३ इंच, चेहरा उभट, केस काळे, अंगात पंजाबी ड्रेस, पांढरी ओढणी, गळ्यात मंगळसूत्र अशा वर्णनाची विवाहिता निदर्शनास आल्यास त्यांनी तपासिक पोलिस नाईक बनकर यांच्याशी संपर्क साधावा.

# इच्छुक नव्या दमाच्या कार्यकर्त्यांनी आता पुढे यावे

### माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे: अक्कलकोट येथील बैठकीत आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.९ डिसेंबर-**

कार्यकर्ते मित्रमंडळींमध्ये संपर्क वाढवा, त्यांच्याशी बोलत राहा, तरच वातावरण निर्मिती होऊ शकते, पार्टीसाठी काम करावे लागते. सोन्याला सुद्धा आगीतून गेल्याशिवाय चकाकी येत नाही. तसेच राजकारणात आहे. त्यामुळे संघर्षाची तयारी ठेवा. आता इच्छुक नव्या दमाच्या कार्यकर्त्यांनी पुढे आले पाहिजे. आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, अशी ग्वाही सिद्धाराम म्हेत्रे यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे काँग्रेस सोडणार आणि राष्ट्रवादीत जाणार, अशा अफवांचे पेव फुटले होते. या पार्श्वभूमीवर काँग्रेस कार्यालयात झालेल्या बैठकीत सिद्धाराम म्हेत्रे यांनी आपण काँग्रेस कधीच सोडणार नसून, यापुढे काँग्रेसचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून काम करत राहणार असल्याची ग्वाही दिली.म्हेत्रे म्हणाले, शेवटी कुठेतरी थांबावेच लागते. मी याचवेळी थांबणार होतो. परंतु त्या उमेदवारासमोर मल्लिकार्जुन पाटील किंवा अन्य कोणीही टिकले नसते. म्हणून मी मैदानात उतरलो. नव्या दमाच्या इच्छुकांनी तयारीला सुरुवात करावी, ज्यावेळेला पक्षाचे महत्त्वाचे काम असते त्यावेळेस मला हे काम आहे, मला ते काम आहे, असे म्हणून टाळणे चुकीचे आहे. मल्लिकार्जुन पाटील यांच्याकडे अजून विधानसभा लढवण्याची ताकद नव्हती. त्यासाठी मोठी तयारी करावी लागते. आता पुन्हा नव्याने संघर्षाला सुरुवात करण्याची वेळ आली आहे. आता जे इच्छुक आहेत त्यांनी अधिक सक्रिय राहिले पाहिजे. सोन्याला सुद्धा आगीतून गेल्याशिवाय चकाकी येत नाही. तसेच राजकारणात आहे. त्यामुळे संघर्षाची तयारी ठेवा. मल्लिकार्जुन पाटील किंवा अन्य कोणी असतील त्यांनी तयारी ठेवावी.आता नव्या नेतृत्वाने पुढे आले पाहिजे. आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू, असे स्पष्ट करून म्हेत्रे म्हणाले, राजकीय संघर्ष करताना भांडण-तंटे, कोर्ट कचेरी या सगळ्याची तयारी ठेवावी लागते. मी १९९६ पासून संघर्ष करत होतो. मध्यंतरी मी भाजपमध्ये जाणार, अशी हवा होती. भाजपमध्ये जाण्याचा विचार होता मात्र जातो असे कधीच म्हणालो नाही, असा खुलासा करून ते म्हणाले, आता देखील मी काँग्रेस सोडणार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाणार या अफवा आहेत, यावर कोणीही विश्वास ठेवू नका असेही म्हेत्रे यांनी सांगितले.

> खोलीत बोलतो. एक मिनिटात बाहेर कळते, गाडीत बोलतो, दुसऱ्या मिनिटाला मला बाहेरून फोन येतो की तुम्ही असे असे बोललात. ही माहिती नेमकी विरोधकांना पुरवतो कोण? असे जर पक्षामध्ये होत असेल तर काँग्रेस पक्षाचे कल्याण कसे होणार सवाल उपस्थित करून यापुढे नव्या दमाच्या कार्यकर्त्याला पुढे करून आपण आपली भूमिका निष्ठेने बजावणार आहे.
> **-सिध्दाराम म्हेत्रे, माजी मंत्री**



यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, माजी सभापती सिद्धार्थ गायकवाड, ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन काटगाव, माजी नगराध्यक्ष अशपाक बळोरगी, सद्दाम शेरीकर, शहर काँग्रेसचे अध्यक्ष रईस टिनवाला, लाला राठोड, आशफाक आगसापुरे, सुनील खवळे, शाकीर पटेल आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित काही कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा विजयाचा गुलाल लागल्याशिवाय राजकीय निवृत्ती घेऊ नका, असे आवाहन माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांना केले.

## पंढरीत मंगळवारी बांगलादेश हिंदू न्याय यात्रा

### मोर्चेकरी देणार तहसीलदारांना निवेदन; हिंदू बांधवांना सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ डिसेंबर-**

बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अन्यायविरुद्ध आवाज उठवण्यासाठी मंगळवारी १० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता हिंदू न्याय (मुकमोर्चा) यात्रेचे सकल हिंदू समाज पंढरपूर शहर व ग्रामीण यांच्या तर्फे येथे आयोजन करण्यात आलेले आहे. दरम्यान शासनाचे प्रतिनिधी या नात्याने येथील तहसीलदारांना हे मोर्चेकरी निवेदन देणार आहेत.

या मोर्चासाठी येथील टिळक स्मारक मैदानावर मंगळवारी सकाळी दहा वाजता सर्वांनी उपस्थित रहावे असे देखील सांगण्यात आलेले आहे. शहरातील टिळक स्मारक मैदानावरुन या हिंदू न्याय यात्रेस (मुकमोर्चा) सुरुवात होणार आहे. ही यात्रा किंवा हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते वीर सावरकर पथ या मार्गे तहसील कार्यालयावर धडकणार आहे. या ठिकाणी शासनाचे प्रतिनिधी म्हणून तहसीलदारांना निवेदन देखील दिले जाणार आहे. या हिंदू न्याय यात्रेत सकल हिंदू समाज पंढरपूर शहर व ग्रामीण भागातील हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

> **मी उपस्थित राहणार, आपणही राहणार ना?**
> सकल हिंदू समाज पंढरपूर शहर व ग्रामीण या मुकमोर्चाच्या आयोजकांकडून ज्यांना वाटते बांग्ला हिंदु आहेत, आपले बंधु आहेत त्या सर्व हिंदू बांधव आणि भगिनींनी या मोर्चात मोठ्या संख्येने अवश्य सहभागी व्हावे. कारण प्रत्येक हिंदूने मी स्वत: जातीने उपस्थित राहणार आहे, आपणही या मोर्चासाठी उपस्थित राहणार ना? असे स्वत:शी ठरवून या यात्रेत आपला सहभाग नोंदवुन आपल्यासह आपले आप्तस्वकीय तसेच गावातील आणि शहरातील आपल्या हिंदू बांधवांना देखील या बाबत जागृक करुन या हिंदू मूक मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन देखील यावेळी करण्यात आले आहे.

## नेटवर्क नसल्याने ग्राहकांची अडचण

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ९ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात जिओच्या नेटवर्कचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. मागील अनेक महिन्यांपासून पिलीव परिसरात जिओचे नेटवर्क व्यवस्थित नसल्यामुळे ग्राहक अक्षरशः वैतागले आहेत.

माळशिरस तालुक्यातील पिलीव हे एक मोठी बाजारपेठ असणारे गाव आहे पण या ठिकाणी नेटवर्क व्यवस्थित मिळत नाही. यामुळे उद्योग व्यवसायास मोठा अडथळा येत आहे. सध्याच्या तंत्रज्ञान युगात सर्वत्र कामे ही ऑनलाईन होत असून नवनीवन तंत्रज्ञानाचा उपयोग किंवा वापर करण्यासाठी चांगले नेटवर्क असणे फार आवश्यक आहे. सुरुवातीला जिओने चांगल्या चांगल्या ऑफरसह ग्राहकांना दिल्यामुळे जिओने आपल्याकडे ग्राहक मोठ्या संख्येने खेचले खरे आणी मार्केटमध्ये सर्वाधिक ग्राहक जिओने स्वत:कडे खेचत अक्षरशः धुमाकूळ घातला खरे पण नेटवर्क प्रॉब्लेम आल्यामुळे ग्राहकांची गळती सुरु झाली आहे. पिलीव परिसरात जिओकडून ग्राहकांना अजिबात चांगली सेवा मिळत नाही. याबाबत कंपनीकडे वारंवार ग्राहक तक्रार करीत आहेत पण अधिकारी याबाबत बेदखलच आहेत.पिलीव परिसरात गेल्या अनेक दिवसापासून जिओ नेटवर्कचा अक्षरशः लपंडाव सुरू आहे. यामुळे नागरिकांना कॉलिंग करणे,मेसेज पाठविणे,एखादी फाईल डाऊनलोड करणे किंवा फाईल ट्रान्स्फर करणे किंवा नवीन माहिती शोधणे नेटवर्क नसल्यामुळे काहीच करता येत नाही फक्त मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत अधिकाऱ्यांनी रेंजमध्ये येऊन नेटवर्क मध्ये सुधारणा करावी अन्यथा पिलीव परिसरातील जिओचे ग्राहक इतर कंपनीकडे वळतील हे जवळपास नक्की झाले आहे. कारण मोठ मोठ्या रक्कमेचा बॅलन्स करुनही ग्राहकांना चांगली सेवा मिळत नाही. हा मनस्ताप ग्राहक अजून किती दिवस सहन करीत आर्थिक भुरदंडही किती दिवस सहन करणार? यामुळे जिओ कंपनी अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## वाळू माफियांनी दिली कोतवालास जीवे मारण्याची धमकी; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ डिसेंबर-**

माचणूर येथील भीमा नदीपात्रातून तुम्ही वाळू का ओढता याची विचारणा केल्याने येथील कोतवाल संजय राजाराम कुरवडे (वय ४२,रा.माचणूर) यांना शिवीगाळी,दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी रोहित गवळी-भोसले (रा. भालेवाडी), ऋषिकेश सुरेश पवार (रा. अर्धनारी) या दोघांविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी संजय कुरवडे हे माचणूर सजेत कोतवाल या पदावर कार्यरत असून दि.६ डिसेंबर रोजी पहाटे १.४५ वा. येथील भीमा नदीपात्रात वरील आरोपी वाहन घेऊन वाळू भरण्यास आल्याची कुणकुण लागताच फिर्यादी हे नदीपात्राकडे जात असताना रस्त्यामध्ये आरोपींना वाळू का ओढता असे विचारल्यावर वरील आरोपीने शिवीगाळी,दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. दरम्यान,सध्या जिल्ह्यात वाळूचा लिलाव कोठेही झाला नसल्याने वाळू चोरीचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र आहे.मंगळवेढ्यात दोन वाळूची वाहने पोलिसांनी पकडली,एका वाहनावर गुन्हा दाखल करण्यात आला असून दुसरा वाळूचा



टिप्पर पोलिस स्टेशनच्या मैदानात सोमवारी सकाळी १०.०० वा. लावण्यात आला होता. याबाबत पोलिसांकडे अधिक चौकशी केली असता पावती दाखवल्याने तो सोडून देण्यात आल्याचे सांगण्यात आले.शासकिय मालमत्तेची चोरी रोखणे हे महसूल व पोलिस प्रशासनाचे आद्यायावत कर्तव्य असून याला अटकाव घालावा अशी सुज्ञ नागरिकांतून मागणी होत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व आसपासचे लोकांस खालील सही करणारे आमचे अशिलातर्फे सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील सि.स.नं. ६१५ याचे क्षेत्र ९२.९० चौ.मी. यासी चतुःसिमा- पूर्वेस- मक्के यांची जागा, दक्षिणेस- दादा चव्हाण यांची जागा, पश्चिमेस- मधुकर निकम यांची जागा, उत्तरेस- डांबरी रस्ता. येणेप्रमाणे जागा याची वागणूक व पाणी उत्तर बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. अशी मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह वर नमूद मिळकत ही शेखर कांतीलाल भोसले, रा. बार्शी यांचे खरेदी मालकी, कबजे वहिवाटीची व हक्कपत्रकी नोंदलेली मिळकत आहे.

सदर मिळकतीसंबंधाने आमचे अशिल नामदेव खंडू चव्हाण यांनी खरेदीचा व्यवहार ठरवला होता. त्याबाबत आमचे अशिलाने दिव्य मराठी या वृत्तपत्रात दिनांक २२/१०/२०२४ रोजी खरेदीपूर्व जाहीर नोटीस देवून हरकती मागविल्या होत्या. परंतु आमचे अशिल व शेखर कांतीलाल भोसले यांचेतील व्यवहार दोघांनी आपसमजुतीने संपुष्टात आणलेला आहे व सदर व्यवहार रद्द केलेला आहे. सदर मिळकतीशी आता आमचे अशिलाचा काहीही संबंध राहिलेला नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.
तारीख : ०९/१२/२०२४

सही/-
**नामदेव खंडू चव्हाण,**
अशिल

सही/-
**किशोर व्ही. करडे, ॲडव्होकेट**
**गणेश मोहन फावडे, ॲडव्होकेट,**
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. नं. ८८३००३२९३९
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

### जाहीर समन्स/नोटीस

**आरटीएस अपिल नं. ४०६/२०२३**
पुढील नेमलेली तारीख १५/०१/२०२५

**सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात**

१) **निर्मला अमृतराव वायकर,** वय ५५ वर्षे, धंदा- शेती, रा. पिंपरी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **रमन आबाराव चव्हाण,** वय ३० वर्षे, धंदा- शेती, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अपेलंट**

**- विरुद्ध -**

१) **रमेश दाजी भोसले,** वय ३० वर्षे, धंदा- शेती, रा. पिंपरी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **जयवंत अमृतराव वायकर,** वय ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. पिंपरी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर
— **रिस्पॉडंट**

ज्याअर्थी, अपेलंट यांनी रिस्पॉडंट नं. १ रमेश दाजी भोसले, रिस्पॉडंट नं. २ जयवंत अमृतराव वायकर, दोघे रा. पिंपरी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे विरुद्ध मौजे पिंपरी (पा), ता. बार्शी येथील फेरफार नोंद नंबर १४३६ त्याबाबतची तक्रार नोंद सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलाचे कामी सदर रिस्पॉडंट नं. १ व २ यांना वारंवार रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठवूनही ते हजर नाहीत तसेच त्यांच्या सद्याचा ठावठिकाण माहित नसल्याने नोटीसची बजावणी झालेली नाही. त्यामुळे त्यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमलेली तारीख १५/०१/२०२५ रोजी सदर कामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावेत. मुदतीत तुमची हरकत वा म्हणणे आले नाही तर तुम्हास काही सांगणे नाही, असे समजून तुमचे गैरहजेरीत पुढील चौकशी होवून न्याय निर्णय होवून.

कळावे, हे जाहीर समन्स/नोटीस मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली असे.
तारीख : ०४/१२/२०२४

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**मे. उपविभागीय अधिकारी सो., सोलापूर**
उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १,
सोलापूर

### जाहीर प्रसिद्धीकरण
**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**दि. कि. अर्ज नंबर ७८/२०२४ नि.नं. ०५**
पुढील नेमलेली तारीख ०८/०१/२०२५
कोर्टाचे नांव - श्रीमती जी.एस. पाटील सो.

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

१) **श्री. स्वप्नील बळीराम काजळे,** वय ३३ वर्षे, धंदा- शेती
२) **श्री. संकेत बळीराम काजळे,** वय २८ वर्षे, धंदा- नोकरी
३) **सविता बळीराम काजळे,** वय ५४ वर्षे, धंदा- घरकाम,
सर्व रा. गौडगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

अर्जदार तर्फे जाहीर प्रसिद्धीकरण खालील प्रमाणे-

१) डि. धाराशिव, सब डि. व ता. तुळजापूर पैकी मौजे तुळजापूर रुरल हद्दीतील खुल्या प्लॉट जागा असून त्याचा मूळ सर्व्हे नंबर २ पैकी बिनशेती पत्रक क्रमांक १९९०/जे.एम.बी. सि.आर./१५७ मा. उपजिल्हाधिकारी कार्या. उस्मानाबाद दिनांक २०/११/१९९० अन्वये सदरील जागा नगर रचना उस्मानाबाद यांचेकडील पत्रक क्रमांक ८९८ दिनांक १८/८/९० अन्वये मंजुरी मिळालेल्या प्लॉट नं. ४ या जागेचे वर्णन खालील प्रमाणे-

गट नंबर ८०/२ खाते क्रमांक ५५७ प्लॉट नंबर ०४ क्षेत्रफळ- हे.आर. ०.०१.५७ (लांबी दक्षिण-उत्तर १५ मि. व रुंदी पूर्व-पश्चिम १०.०५ मि.), चतुःसिमा- पूर्व- प्लॉट नंबर ५, दक्षिण- ९ मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता, पश्चिम- प्लॉट नंबर ०३, उत्तर- सर्व्हे नंबर ७८ ची जागा.

२) वर नमूद खुले प्लॉट जागेवर मयत बळीराम अंबादास काजळे यांचे नाव असून सदर प्लॉट जागेवर अर्जदार यांचा कब्जा असून त्यातील झाडझुडुप माती इत्यादी तदंगभूत वस्तुसह. वर नमूद मिळकत ही अर्जदार नं. १,२ यांचे वडील व अर्जदार नं. ३ यांचे पती मयत बळीराव अंबादास काजळे यांचे मालकीची व कबजे वहिवाटीची प्लॉट जागा असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावाची मालकी हक्क सदरी नोंद आहे. अर्ज कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही मयत बळीराम काजळे यांचे नावे ७/१२ हक्कपत्रकी दाखल असून हे बळीराम काजळे हे दि. ०१/०९/२०२० रोजी जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी येथे मयत झाले आहेत. त्यांचे मृत्यूची नोंद बार्शी नगरपरिषद येथे आहे. सबब वर नमूद मिळकती संदर्भात वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्जदार यांनी प्रकरण दाखल केलेले आहे.

सबब त्याअर्थी उपरोक्त अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजावणेचे असलेस हे जाहीर प्रसिद्धीकरण झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत अगर नेमली तारीख ०८/०१/२०२५ पर्यंत वर नमूद मे. कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. तसे मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखवल्यास सदरहू कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लागलीच पुढील यथायोग्य आदेश करतील व मयतांचे कायदेशीर वारस हक्क असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. हा जाहीरनामा मे. कोर्टाच्या आदेशाने व सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिला असे.
तारीख : ०६/१२/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

### दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर
### शाखा : बार्शी

**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार शिवशंकर दिगंबर डोंबे राहणार बार्शी या नावावर लॉकर खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांचा अर्जदार- विवेकानंद शिवशंकर डोंबे - मुलगा यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसांचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमूद केलेल्या लॉकर खात्यास अर्जदार विवेकानंद शिवशंकर डोंबे यांचे नांव वारस हक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे !

पंढरपूर
तारीख : ३०/११/२०२४

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि.,पंढरपूर

### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३४३/२०२४**

१) **सतीश माधव बोकेफोडे,**
रा. भीमनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील एस. व्ही. जाधव)
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे मुलगी लक्ष्मी सतीश बोकेफोडे. रा. भीमनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १७ सप्टेंबर १९८७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी लक्ष्मी सतीश बोकेफोडे यांचा दिनांक १७ सप्टेंबर १९८७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३१७/२०२४**

१) **अल्फिया जुबेर बागवान,**
रा. अमन चौक, बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील व्ही. एस. वाघमारे)
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार. रा. अमन चौक, बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १९ फेब्रुवारी १९९८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १९ फेब्रुवारी १९९८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

# ‘त्या’ गट प्रवर्तकाची आज होणार सुनावणी!

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नवले देणार निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

जिल्ह्याच्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव आरोग्य केंद्रातील गटप्रवर्तकाच्या विरोधात एका आशा स्वयंसेविकेने तक्रार दिली होती. या संदर्भातील चौकशी अहवाल जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.संतोष नवले यांच्याकडे सादर करण्यात आला होता.

त्या संदर्भात आज मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी डॉ.नवले यांच्यासमोर सुनावणी होणार आहे. दरम्यान, कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) आरोग्य केंद्रातील एका गटप्रवर्तकाच्या विरोधातील तक्रारींबद्दल जिल्हा समन्वयक बबिता शिंदे यांनी सादर केलेल्या याअहवालात गटप्रवर्तकाच्या कामकाजात आर्थिक अनियमितता आढळली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पुन्हा चौकशी करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार सदरची फेरचौकशी करून त्या प्रकरणावर आज सुनावणी होणार आहे.

**काय आहे प्रकरण**
गटप्रवर्तक जमेला नदाफ आशा सेविकांना सापत्नभावाची वागणूक देतात. त्यांच्या मर्जीतील सेविकेच्या खात्यावर जादा मोबदला जमा करून आर्थिक गैरव्यवहार करतात. मोबदल्याची चिठ्ठी देत नाहीत, अशा आशयाच्या तक्रारी होत्या. याबाबत आशा सेविका रेखा बगले यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती.

**दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय घेऊ.**
जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडे दाखल झालेल्या तक्रारीनुसार, दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन, त्या प्रकरणावर सुनावणी करण्यात येईल.
**- डॉ. संतोष नवले,**
**जि.प. आरोग्य अधिकारी**

# रखडलेल्या जलसंधरण कामांना येणार गती!

- **जलसंधरण अंतर्गत होणार सिमेंट बंधारा आणि पाझर तलाव दुरुस्ती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ डिसेंबर**

सोलापूर जिल्हा परिषदेमधील जलसंधारण विभागातील विविध कामांना आता गती येणार आहे. तत्कालीन काळात सन २०२३-२४ मध्ये जलसंधारण विभागाची सुमारे १२० कामे मंजूर झालेली आहेत. त्यातील सर्वच कामे आता जोमाने सुरू झाली आहेत. गत लोकसभा निवडणुक, पावसाळा आणि त्यानंतरची विधानसभा निवडणुकामुळे सदरच्या कामांना ब्रेक लागला होता. ती सर्व कामे आता जानेवारी महिन्यात सुरू होणार आसल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये पाझर तलाव दुरुस्ती, गावतलाव दुरुस्ती, नवीन सिमेंट बंधारा बांधणे, सिमेंट बंधारा दुरुस्ती करणे, कोल्हापूर पद्धतीचे बांधारे दुरुस्ती करणे आदी कामांचा समावेश आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विविध गावात जिल्हा परिषदेच्या जलसंधारण विभागाच्या वतीने सन २०२३-२४ मध्ये मंजूर झालेली कामे सुरू असून, त्यामध्ये नवीन सिमेंट बंधारा बांधणे ८, पाझर तलाव दुरुस्ती ४०, गाव तलाव दुरुस्ती २, सिमेंट बंधारा दुरुस्ती २०, संयुक्त गॅबियन बंधारा ६, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे ३० आणि अटल भूजल योजनेच्या १२ कामांचा समावेश आहे.

ही कामे गेल्या काही महिन्यांपासून विविध कारणांमुळे बंद ठेवण्यात आली आहेत. ती कामे लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जलसंधारण विभागाने दिली आहे. दरम्यान, जिल्हापरिषदेच्या जलसंधारण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील तलावात पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी पाझर तलाव, गावतलाव, सिमेंट बंधारा, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील तलावांच्या पाणी साठवण क्षमतेमध्ये निश्चित वाढ होणार आहे.



# साई व्हिजन स्कूलमध्ये बालसंस्कार शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

साई व्हिजन इंग्लिश मिडीयम स्कूल आहेरवाडी व अखिल भारतीय भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी (प्रतिण) सोलापूर यांच्यावतीने शाळेच्या प्रांगणात माता-पालकांसाठी बालसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले.

यावेळी स्वामी समर्थ सेवा केंद्राच्यावतीने मल्लिका रेवाडी व वेणुगोपाल रेवाडी यांनी माता-पालकांना आपल्या मुलांच्यावर लहान वयातच संस्काराची बीज कसे पेरावेत त्यातून अध्यात्मिक सहाय्याने त्यांची बौध्दिक क्षमता त्यांच्या दैनंदिन दिनचर्या कशा असावेत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर काळे, वैशाली कदम, सपना देशमुख, सलमा पिंजारी, राणी बिराजदार, मोहिनी देशमुख, दिपाली चेंडके आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन वैशाली कदम तर आभार सपना देशमुख यांनी मानले.

# १३ डिसेंबरपासून विवेकानंद केंद्राचे ध्यान शिबिर

**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

विवेकानंद केंद्राच्यावतीने १६५, रेल्वे लाईन्स, सात रस्ता येथे १३ ते २२ डिसेंबर दरम्यान दररोज सकाळी ६ ते ७.३० पर्यंत ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी रवि कंटली ९७३००४२२७३, ओंकार औरसंग ९१६८४६०५९१ या नंबरवर संपर्क साधावा. शिबिरासाठी पूर्व नावनोंदणी आवश्यक आहे.






# अभूतपूर्व विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये मुख्य रस्ते होतायत चकाचक

- विविध चौकात फुटपाथची पाणी मारून स्वच्छता
- रस्त्यावरील कोपरा अन् कोपऱ्याची साफसफाई
- धुळ मुक्त सोलापूर करण्याचा यशस्वी प्रयत्न

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

अभूतपूर्व अशा सर्वंकष विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये मुख्य रस्ते चकाचक करण्यात येत आहेत. विविध चौकातील गोलाईसह फुटपाथची पाणी मारून स्वच्छता करण्यात येत आहे. रस्त्यावरील अजोरा, माती उचलण्याबरोबरच कोपरा अन् कोपऱ्याची साफसफाई करण्यात आली आहे. धुळ मुक्त सोलापूर करण्याचा यशस्वी प्रयत्न या मोहिमेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. यामुळे शहरात स्वच्छतेचे दर्शन घडत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

स्वच्छ आणि सुंदर शहर ही सोलापूरची ओळख व्हावी यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने दि. २ डिसेंबर ते १३ डिसेंबर पर्यंत सोलापूर शहरातील मुख्य रस्त्याची विशेष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. या विशेष स्वच्छता मोहिमेमध्ये एकूण ७९ रस्ते होणार चकाचक करण्यात येणार आहेत. संपूर्ण मोहिमेसाठी ४३७ कर्मचारी आणि यंत्रणा कार्यरत आहे. आज आठ दिवस अखेर या मोहिमेअंतर्गत अनेक रस्ते चकाचक झाले असल्याचे चित्र पाहायला मिळत आहेत. या मोहिमेमध्ये रस्त्यावरील धूळ काढणे, झाडांचे फांद्या छाटणी दोन्ही बाजूंवरील फुटपाथ वरील स्वच्छता करणे, कचरा काढणे आदी स्वच्छतेची कामे करण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे.

अतिरिक्त आयुक्त रवी पवार हे या मोहिमेत ऑन द स्पॉट दररोज नियंत्रण करीत असल्याचे पाहायला मिळत आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले,सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील, मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, विभागीय अधिकारी श्री महेश क्षीरसागर विभागीय अधिकारी, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, विभागीय अधिकारी हिदायत मुजावर, विभागीय अधिकारी सतीश एकबोटे पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, सहाय्यक अभियंता विद्युत महादेव इंगळे, उपअभियंता तपंन डंके,उपअभियंता किशोर सातपुते, सहाय्यक अभियंता अविनाश वाघमारे, मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे, उद्यान अधिकारी किरण जगदाळे, स्वप्निल सोलंकर , मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कामगार, झाडूवाली, बिगारी आदी कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

**महापालिकेतील या विभागांचा सहभाग**
या मोहिमेमध्ये महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग, नगर अभियंता विभाग, सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग, विद्युत विभाग, अतिक्रमण प्रतिबंधक विभाग, उद्यान विभाग, संगणक विभाग, सर्व विभागीय कार्यालय या विभागांनी मोहिमेमध्ये सहभागी होऊन आपल्या आपल्या विभागाशी निगडीत असलेले कामकाज पार पाडत आहेत.

**अशी केली नेटकी स्वच्छता**
या मोहिमेमध्ये शहरातील मुख्य रस्ते निवडण्यात आले आहेत. त्या मधील दुभाजकाकडील माती काढणे, फुटपाथ वरील अनावश्यक गवत, झाडी तसेच कचरा, डिव्हाईडर मधील लाईट पोल वरील कुजलेले बोर्ड व स्टिकर, डिव्हाईडर मधील झाडांची छाटणी करणे तसेच फुटपाथ वरील दोन्ही बाजूची स्वच्छता करण्यात आली.

**संपूर्ण मोहिमेत ४३७ कर्मचारी, अधिकारी कार्यरत**
या संपूर्ण मोहिमेसाठी मुख्य आरोग्य निरीक्षक - आठ, आरोग्य निरीक्षक - ४९, स्वच्छता कर्मचारी - ३८० ,जेसीबी, डंपर, कॉम्पॅक्टर, कचरा संकलन वाहने, पाण्याचे टँकर आदींसह अन्य अद्ययावत यंत्रणा कार्यान्वित आहे.सदर मोहीम ही १३ डिसेंबर पर्यंत सुरू राहणार असून दिलेले नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली रोज सकाळी सात ते दहा या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यावरील स्वच्छता मोहीम घेण्यात येणार आहे.




# विशेष स्वच्छता मोहिमेअंतर्गत रस्त्यावरील अतिक्रमण हटाव कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

विशेष स्वच्छता मोहिमे अंतर्गत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील गुरुनानक चौक ते कुमठा नाका तसेच कर्णिक नगर रिक्षा स्टॉप ते वालचंद कॉलेज पर्यंत या रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने दि. २ ते १३ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रस्ते, फुटपाथ तसेच दुभाजकाची नेटक्या पद्धतीने स्वच्छता करण्यात येत आहे. रस्त्यावरील तसेच फुटपाथवरील अतिक्रमणही काढण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज सकाळच्या सत्रात गुरुनानक चौक ते कुमठा नाका रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. या ठिकाणी चार लोखंडी खोके व दोन लोखंडी काउंटर, टेबल व इतर साहित्य जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात कर्णिक नगर रिक्षा स्टॉप ते वालचंद कॉलेज पर्यंत रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत चार लोखंडी खोके, एक लोखंडी काउंटर, प्लास्टिक खुर्च्या, व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच पत्र्याचे एक शेड निष्कासित करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# भारत तोडोच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीयत्व बळकट करणे काळाची गरज : अविनाश धर्माधिकारी

**पुणे, ९ डिसेंबर-**

एकसंध राष्ट्रीयत्व ही भारताची खरी ताकद आहे. वेगवेगळ्या मार्गांनी भारत तोडण्याचे प्रयत्न सुरू असले तरी आपले राष्ट्रीयत्व बळकट करू या. कारण जगाला सुख, शांती, समाधान देण्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी केले.

कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित शिवशाहीर कै. बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमालेत धर्माधिकारी बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापाठाचे माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. व्याख्यानमालेचे यंदा तिसरे वर्ष होते. भारत तोडो षडयंत्र या विषयावर मार्गदर्शन करताना धर्माधिकारी म्हणाले, भारताचा सनातन विचार हाच जगातील सर्वात सहिष्णु विचार आहे. हा सर्व जगाला जोडणारा विचार आहे.

विश्वालाच कुटुंब मानणे ही भारताची संकल्पना आहे. भारत एकसंध राहू नये म्हणून परकीय शक्ती आणि त्यांना मदत करणाऱ्या भारतातील शक्ती भारत तोडण्याचा प्रयत्न करत आहेत. डॉ. करमळकर म्हणाले, भारत तोडण्याचे जे कारस्थान सुरू आहे, ते समजून घेणे, त्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

व्याख्यानमालेचे द्वितीय सत्र प्रसिद्ध निरूपणकार, लेखक विवेक घळसासी यांनी गुंफले. भारताच्या वैभवाचा आधार - माझं घर माझा परिवार या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी आणि कायदेतज्ज्ञ डी. डी. शहा यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. घळसासी म्हणाले, आपल्या देशाला आपल्याला परमवैभवाला न्यायचे आहे आणि हे काम इतरांनी नाही तर मला माझ्यापासून, माझ्या घरापासून करायचे आहे. देशाला परमवैभवाला नेणे ही माझी जबाबदारी आहे, हे प्रत्येकाला लक्षात ठेवावे लागेल.

स्वतः विषयीचा आत्मविश्वास, कृतज्ञता, सर्वसमावेशकता, सहभागीता, संयम, श्रमप्रतिष्ठा, उत्तम अभिव्यक्ती, अनुशासन, त्याग, तपस्या ही तत्त्व आपल्याला अंगी बाणवावी लागतील. मुळात उत्तम माणूस घडला तर देश उभा राहील. हा माणूस घरात म्हणजेच कुटुंबात संस्कारातून घडेल. म्हणून माझं घर - माझा परिवार हा वैभवशाली भारताचा आधार आहे, असेही घळसासी यांनी सांगितले. व्याख्यानमालांसारख्या कार्यक्रमांची समाजाला गरज आहे. म्हणून असे कार्यक्रम सातत्याने करत राहणे आवश्यक आहे, असे मृणाल कुलकर्णी म्हणाल्या. संस्थेचे अध्यक्ष सुनील राऊत यांनी सत्कार आणि स्वागत तर नागेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.




# रेल्वे भूसंपादनासाठी घेतलेल्या जमिनीचा मावेजा धुळे महामार्गापेक्षा खूप कमी

- शेतकरी बांधवांतून तीव्र नाराजी; सर्वांना पैसे मिळाले नाहीत तोवर कामाचा सपाटा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

राज्याच्या हिश्याचा वाटा भरण्यास विलंब झाल्याने गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाच्या कामाला आता महायुती सरकारकडून मोठी गती आली आहे.

मात्र भूसंपादित केलेल्या जमिनीचा मोबदला सोलापूर-धुळे महामार्गाच्या तुलनेत अत्यंत कमी मिळत नसल्याने सोलापूर, तुळजापूर आणि धाराशिव येथील अनेक शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तर अजून काही गावांचे पैसेच शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केले नाहीत; तोवर रेल्वेचे धाराशिवकडून कामही सुरू केल्याची खंतही काही शेतकऱ्यांनी बोलून दाखविली. सोलापूर-धाराशिव-तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर कामापैकी साधारण आठ किलोमीटर अंतराचे काम धाराशिवकडून मोठ्या वेगात सुरू झाले आहे. तर सोलापूर जिल्ह्यात रेल्वेचे हे काम अजून रखडले आहे. धाराशिव जिल्ह्यातील रेल्वेचे हे काम जवळपास २५ टक्के पूर्णत्वाकडे आले असून, या मार्गावर एकूण लहान-मोठे एकूण ५० पूल असणार आहेत. त्यापैकी सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल साकारला जाणार असल्याची माहिती नुकतीच आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. मात्र, सर्व शेतकऱ्यांना गेलेल्या जमिनीचे किती पैसे मिळाले? इतका कमी भाव रेल्वे मंत्रालयाकडून कसा दिला? धुळे-सोलापूर महामार्गाच्या धर्तीवर हा दर किती कमी आहे? याची चौकशी किंवा खातरजमा कोणीही लोकप्रतिनिधी करीत नसल्याचे सध्या दिसून येत आहे. शेतकरी बांधवांनो, सध्या आलेले तितके पैसे खात्यावरून उचला आणि पुन्हा कोर्टात जा? असाच सल्ला शेतकरी बांधवांना अनेकजण देताना दिसत आहेत. यामुळे बाधित शेतकऱ्यांमध्ये जमिनीच्या दराबाबत सध्या संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. धाराशिवकडून सध्या रेल्वेचे तीन टप्प्यात काम सुरू आहे. यामध्ये एकूण ५० छोटे-मोठे पूल ३० किलोमीटर अंतरावर आहेत. त्यात रेल्वे स्थानकाजवळ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर १०६ मीटर लांबीचा सर्वात मोठा पूल उभारण्यात येणार आहे.

**आता सोलापूरहून येत्या महिनाभरात काम होणार सुरू!**
सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ३२ गावांतील एक हजार ३७५ एकर जमीन त्यासाठी भूसंपादीत करण्यात आली आहे. संपादित जमिनीच्या वाढीव मावेजासाठी दोन्ही जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. धारशिव जिल्ह्यातून काम सुरु झाले असून, आता सोलापूर जिल्ह्यातील रेल्वेचे पहिल्या टप्प्यातील कामही येत्या महिनाभरात सुरू होणार आहे.

**सोलापूर ते होनसळपर्यंत १८७.३३ किमी भूसंपादन कामासाठी ६२० कोटींची मंजुरी**
सोलापूर ते धाराशिव रेल्वेमार्गासाठी सोलापूर ते होनसळ या सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीतील १८७.३३ किलोमीटरच्या भूसंपादन कामासाठी ६२० कोटीची मंजुरी मिळाली असून, यातील भूसंपादित केलेल्या शेतकऱ्यांना २९३ कोटीचा मावेजा वाटपही झाला आहे. तर काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने, तर काही जमिनीचे पोटहिस्से न झाल्याने यांना पैसे वाटप झाले नाहीत. तर उमा गृहनिर्माण सोसायटीच्या जागेचा वाद सुरू असल्याने या रकमा कोर्टामार्फत सुनावणी होवून त्या-त्या लाभार्थींना मिळणार असल्याची माहिती सोलापूर भूसंपादन विभागाकडून मिळाली.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतातील रस्ता बंद केल्याच्या कारणातून मारहाण

### तिघांविरूध्द अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

उत्तर सोलापूर तालुक्यातील देगाव परिसरातील पडसाळकवरवस्ती येथे शेतात जाण्याचा रस्ता बंद केल्याच्या कारणातून जातीवाचक शिवीगाळ करून एकास बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार सहा डिसेंबर रोजी १२ च्या सुमारास घडला.

याबाबत कुमार महादेव कट्टीमणी (वय ४३,रा. समता नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आकाश पडसाळकर, युवराज पडसाळकर व आकाशची आई (रा. पडसाळकर वस्ती, देगाव) विरूध्द सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी आणि फिर्यादी यांची शेती लगत आहे.इ फिर्यादीच्या शेतातून आरोपींच्या शेतात जाण्यासाठी रस्ता आहे. घटनेच्या दिवशी फिर्यादीने तो रस्ता बंद केला. यावरून त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस सळईने तसेच लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान आरोपींनी फिर्यादीस जातीचा उल्लेख करून शिवीगाळ केल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गवारे करत आहेत.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### रेल्वे स्टेशनसमोरून पळविली हिसका मारून प्रवाशाची बॅग

**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

सोलापूर रेल्वे स्थानकाबाहेर चहा पिण्यासाठी थांबलेल्या कर्नाटकातील प्रवासाची खांद्यावर अडकवलेली बॅग हिसका मारून बळजबरीने पळविली. हा प्रकार आठ डिसेंबर रोजी पाचच्या सुमारास घडला.याबाबत नागराज लिंगप्पा हलुवागलु (वय ४९, रा. बधुगुप्पा, ता. कोपल, कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आठ डिसेंबर रोजी फिर्यादी हे हैद्राबाद येथून रेल्वेने आले होते. ते कर्नाटकातील गावी जाण्यासाठी सोलापूर रेल्वे स्टेशन येथे उतरले. ते आणि त्यांचे मित्र हनमंतप्पा लिंगप्पा असे दोघे चहा पिण्यासाठी रेल्वे स्टेशनबाहेर गेले. त्यावेळी त्यांच्या डाव्या खांद्याला बॅग होती. त्यात रोकड ५३ हजार व घड्याळ तसेच बँकेचे डेबीट तसेच आधारकार्ड होते. दरम्यान चहा पिणा-या फिर्यादीचे लक्ष नसल्याचा अंदाज घेत चोरटा हिसका मारून बॅग घेऊन पळून गेल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक बनकर करत आहेत.



### मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलेस दुचाकीने ठोकरले

**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

सकाळच्या सुमारास इंचगिरी मठा जवळील सिमला नगर ते नेहरूनगर या मार्गावर पाई चालत जाणाऱ्या महिलेस पाठीमागून आलेल्या दुचाकींनी ठोकरले. वर्षा भिमराव अजनाळकर (वय ५० रा.शिमला नगर, विजापूर रोड,सोलापूर) असे त्या महिलेचे नाव आहे.ही घटना रविवारी सकाळच्या सुमारास घडली.पाठीमागून आलेल्या दुचाकीने धडक दिल्याने त्या गंभीर जखमी झाल्या.मुलीने त्यांना उपचाराकरता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### बेशुद्ध तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू

**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

राहत्या घरी अचानक बेशुद्ध झालेल्या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. प्रवीण किसन लालसरे (वय-३४,रा.बल्लारी चाळ,देगाव नाका सोलापूर) असे त्या युवकाचे नाव आहे.रविवारी दुपारी अडीच वाजता राहत्या घरी तो अचानक बेशुद्ध झाला.उपचाराकरीता त्यास भाऊ रवी याने शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.परंतु उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### कुमठे तांडा येथील महिलेची आत्महत्या

**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

रविवारी सकाळी ११ च्या सुमारास कुमठे तांडा तालुका उत्तर सोलापूर येथे राहणाऱ्या रेखा ब्रह्मदेव राठोड (वय-४०) या महिलेने राहत्या घरी बेडरूम मध्ये पत्र्याच्या अँगलला गळफास घेतला.ही घटना नातेवाईकांनी विजापूर नाका पोलीस स्टेशनला सांगितली. पोलीस हावलदार एम.बी फुलारी.यांनी तिला उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारा पूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



### घरगुती कारणावरून फेकला तांब्या; आई बेशुद्ध

**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

घरगुती कारणावरून मुली बरोबर तक्रार झाली.त्यामुळे चिडून जाऊन मुलीने आईवर तांब्या फेकून मारला. डोक्याला मार जबरदस्त लागल्याने आई बिशुद्ध झाली आहे. या घटनेची हकीकत अशी की, सुलभा सतीश साठे (वय-४०, रा.मार्डी तालुका उत्तर सोलापूर) हिचे रविवारी दुपारी अडीच वाजता राहत्या घरी घरगुती कारणावरून मुलीसोबत भांडण झाले.या भांडणात मुलीने रागाच्या भरात आईवर तांब्या फेकून मारला.डोकीस जखम झाल्याने पती सतीश साठे यांनी पत्नी सुलभा यांना उपचार करता शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. रुग्ण रुग्ण बेशुद्ध आहे.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

# काँग्रेसचा सफायामुळे मनपा, जि.प.ला धोका

## ● लोकसभेच्या यशानंतर विधानसभेला शहर, जिल्ह्यातून हद्दपार इच्छुकांचा ओढा महायुतीकडे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

लोकसभेच्या मागील दोन निवडणुकांमधील पराभवानंतर नाजूक परिस्थितीत देखील काँग्रेसने यंदाच्या लोकसभा निवडणुकीत विजय मिळवला. पण त्यानंतर अवघ्या चारच महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र शहर व जिल्ह्यातून काँग्रेसचा सफाया झाल्याचे दिसून आले. विधानसभेतील सफायामुळे आता होवू घातलेल्या महापालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत काँग्रेसची राजकीय स्थिती धोकादायक असल्याचे चित्र आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातून काँग्रेस हद्दपार झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी इच्छुकांनी आता आपला मोर्चा महायुतीकडे वळवला आहे. अनेकजण महायुतीकडून उमेदवारीसाठी आतापासूनच प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे.

एप्रिल-मे २०२४ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा बोलबाला दिसून आला. लोकसभेच्या ४८ जागांपैकी ३० जागा या मविआने जिंकल्या तर महायुतीला केवळ १७ जागांवर विजय मिळाला. आता ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत चित्र उलटे झाले अन् मविआला मोठा झटका बसला. एकूण २८८ आमदारांपैकी महायुतीला २३२ जागा इतक्या मोठ्या संख्येने जागा मिळाल्या तर महविकास आघाडी ही ५० आमदारांच्या आतच राहिली. विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला दिलेला भरघोस मतांचा कौल पाहता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घ्याव्यात अशीच परिस्थिती आहे. आता येत्या दोन महिन्यात महापालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका पार पडल्या तर महायुतीला अनुकूल परिस्थिती आहे. सोलापूर शहरातील चारही विधानसभेच्या जागा भाजपाने मोठ्या मताधिक्यांनी जिंकल्या असल्याने सोलापूर महापालिकेवर पुन्हा महायुतीची सत्ता येईल, असे जाणकार सांगत आहेत. तर विधानसभेला काँग्रेसला एकही जागा जिंकता न आल्याने महापालिकेत काँग्रेसची स्थिती नाजूक असणार अशी चर्चा आहे. अशा या नाजूक राजकीय परिस्थितीमध्ये ठाकरे शिवसेनेने काँग्रेसबाबत नाराजी व्यक्त करीत स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढण्याचे संकेत दिलेले आहेत. तर विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व शरद राष्ट्रवादीतही फारसे सख्य दिसलेले नाही. त्यामुळे कदाचित महापालिका निवडणुकीत काँग्रेसला मविआतील ही राजकीय परिस्थिती अडचणीची ठरू शकते. विधानसभेतील महायुतीचे घवघवीत यश पाहून स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी इच्छुक असलेल्या अनेकांनी महायुतीकडून उमेदवारीसाठी प्रयत्न सुरु केल्याचे चित्र आहे. काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी आणि मित्रपक्षांचा रोष यामुळे काँग्रेसला महापालिका व जिल्हा परिषदेची निवडणुक सहज नसणार हे स्पष्ट आहे. विधानसभेत झालेला काँग्रेसचा सफाया हा महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसला धोक्याचा ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न न्यायप्रविष्ठ असल्याने या निवडणुका रखडलेल्या असून येत्या २२ डिसेंबर रोजी याप्रकरणाची सुनावणी न्यायालयात होणार आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे. कदाचित न्यायालयाकडून हिरवा कंदिल मिळाल्यास तातडीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या जम्बो यशामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी-फेब्रुवारि २०२५ मध्ये होण्याची दाट शक्यता आहे. यासाठी इच्छुकांना येत्या २२ डिसेंबरपर्यंत वाट पहावी लागणार आहे. जर का स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या दोन महिन्यात घ्याव्या लागल्या तर मतदार याद्या तयार असून निवडणूक यंत्रणा देखील प्रशिक्षित आहे. लोकसंख्येनुसार प्रभागरचना देखील ४ नगरसेवकांचा एक प्रभाग याप्रमाणे झालेली आहे. तर प्रभाग आरक्षणाची प्रक्रिया देखील मागे पार पडलेली होती. सोलापूर महापालिकेत एकूण १०२ नगरसेवक होते त्यात वाढ होवून ही संख्या ११३ इतकी झालेली होती.महापालिकेत भाजपाची सत्ता होती तर एकूण १०२ नगरसेवकांपैकी भाजपाचे ४९ नगरसेवक होते. शोभा बनशेट्टी आणि श्रीकांचना यन्नम या भाजपाच्या दोन महिला महापौरांनी महापालिकेचा पाच वर्षे कारभार पाहिला होता. २०१७ ते २०२२ या पाच वर्षाच्या कालावधीत महापालिकेतील पक्षीय बलाबल पुढील प्रमाणे होते. भाजपा ४९, शिवसेना २१, काँग्रेस १४, एमआयएम ९, राष्ट्रवादी ४, बसपा ४ आणि माकप १ असे एकूण १०२ नगरसेवकांचे पक्षीय बलाबल होते.

मार्च २०२२ मध्ये महापालिकेची मुदत संपल्यानंतर आतापर्यंत महापालिकेवर प्रशासक नियुक्त आहेत. तीन वर्षाच्या कालावधीत राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक राज असून जनतेच्या समस्येला लोकप्रतीनिधी नामक कोणीही नाही. त्यामुळे प्रशासक म्हणेल ती पूर्वदिशा हा अनुभव सामान्य नागरिकांना आलेला आहे. लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हाव्यात, अशी भावना जशी राजकीय कार्यकर्त्यांची आहे तशी ती जनतेची देखील आहे. आता याबाबतची स्पष्टता येत्या २२ डिसेंबरलाच येवू शकते.

### जिल्हा परिषदेला महायुती वरचढ

जिल्ह्यातील माढा लोकसभा शरद राष्ट्रवादी तर सोलापूर लोकसभा काँग्रेसचे खासदार आहेत. विधानसभेला शरद राष्ट्रवादीचे ४ तर उध्दव ठाकरे एक असे पाच आमदार असून भाजपाचे ५ आमदार तर शेकापचा एक आमदार आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपा आणि शरद राष्ट्रवादी यांच्यातच लढत दिसणार आहे. तर ठाकरे सेना व काँग्रेस यांच्यात बिनसल्यामुळे काँग्रेसची अडचण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कोण कोणत्या राजकीय पक्षाकडून निवडणुक लढविणार हे ऐनवेळीच स्पष्ट कळणार हे मात्र नक्की.



सोलापूर : ओॲसिस ओपन महिला आटीएफ टेनिस स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेते खेळाडू वृद्धा बोद्दूल व स्वरा गाणेर यांनी प्रशिक्षक डॉ. मोहिनी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी स्पोर्टस् एरोबिक्स सादर केले.

# सोयाबीनचा दर बाजारात स्थिर शेतकऱ्यांमधून नाराजीचा सूर!

● नव्या सरकारकडूनही भाववाढीची आशा धूसर
● हमीभाव केंद्रावर चारदा चाळण अन् पैसेही दमानं

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

गतवर्षीप्रमाणे यंदाही सोयाबीनचे दर बाजारात स्थिर राहिल्याने शेतकरी बांधवातून नाराजीचा सूर निघत आहे. दरम्यान, महायुतीच्या सरकारकडून सोयाबीन दरवाढीची घोषणा दणक्यात होईल, असे वाटत नसल्याने अनेक शेतकरी कमी दराने सोयाबीन बाजार समित्यांकडे आणून विकू लागल्याचे चित्र आहे. तर राज्य सरकारच्या हमीभाव खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांच्या मालाची चारदा चाळण करून पैसेही वेळेत मिळत नसल्याची खंत काही शेतकऱ्यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.

२०२४-२५ साठी सोयाबीनचा हमीभाव हा ४ हजार ८९२ रुपये इतका ठरला असून, तो गेल्यावर्षीपेक्षा २९२ रुपयांनी अधिक वाढला आहे. सध्या बाजारात सोयाबीनचे भाव १०० ते २०० रूपयाने खाली-वर होत असून, चांगल्या मालाला ४ हजार ३०० पर्यंत भाव मिळत असल्याचे सांगण्यात आले.

राज्यात खरीप हंगामातील सोयाबीनची मोठ्या प्रमाणात पेरणी झाली होती. दमदार पाऊस सर्वत्र झाल्याने उत्पन्नही मोठ्या प्रमाणात झाले आहे. शेतकरी भाववाढीसाठी उठाव करू लागल्यावर केंद्र शासनाने सन २०२४-२५ साठी सोयाबीन करिता प्रति क्विंटल रू. ४८९२/- इतका हमीभाव घोषित केला आहे. महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील सोयाबीन पिकाची केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यात खरेदी सुरू करण्यासाठी केंद्र शासनातील नाफेड व एन.सी.सी.एफ. तसेच राज्यातील सर्व प्रमुख नोडल एजन्सीची राज्यस्तरीय आढावा बैठक पडली होती आणि सदर बैठकीमधील चर्चेनुसार हंगाम २०२४-२५ मध्ये राज्यात केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेड व एन.सी.सी.एफ. मार्फत प्रथमतः महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई व विदर्भ पणन महासंघ नागपुर यांच्या वतीने राज्यात सोयाबीन खरेदीकरीता शेतकरी नोंदणी ऑक्टोबरपासून सुरु करण्यात आली आहे.



या नोंदणीकरीता मुदतवाढ देण्यात आली तरी सोयाबीनला बाजार भावाइतकेच पैसे या ठिकाणीही मिळू लागल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आल्याने आता अनेक शेतकऱ्यांनी या केंद्रांकडे पाठ फिरविली आहे. यामुळे आता हे शेतकरी थेट बाजारात नेवून आपले सोयाबीन विकू लागले आहेत. आज भाववाढ होईल, उद्या होईल अशी एक-दोन महिने भाववाढीची वाट पाहून निराश होत आता घरात ठेवलेले सोयाबीन शेतकरी बाजार समित्यांत आणून विकू लागले आहेत. सोयाबीन खरेदीकरीता राज्यात जिल्ह्यांची विभागणी करुन नाफेड व एन.सी.सी.एफ. कार्यालयाने २६ जिल्ह्यांतील २५६ खरेदी केंद्रांना सोयाबीन खरेदीची मंजुरी देण्यात आली. त्यापैकी २४२ खरेदी केंद्र कार्यान्वित झालेली आहेत. मात्र शेतकऱ्यांचा त्यांना हवा तितका प्रतिसाद मिळत नाही. केंद्रे कार्यान्वित झाल्यावर नोंदणीसाठी सुरूवातीला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला मात्र त्या मालाच्या चार-चार वेळा चाळण्या होत असल्याने आणि पैसेही उशिरा मिळत असल्याने जास्तीचा दर मिळूनही या खरेदी केंद्रांकडे शेतकरीवर्ग पाठ फिरवित असल्याची माहिती काही जाणकार शेतकऱ्यांनी दिली.

# विधानसभेनंतर बाजार समितीच्या निवडणुकीचे वाजणार बिगुल!

### सत्ताधारी आमदारांसमोर असणार विरोधकांचे कडवे आव्हान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ डिसेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे बिगुल कधी वाजणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीमुळे स्थगिती मिळालेल्या निवडणूक प्रक्रियेला नव्या वर्षात सुरुवात होणार आहे. सोलापूर बाजार समितीची मुदत ही मागील वर्षीच संपलेली आहे. संचालक मंडळाला याआधीच सहा-सहा महिन्यांची दोन वेळेला मुदतवाढ मिळाल्याने आता निवडणूक अटळ आहे. तरी देखील संचालक मंडळांनी सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. परंतु पणन कायद्यामध्ये याची तरतूद नसल्याने, संचालक मंडळांना देण्यात येणारे मुदतवाढ रोखण्यात आली आहे. त्यामुळे आता बाजार समितीची निवडणूक लवकरच लागेल असे चिन्ह दिसत आहेत.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीवेळी बाजार समितीची सुरू झालेली निवडणूक आता नवीन वर्षात सुरू होणार आहे. ज्या टप्प्यात निवडणुकीची प्रक्रिया थांबली होती. त्या टप्प्यापासूनच निवडणुकीची पुढील प्रक्रिया आता नववर्षात सुरू होणार आहे. बाजार समिती निवडणुकीसाठी आता उत्तर आणि दक्षिण सोलापूर या दोनही तालुक्यांतील राजकीय नेत्यांनी आपला कस पणाला लावले आहे. आत्तापासूनच मतदारांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. सोलापूरची बाजार समिती ही राज्यातील प्रमुख समित्यांपैकी एक आहे. सोसायटी संचालक, ग्राम पंचायत सदस्य, हमाल, तोलार आणि व्यापारी यांच्यामधून संचालकांची निवड होणार आहे. या संस्थेवर स्थापनेपासून काँग्रेसचीच सत्ता होती.


















मागील वेळी या संस्थेच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे शेतकरी मतदार हे सत्ताबदल करतील, असा अंदाज तत्कालीन सहकारमंत्री सुभाष देशमुख यांना होता. म्हणून त्यांनी सत्ताधारी आघाडीच्या विरोधात पॅनेल स्थापून लढत दिली. परंतु त्यांच्या पॅनेलचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला. त्यांच्या पॅनलमधून पंचायत समितीचे माजी उपसभापती रामप्पा चिवडशेट्टी आणि अप्पासाहेब पाटील-वडकबाळकर असे दोनच संचालक निवडून आले.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सोसायटी आणि ग्रामपंचायत या दोन्हीमधील मतदारांची संख्या दक्षिण सोलापुरातील अधिक आहे. सर्वात जास्त सोसायट्यांवर जिल्हा दूध संघाचे संचालक सुरेश हसापुरे गटाची सत्ता आहे. काही सोसायट्यांवर समर्थ सूतगिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांचे वर्चस्व असून, तालुक्यातील काही सोसायट्यांचे संचालक व ग्रामपंचायत सदस्य हे काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके यांना मानणारे आहेत. तर उत्तर सोलापूरातील विकास सोसायट्या आणि ग्राम पंचायतींतील मतदारांची संख्या दक्षिणपेक्षा कमी आहे. मतदार कमी असले तरी सर्वच मतदार हे माजी आमदार दिलीप माने यांच्या शब्दाबाहेर नाहीत. ही संस्था ताब्यात ठेवण्यासाठी माजी आ.माने, हसापुरे, शिवदारे, शेळके हे नेते आतापासूनच तयारीला लागले आहेत. मतदारांची जुळवाजुळवच्या कामाला लागलेले आहेत, तर आ. सुभाष देशमुख यांनी बाजार समितीच्या निवडणुकीविषयी आपली भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही तर दुसरीकडे सभापतीपद भूषवलेले उत्तरचे आ. विजयकुमार देशमुख आणि अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांची भूमिका देखील महत्त्वाची ठरणार आहे. या दोघांच्या समर्थकांची देखील बाजार समितीमध्ये एन्ट्री होऊ शकते. तज्ञ संचालकांच्या माध्यमातून यापूर्वी अशा सदस्यांची नेमणूक करण्यात आली होती.

**बाजार समितीची मतदार संख्या**

| | |
|---|---|
| सहकारी संचालक संस्था | १८९५ |
| ग्रामपंचायत सदस्य | ११७६ |
| व्यापारी | १२७६ |
| हमाल तोलाईदार | १०८४ |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७०

**भंगलिया चित्ता । न ये काशानें सांधितां ।।**
**तुका म्हणे धीर । भंगलिया पाठी कीर ।।**

चित्ताची स्थिरता हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. ज्याचे चित्त स्थिर आहे, त्याचे जीवन स्थिर राहते. चित्ताची अस्थिरता ही मानवाच्या जीवनात अनेक बाबी /घटनांना अस्थिरत्वाकडे नेण्यास कारणीभूत होते. आपले चित्त अस्थिर व्हावे, असे कोणालाच वाटत नाही. चित्ताच्या स्थिरत्वासाठी माणूस सातत्याने प्रयत्नशील असतो. चित्ताच्या स्थैर्यासाठी प्रयत्न करणारा हा माणूस आपले चित्त अस्थिर का होत आहे? याकडे पाहण्यास विसरतो. बऱ्याच अंशी आपला स्वभाव, आपले वर्तन, आपल्या भावना, आपले विचारच या अस्थिरत्वाला कारणीभूत असू शकतात. भावना, वर्तन, विचाराकडे तसेच स्वभावाकडे दुर्लक्ष करुन चित्ताच्या स्थैर्यासाठी बाह्य डोस घेणे व्यर्थ असते. बाह्यडोसांचा तेव्हाच योग्य तो परिणाम होतो. जेव्हा अपण त्याचा सदुपयोग स्वभाव-वर्तन बदलण्यासाठी करतो. चित्ताचे भंगत्व मानवी जीवनात नको तेवढी चढ-उतार निर्माण करु शकते. कारण काही का असेना पण भंगलेले चित्त स्थिर करणे अवघड असते. अस्थिर चित्तामुळे अनेक कार्यात, क्षेत्रात माघार घेण्याची, हार पत्करण्याची वेळ येऊ शकते, या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, भंगलिया चित्ता । न ये काशानें सांधितां ।। तुका म्हणे धीर । भंगलिया पाठी कीर ।।


तुकाराम महाराज

चित्ताची स्थिरता माणसांमध्ये विश्वास, धैर्य निर्माण करीत असते. स्थिर चित्ताचा माणूस धैर्यशाली, आत्मविश्वासू असतो. चित्त अस्थिर झाले म्हणजे माणसातला धीर ,धैर्य व आत्मविश्वास नष्ट होऊ लागतो. ज्याच्याकडे धीर व आत्म विश्वास नाही, त्या माणसाची जवळपास सर्वच क्षेत्रातून पीछेहाट होत असते. अर्थात, अशा माणसाच्या वाट्याला दु:ख, अवमान, अपयश हे बऱ्यापैकी ठरलेलेच असतात. अस्थिर मनाचा माणूस सत्कार्यातही मागे पडू लागतो. अंतर्गत विचाराने तो जळू लागतो. त्याचे असे जळणे कधीही भरुन न निघणारे नुकसान करुन जाते. म्हणून आपले चित्त भंगेल किंवा आपल्या मानसिक शांततेवर गंडांतर येईल असे विचार, वर्तन माणसाने करुच नयेत. इच्छित आशा, अपेक्षा, विषयांची पूर्ती झाली नाही किंवा मनाच्या विरुध्द घडले म्हणजे माणूस अस्थिर होतो. माया, मोह, मत्सर, दंभ, अहंकार, काम, क्रोध आदींना सहारा देणारा माणूस या सर्वांच्या अधिन होतो. त्याची ही अधिनताच चित्ताच्या भंगत्वाला कारणीभूत होऊ शकते. भंगलेले चित्त स्थिर करणे अत्यंत अवघड काम आहे. शरीर फाटले तर डॉक्टरकडे जावे, कपडे फाटले तर शिंप्याकडे जावे अणि मन फाटले तर संतांकडे जावे असे म्हणतात. आपल्या भंगलेल्या चित्तावर म्हणजेच फाटलेल्या मनावर औषधपट्टी करण्याचे कार्य केवळ संतच करु शकतात. शरीरावरची जखम इतरांना दिसू शकते, पण फाटलेल्या मनावरची जखम कोणालाही दिसत नाही. ही न दिसणारी जखम दिसणाऱ्या जखमेपेक्षा जास्त क्लेषकारक असते. योग्यवेळी अधिकार असणारा संत, महात्मा भेटला नाही तर ही मानसिक जखम आपल्याबरोबर इतरांचेही नुकसान करणारी ठरु शकते. आपले चित्त भंगणारच नाही असेच आपले वर्तन असावे. तथापि, कारणवश दुर्दैवाने आपले चित्त भंगलेच तर संत श्री ज्ञानोबा-तुकाराम आदी संतांचे ग्रंथरुपी औषध घेण्यास आपण विसरु नये. ज्ञानोबा-तुकारामांच्या विचारांचे आचरण करणाऱ्यांचे चित्त भंगणारच नाही, असा आम्हास विश्वास वाटतो. आपले चित्त स्थिर ठेवण्याची ताकद आपणाला मिळो व आपल्या जीवनातील आनंद लहरी वाढोत अशी या अभंगप्रसंगी संत श्री ज्ञानोबा- तुकोबा माऊलींच्या चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | करण - तैतिल (१६.५४) |
| दि. १० डिसेंबर २०२४ | दिनविशेष - |
| विक्रम संवत् २०८०-८१ | श्री महालक्ष्मी महापूजा |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| (२७.४२) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - वसंत | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र -उ. भाद्रपदा (१३.३०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - व्यातिपात (२२.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पूर्ण होण्याचा योग आहे.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# मध्य रेल्वेचे ऑपरेशन नन्हे फरिश्ते

## नोव्हेंबर अखेरपर्यंत १०९९ मुलांचे कुटुंबियांशी जोडले नाते

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर -**

मध्य रेल्वेने ऑपरेशन नन्हे फरिश्ते मोहिमेअंतर्गत जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत १०९९ मुलांची सुटका करून त्यांना त्यांच्या कुटुंबियांशी पुन्हा जोडण्याचे काम केले.आरपीएफ (रेल्वे सुरक्षा बल) कर्मचारी विविध भूमिका पार पाडतात. चालू वर्षी ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत हरवलेल्या मुलांची सुटका, ऑपरेशन अमानत अंतर्गत प्रवाशांचे हरवलेले सामान परत मिळवून दिले.

रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) ला रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारीही ते पार पाडत आहे. जानेवारी ते नोव्हेंबर-२०२४ या कालावधीत मध्य रेल्वेच्या आरपीएफ ने शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि इतर फ्रंटलाइन रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने एकूण १०९९ मुलांची (७४० मुले आणि ३५९ मुली) सुटका केली आणि त्यांना त्यांच्या कुटुंबियांशी जोडले. यामध्ये चाइल्डलाइन सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने त्यांच्या पालकांशी पुनर्मिलन झालेल्या मुला-मुलींचा समावेश आहे. नोव्हेंबर - २०२४ मध्ये सुटका करण्यात आलेल्या मुलांची संख्या १२४ होती, ज्यामध्ये ७८ मुलगे आणि ४६ मुलींचा समावेश होता. त्या तुलनेत जानेवारी ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत सुटका/पुनर्मिलन करण्यात आलेल्या मुलांची संख्या १०५३ (७४१ मुलगे आणि ३१२ मुली) होती. रेल्वे स्थानकावर कोणत्यातरी वादामुळे, कौटुंबिक समस्या किंवा चांगल्या आयुष्याच्या किंवा शहराच्या ग्लॅमरच्या शोधात आलेल्या मुलांचा शोध प्रशिक्षित आरपीएफ जवानांकडून घेतला जातो. हे प्रशिक्षित आरपीएफ कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात, त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा जोडण्यासाठी समुपदेशन देतात. या उदात्त सेवेबद्दल अनेक पालक मनापासून कृतज्ञता आणि आभार व्यक्त करतात.



**ऑपरेशन अमानतअंतर्गत**
**५ कोटी २२ लाखांच्या वस्तू प्रवाशांना परत**

रेल्वे मालमत्तेचे रक्षण करण्याच्या मूलभूत कर्तव्याव्यतिरिक्त, ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफने गरजू प्रवाशांना मदत करणे आणि मोबाईल फोन, लॅपटॉप, दागिने, रोख इ. यासारख्या मौल्यवान वस्तू परत करणे तसेच प्रवाशांच्या मागे राहिलेल्या वस्तू परत करणे हे कर्तव्याच्या पलीकडे जाऊन केलेले कार्य आहे. चालू वर्षात, जानेवारी ते नोव्हेंबर-२०२४ दरम्यान, ऑपरेशन अमानत अंतर्गत, आरपीएफ ने ५ कोटी २२ लाख रुपये किंमतीच्या प्रवाशांच्या १४९१ वस्तू पुन्हा प्राप्त केल्या आहेत. त्यापैकी ४३ लाख ७२ हजार रुपये किमतीच्या १५७ वस्तू केवळ नोव्हेंबर-२०२४ मध्ये पुनर्प्राप्त करण्यात आल्या. त्या तुलनेत जानेवारी ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ४.१२ कोटी रुपयांच्या १४९४ वस्तू पुनर्प्राप्त करण्यात आल्या. यामध्ये बॅग, मोबाईल फोन, पर्स, लॅपटॉप व इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश आहे. या रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांना प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेवरील गुन्हे, अतिरेकी हिंसाचार, रेल्वे वाहतूक विस्कळीत होणे इत्यादी विविध सुरक्षा आव्हानांचाही सामना करावा लागतो. रेल्वे संरक्षण दलाच्या या शूर सैनिकांच्या कार्याचा सारांश सुरक्षा, दक्षता आणि सेवा असा देता येईल आणि त्यांनी नेहमीच अत्यंत निष्ठेने, सतर्कतेने आणि धैर्याने आपले कर्तव्य पार पाडत आहेत.

| जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मध्य रेल्वेवरील सुटका/पुनर्मिलन करण्यात आलेल्या मुलांचे विभागनिहाय तपशील या प्रमाणे | |
|---|---|
| मुंबई विभाग | ३७९ मुले (२४२ मुलगे आणि १३७ मुली) |
| भुसावळ विभाग | २४७ मुले (१४१ मुलगे व १०६ मुली) |
| पुणे विभाग | २४६ मुले (२११ मुलगे आणि ३५ मुली) |
| नागपूर विभाग | १६८ मुले (१०७ मुलगे व ६१ मुली) |
| सोलापूर विभाग | ५९ मुले (३९ मुलगे व २० मुली). |

| प्रवाशांच्या पुनर्प्राप्त केलेल्या सामानाचे विभागनिहाय तपशील | |
|---|---|
| मुंबई विभाग | ६४९ वस्तूं २ कोटी ५५ लाख रुपये. |
| भुसावळ विभाग | २६१ वस्तूंची १ कोटी ७ लाख रुपये. |
| पुणे विभाग | १७१ वस्तूं ३९ लाख ७३ हजार रुपये. |
| नागपूर विभाग | ३२२ वस्त ६७ लाख ८९ हजार रुपये. |
| सोलापूर विभाग | ८८ वस्तूं ५१ लाख ८६ हजार रुपये. |

# कोणत्याही क्षेत्रात जिद्द हवी : घोडके पाटील

## ● पोकळे यांचा शेरेवाडी, भागाईवाडीकरांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**



कोणत्याही क्षेत्रात अशक्य काहीच.नसते मात्र त्यासाठी जिद्द चिकाटीअसली की यश मिळतेच,वैभव पोकळे यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षा २०२३ मध्ये राज्यात सातवा क्रमांक मिळवत दुय्यम निबंधक श्रेणी १पदावर निवड झाली.पोकळे यांचे यश हे युवा-युवतींना प्रेरणा व स्फूर्ती देणारे असल्याचे मत भागाईवाडी गावचे माजी सरपंच तथा सरपंच परिषदेच्या महिला जिल्हा अध्यक्षा कविता घोडके पाटील यांनी सांगीतले.

वैभव पोपळे हे भागाईवाडी, शेरेवाडी गावचे स्नेही असल्याने आजिनाथ हावळे परिवाराने त्यांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी ग्रामपंचायत सदस्य विजय घोडके, वैजनाथ हावळे, सोसायटी संचालक विनोद हावळे, जयसिंह चौधरी, अनंत घोडके, अनंत हावळे, नेताजी घोडके, सुधीर घोडके, बाबासाहेब हावळे, मधुकर पाटील महिला सदस्या उपस्थित होते. माता-पित्याच्या कष्टाची जाणीव मनात घेवून शैक्षणिक,व्यवसाय, क्षेत्रात सक्सेस होता येत हे पोकळे यांनी दाखवून दिले.पहिल्या प्रयत्नात यश मिळवले.तीन ठिकाणी आलेली नौकरीची आँफर आली मात्र त्यांनी दुय्यम निबंधक कार्यालयातील नौकरीस प्राधान्य दिल, शेद्री गावचे ते प्रथम अधिकारी असल्याचे कौतुक घोडके-पाटील यांनी केले

# सोलापूर ते गुड्डापुर पदयात्रा संपन्न

## ● अखंडितपणे ४९ वे वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**



सोन्नलगी ते श्रीशैल पदयात्रा भक्त मंडळ ट्रस्ट यांच्यावतीने वेदमूर्ती राजशेखर स्वामी-हिरेमठ यांच्या नेतृत्वाखाली वेदमूर्ती श्रीशैल स्वामी-हिरेमठ यांच्या सानिध्यात गेल्या ४९ व्या वर्षांपासून श्री दानम्मादेवी दर्शनासाठी सोलापूर ते गुड्डापुर पदयात्रा काढण्यात येते.

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील गुड्डापूर येथील श्री दानम्मादेवीचे दर्शन चालत जाऊन घेण्याचे पुण्य भक्तांच्या पदरी पडावे यासाठी ही पदयात्रा सुरू करण्यात आली आहे. या पदयात्रेस जवळपास सहा दिवस लागतात. या पदयात्रेत जवळपास ३०० महिला, पुरुष व लहान मुले सहभागी होतात. यंदाची पदयात्रा मंगळवार दि. ३ डिसेंबरला सोलापूरहून मार्गस्थ झाली. ती गुड्डापूर येथे ८ डिसेंबर रोजी पोहोचली.

पदयात्रेचा पहिला मुक्काम दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथे तर दुसरा मुक्काम येळगी, तिसरा मुक्काम बरडोल, चौथा मुक्काम हळदी, चौथा मुक्काम उटगी आणि पाचवा मुक्काम गुड्डापूर येथे करण्यात आला. वाटेत दुपारी व मुक्कामाच्या ठिकाणी तेथील भक्तांकडून अन्नदानाची सेवा करण्यात आली होती. टाकळी येथे मल्लिनाथ बिराजदार यांच्या ठिकाणी भाविकांच्या आंघोळ, चहा व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच या पदयात्रेत डॉ. संजय कळके यांच्या वतीने मोफत औषधोपचार सेवा देण्यात आली. पदयात्रा यशस्वी करण्यासाठी मारुती जोकारे, शिवबसप्पा इंडी, सोमनाथ परशेट्टी, येसन्ना बिराजदार मल्लिकार्जुन कोठे, शशिकांत बगले, संतोष संकद आदी भक्तांनी परिश्रम घेतले.



# ‘अभाविप’च्या अधिवेशन कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ५९ वे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अधिवेशन, सोलापूर येथे २३ ते २५ डिसेंबर रोजी संपन्न होणार आहे. अधिवेशनामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून जवळ जवळ १५०० विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनाची पूर्व तयारी अभाविप सोलापूर चे कार्यकर्ते करत आहेत. पूर्व तयारी बैठक, कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यात येणारे अधिवेशन संपर्क कार्यालयाचे उद्घाटन अभाविपचे राष्ट्रीय सह संघटनमंत्री देवदत्त जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी भारतीय रेल्वे सोलापूर विभागचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य प्रबंधक श्री योगेश पाटील, अभाविप प्रदेश सहमंत्री आदित्य मुस्के, जिल्हा सहप्रमुख प्रा.धन्यकुमार बिराजदार, महानगर मंत्री यश उडाणशिव व मोठ्या संख्येने पूर्व कार्यकर्ते, प्राध्यापक व विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.

# दुष्कर्म केल्याप्रकरणी आश्रम संचालकास अंतरिम अटकपूर्व जामीन

**सोलापूर. दि. ९ डिसेंबर -**

येथील महिलेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी संजय नागनाथ जाधव (वय ४२, रा. सोलापूर) यास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मनीष पितळे यांनी अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

पीडित महिला ही तिच्या मैत्रिणीच्या मुलीस अनाथ आश्रमात सोडविण्याकरता दोन वर्षांपूर्वी गेली होती. त्यावेळी तेथे आरोपी संजय जाधव याच्याशी तिची ओळख झाली. त्यानंतर ती तेथे अनाथ मुले दाखल करण्याचे काम करीत होते. त्यानंतर तिचे काम पाहून तिस संस्थेमध्ये नोकरी लावतो व ती घटस्फोटीत असल्याचे माहित असल्याने व आरोपीची पत्नी मयत असल्याने तिस लग्नाचे आमिष दाखवून संजयने तिच्याशी दुष्कर्म केले. पिडीतेने लग्नाकरिता विचारणा केली असता, आरोपीने नकार दिला म्हणून तिने पोलीस आयुक्तालयात तक्रारी अर्ज दाखल केला होता. त्यावर आरोपीने लग्न करतो व नोकरी लावतो अशी खात्री दिल्याने तिने तो अर्ज मागे घेतला, परंतु आरोपीने लग्न न केल्यामुळे २७ जुलै २०२४ रोजी पीडितेने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. या गुन्ह्यात अटक होऊ नये म्हणून आरोपी संजयने जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर आरोपी संजयने मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळणेकरिता अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी होऊन आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद मान्य करून न्यायमूर्तींनी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला. यात सरकारतर्फे अॅड.ऋतुराज आंबेकर यांनी तर आरोपीतर्फे अॅड.रितेश थोबडे यांनी काम पाहिले.



# राज्यस्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेत केकडे कॉलेज तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**


वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, अंतर्गत भगवान महावीर अध्ययन केंद्र व श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय अहिंसा तत्त्वज्ञान प्रश्नमंजूषा-२०२४ स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालय गटात, मातोश्री गंगुबाई केकडे ज्यु.कॉलेज सोलापूरमधील विज्ञान शाखेतील, अंजली तोपुल, प्रियंका मिस्किन, वैभवी जाधव, प्रीति मिस्कीन यांनी तृतीय क्रमांक मिळवला. त्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व ६०० रू.रोख बक्षिस म्हणून देण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव महेश कोठे, अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष देवेंद्र कोठे, खजिनदार प्रथमेश कोठे, संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका, प्राचार्य सतीश मल्लाव, मुख्याध्यापिका तनुजा मारपल्ली,विभाग प्रमुख प्रा. नवनाथ व्हटकर यांच्यासह सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. सहभागी स्पर्धकांना प्रा. डॉ. प्रशांत चाबुकस्वार यांचे मार्गदर्शन लाभले.

# पंखाशिवाय गरुड नाही आणि बांबूशिवाय बुरुड नाही

**बाराव्या शतकातील संत बुरुड केतेश्वर महाराजांची जयंती महाराष्ट्रात दि.१० डिसेंबर रोजी साजरी करण्यात येते. त्यानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर टाकण्यात आलेला हा एक प्रकाशझोत.**

बारावे शतक हे कर्नाटकच्या इतिहासातील सुवर्णयुग मानले जाते. महात्मा बसवेश्वर यांच्यासह अनेक समकालीन संत, महापुरुष याच शतकात झाले. आपल्या कार्यकर्तृत्वाने आणि सामाजिक सेवेला वाहून घेण्याच्या वृत्तीने त्यांना जनमाणसात देवत्त्व प्राप्त झाले. १२ व्या शतकात वर्णाश्रम पद्धती अत्यंत कडक होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या सेवेत असलेल्या शुद्रांची दयनीय अवस्था होती. महात्मा बसवेश्वरांनी शुद्र वर्गाला वर आणण्याचा प्रयत्न केला.त्यासाठी अनुभव मंटपाची स्थापना करुन उपेक्षित समाजाला खुले व्यासपीठ उपलब्ध केले. सामाजिक समतेचा पुरस्कार करण्यात त्यांच्या प्रयत्नाचे ते पहिले पाऊल ठरले. सुमारे साडे आठशे वर्षापूर्वी ७७० सदस्य असलेले अनुभव मंटप हे जगातील पहिले संसद मानले स्थान जाते. ज्यात अष्टपैलू हिऱ्याप्रमाणे चमकणाऱ्या मेदार केतय्या म्हणजेच केतेश्वर महाराज यांना मानाचे स्थान होते. कारण ते सर्वश्रेष्ठ शिवभक्त होते. कायकवे कैलास म्हणजे काम (कष्ट) हेच स्वर्ग अशी केतय्यांची धारणा होती. ते त्यांनी आयुष्यभर अंगीकारले. समता आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी त्याकाळी झालेल्या सामूहिक प्रयत्नात अग्रेसर राहिलेले संत केतय्या बाराव्या शतकातील ते एक थोर संत होऊन गेले. बांबूच्या काड्यापासून दुरुडी, टोपल्या, सूप, पाळणे आदी गृहोपयोगी वस्तू तयार करण्याचा त्यांचा मूळ व्यवसाय होता.


शिवभक्त संतश्री बुरुड केतेश्वर महाराज.

संत केतय्या हे श्रमजीवी तर होतेच. शिवाय ते एक श्रेष्ठ वचनकारही होते. मानवी जीवनाला मार्गदर्शक ठरावीत अशी १४ वचने (अभंग) त्यांनी लिहिली. शिक्षणाचा प्रसार-प्रचार नसताना, त्यावेळी संतांची ही वचने जनमानसात रुजविणे महत्त्वाचे होते. या वचनांमध्ये जीवनाचे सत्य, तत्वज्ञान, अध्यात्म आणि मार्गदर्शक तत्त्वे होती. बाराव्या शतकातील संत साहित्यिकांच्या मांदियाळीत एक चारित्र्य चक्रवर्ती जन्माला आला. त्याचे नाव मेदार (बुरुड) केतय्या. त्यांचा कार्यकाळ इ. स. ११६० चा सांगितला जातो. अनुभव मंडपाच्या प्रयत्न वातावरणात त्यांचे बालपण गेले. आयुष्य समाजासाठी घालवण्याचे उदात्त ध्येय उराशी बाळगून आपल्या कार्यातून त्यांनी आदर्श घालून दिले. सत्य, शुद्धता आणि अर्थप्राप्ती यासाठी तत्कालीन संतांनी आपल्या व्यवसायालाच देव मानण्याचा मार्ग अवलंबला. त्यानुसार केतय्या यांनी याच तत्त्वावर आधारित बांबूपासून विविध वस्तू बनवण्याचे कार्य करत समाजाला गृहोपयोगी वस्तू पुरवण्याची सेवा केली. प्रत्यक्ष देव देवतांनी ही केतय्यांची परीक्षा घेतली. जंगलात जाऊन बांबू तोडणे आणि आलेल्या उत्पन्नातून करत होते.

दासोह (अन्नछत्र) चालवणे हेच त्यांचे नित्यकर्म होते. परिस्थिती अत्यंत हलाखीची, स्वतःच्या पोटाची आबाळ असतानाही केतय्या आणि त्यांच्या पत्नी सातव्वा यांनी कधीच आपल्या सेवाकार्यात खंड पडू दिला नाही. बुरुड केतय्यांनी कधी परधनाची अपेक्षा केली नाही आणि चालत आलेल्या संपत्तीला हात लावला नाही. स्वकष्टातूनच जनसेवा केली. केतय्या निस्सीम शिवभक्त होते. परमेश्वरावर त्यांची अटळ श्रद्धा होती. आपल्या आवडत्या भक्तांची देव नेहमीच परीक्षा घेतो. बांबूच्या झाडापासून गृहोपायोगी वस्तू तयार करणे हाच त्यांचा कायक होता. त्यांनी परमेश्वराची सत्वपरीक्षा लिलया पेलली, आपली निष्ठा, सिद्ध करण्यासाठी बुरुड केतय्यांना सत्वपरीक्षा द्यावी लागली. म.बसवेश्वरांनी कुडलसंगमदेवा हे वचनांकित अंगीकारले. त्याचप्रमाणे बुरुड केतय्या यांनी गवरेश्वर या अंकीत नामाचा वापर आपल्या वचनांमध्ये केला आहे. गवर म्हणजे बांबूच्या काठीपासून सूप, टोपल्या, दुरुडी आदी गृहोपयोगी वस्तू बनवणारे. गवर याचा दुसरा अर्थ हा व्यवसाय करणारे बुरुड. संत केतेश्वरांना केत, केतीदेव, केतय्या, क्यातय्या, नंदे, केतीदेवय्या अशा विविध नावांनी ओळखले जायचे.

**- दशरथ वडतिले, पत्रकार**
**सोलापूर. ९४२२४५७१००**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मंगळवेढा तहसील कार्यालयात ना पाणी, ना स्वच्छतागृहे

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिला आंदोलनाचा इशारा; नागरिकांमधून प्रचंड संताप

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.९ डिसेंबर**

मंगळवेढा तहसील कार्यालयात कामानिमित्त ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची व महिलांच्या टॉयलेटची व्यवस्था नसल्याने महसूल प्रशासनाच्या कारभाविरुध्द संताप व्यक्त होत असून तात्काळ पाण्याची व टॉयलेटची व्यवस्था करावी अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देवदत्त पवार यांनी महसूल प्रशासनास दिला आहे.

मंगळवेढा तहसील कार्यालयासाठी मागील सात ते आठ वर्षापूर्वी लाखो रुपये खर्च करुन शासनाने टोलेजंग नव्याने इमारत बांधली आहे. मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून विविध कामानिमित्त नागरिक येथे दररोज येत असतात कार्यालयाच्या गेट जवळच पाण्याची व्यवस्था केली आहे




### अधिकाऱ्याची खंत

एका नायब तहसीलदाराने बदलीनंतरच्या निरोप प्रसंगाच्या कार्यक्रमाला टॉयलेट व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेबाबत खंत व्यक्त करुन हे काम करणे बाकी असल्याचे बोलून दाखविले होते. तद्नंतरही अधिकाऱ्याला अद्यापही याबाबत जाग आलेली दिसून येत नाही. वरील दोन्ही सोयींची पूर्तता तात्काळ करावी अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे देवदत्त पवार यांनी प्रशासनास दिला आहे.

मात्र अनेक महिन्यापासून हे पाणी बंद असल्याने येणाऱ्या नागरिकांच्या घशाला कोरड पडत असून परिसरातील हॉटेलमधून पाण्याच्या बाटल्या विकत घेऊन घशाची तहान भागविण्याची वेळ गोरगरीब नागरिकावर आली आहे. तसेच ग्रामीण भागातून महिला वर्गही कामानिमित्त येथे दररोज येत असतो मात्र या ठिकाणी महिलांच्या टॉयलेटची व्यवस्था नसल्याने महिलांची कुचंबणा होत असल्याच्या तक्रारी आहेत.

येथे केवळ सरकारी कर्मचाऱ्यांनाच टॉयलेट बांधलेले आहेत. त्यामुळे नागरिकांना येथे टॉयलेटला जाण्यास मज्जाव केला जात असल्याचे सांगण्यात येते, परिणामी नागरिकांना मोकळ्या मैदानात उभी केलेल्या वाहनांचा आडोसा घेऊन लघुशंका करण्याची वेळ येत आहे. टॉयलेट अभावी महिलांची परिस्थिती खूपच गंभीर असल्याच्या प्रतिक्रिया आहेत. शक्यतो शासकीय कार्यालयात पाण्याची व्यवस्था व टॉयलेटची व्यवस्था करावी असा सर्वसाधारण नियम असतानाही या नियमाकडे डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे. लाखो रुपये खर्चून नवीन इमारत बांधली मात्र महिला व नागरिकांसाठी टॉयलेटची व्यवस्था का करण्यात आली नाही? असा संतापजनक सवाल सुज्ञ नागरिकामधून केला जात आहे.

## संक्षिप्त वृत्त




### कुर्डूवाडीतील आदर्श पब्लिक स्कुलला कृतिशील शाळा पुरस्कार

**कुर्डूवाडी, दि. ९ डिसेंबर-**
येथील आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या शिरपेच्यामध्ये आज आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला असून सिंहगड कॉलेज कोर्टी, पंढरपूर या ठिकाणी महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिती आयोजित पुरस्कार वितरण समारंभामध्ये कुर्डूवाडी येथील आदर्श पब्लिक स्कूलला उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कृतिशील शाळा पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कृतिशील शाळा म्हणून जिल्ह्यातील आदर्श एकमेव शाळा असल्याचे या पुरस्काराने स्पष्ट होते. या कार्यक्रमप्रसंगी संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचलिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापिका शकीलाबी सय्यद उपस्थित होते.




### मोडनिंब येथील शेखर सुर्वे यांना कृतिशील शिक्षक पुरस्कार प्रदान

**मोडनिंब, दि. ९ डिसेंबर-**
महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात येणारा कृतीशील शिक्षक पुरस्कार शेखर एकनाथ सुर्वे यांना प्रदान करण्यात आला. सिंहगड कॉलेज कोर्टी येथे माजी आ. दत्तात्रय अच्युतराव सावंत यांच्या हस्ते मानपत्र, शाल श्रीफळ देऊन या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. शैक्षणिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल आपणास कृतीशील शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे सावंत यांनी सांगितले. मोडनिंब येथील श्री संगनबसवेश्वर प्रशालेत शेखर सुर्वे हे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. यावेळी शेतकरी संघटनेचे एकनाथ सुर्वे, सहकारी बनसोडे, मुलानी, चोपडे, पंडित, शिंदे, खंदारे, परबत, गवळी, रितेश सुर्वे उपस्थित होते.

### डॉ. दिगंबर नेटके यांची कल्याणशेट्टी महाविद्यालयास सदिच्छा भेट

**अक्कलकोट, दि. ९ डिसेंबर-**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांचे विशेष सल्लागार डॉ. दिगंबर नेटके यांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयास सदिच्छा भेट देऊन महाविद्यालयाच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले. महाविद्यालयाच्या वतीने डॉ. दिगंबर नेटके यांचा सपत्नीक सत्कार संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. नेटके म्हणाले की, कर्नाटक महाराष्ट्र सीमावर्ती भागात कल्याणशेट्टी महाविद्यालय ज्ञानदानाचे कार्य करत आहे. विद्यार्थ्यांना भौतिक तसेच शैक्षणिक सुविधा देत आहे, ही बाब कौतुकास्पद आहे. महाविद्यालय विनाअनुदानित असून देखील विद्यार्थी केंद्रित उपक्रमामुळे प्रगती करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार, प्रा. शितल झिंगाडे-भस्मे आदी उपस्थित होते.

# उमेशचंद्र स्मृती चषकावर मुलींचा डंका

## प्राथमिक विभागात जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक विभागात पंढरपूरच्या द. ह. कवठेकर प्रशालेची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ डिसेंबर-**

स्व. प्रा. उमेशचंद्र खेडकर स्मृती चषक वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्राथमिक विभागात जिल्हा परिषद शाळांनी तर माध्यमिक विभागात पंढरपूरच्या द.ह. कवठेकर प्रशालेच्या सर्वाधिक विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले. मुक्ता राऊत, भाविका वाजे, सानवी कलढोणे आणि स्नेहल जानकर अशा चारही मुलींनी चार गटांमध्ये प्रथम क्रमांक मिळवले. त्यामुळे उमेशचंद्र स्मृती चषकावर मुलींचा डंका दिसून आला.

उमेशचंद्र खेडकर मित्र परिवाराच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे गेल्या बारा वर्षांपासून आयोजन करण्यात येत आहे. यंदाच्या स्पर्धेत तब्बल २१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. प्राथमिक विभागाचे दोन तर माध्यमिक विभागाचे दोन अशा चार गटांमध्ये ही स्पर्धा होते. सोलापूर जिल्ह्यात अत्यंत नावाजलेली आणि मानाची स्पर्धा म्हणून सध्या उमेशचंद्र चषकाकडे पाहिले जाते. उमेशचंद्र स्मृती चषक स्पर्धा रविवारी संपन्न झाली. यामध्ये प्राथमिक विभागातील बालगटात मुक्ता राऊत प्रथम, हर्षवर्धन क्षीरसागर द्वितीय, प्रज्ञेश पाठक तृतीय तर परी माळी आणि रेवा मिसाळ या दोन्ही विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.



### माध्यमिक विभागातील विजेते

माध्यमिक विभागातील पाचवी ते सातवी गटात स्नेहल जानकर प्रथम, मृण्मयी वहीत द्वितीय, आशिष दुपडे तृतीय तर आयुष्या पवार आणि गौरी भोसले यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. माध्यमिक विभागातील आठवी ते दहावी गटात सानवी कलढोणे प्रथम, राधिका गोरे द्वितीय, साई तेंडुलकर तृतीय, तर सार्थक लेंगरे आणि श्रुती देठे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. चारही गटातील विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम स्मृतिचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप होते.

### प्राथमिक विभागातील विजेते

प्राथमिक विभागातील तिसरी आणि चौथी बालगटामध्ये भाविका वाजे प्रथम, गाथा मिले द्वितीय, तस्मय रत्नपारखी तृतीय तर अनघा कुलकर्णी आणि श्रावणी कोंडुभैरी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

सलग बाराव्या वर्षी होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेसाठी मैत्रेयी केसकर, समाधान भोरकडे, परशुराम कोरे, प्रशांत ठाकरे, शहाजी देशमुख, सुनील जगताप आदींनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचे उद्घाटन पंढरपूर नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी सुनील वाळूजकर, मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी तर पारितोषिक वितरण पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नानामालक कवठेकर आणि शांताराम कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी प्रशांत वांगीकर, गणेश धांडोरे, डॉ. प्रविदत्त वांगीकर, डॉ. गिरनार गवळी, डॉ. आकाश रेपाळ, डॉ. आनंद भिंगे, सचिन लादे, राजू शहा, प्रताप चव्हाण, सोमनाथ गायकवाड, दीपक इरकल, शशिकांत कराळे, शशिकांत घाडगे, राम मोरे, रवी ओहाळ, सचिन मेलगे, मंदार केसकर, अमित वाडेकर, संजीव मोरे, विनया उत्पात कुलकर्णी, पायल शहा, ईशान इरकल आदींनी परिश्रम घेतले.




### प्रा. सागर थोरात यांना राज्यस्तरीय कृतिशिल मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ९ डिसेंबर-**

माढा येथील आर्या पब्लिक स्कूल येथील प्रा. सागर जीवराज थोरात यांना राज्यस्तरीय कृतिशील मुख्याध्यापक म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य कृती समितीचे प्रदेश सचिव दत्तात्रय सावंत यांनी पुरस्कारासाठी निवड केल्याचे पत्राद्वारे कळविले होते.

८ डिसेंबर रविवारी त्यांना मान्यवरांच्या हस्ते सिंहगड कॉलेज, कोर्टी येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. सागर थोरात हे या विद्यालयांमध्ये गेली सात वर्ष हिंदी विषयाचे अध्यापनाचे काम करत आहेत. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर विविध विषयावर शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांचे संस्थापक माजी आ. बबनराव शिंदे, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिताताई शिंदे, प्राचार्य डॉ. महेंद्र कदम, प्राचार्य डॉ. हाशेमबेग मिर्झा, प्राचार्य राजेंद्र लोखंडे, प्राचार्य राजेंद्र मारकड, प्राचार्य डॉ. सचिन जाधव, प्राचार्य डॉ. नितीन उबाळे, प्राचार्य महादेव सुरवसे, प्राचार्य हनुमंत खापरे, प्राचार्य प्रवीणकुमार लटके, प्राचार्या प्रमिला मगर यांनी अभिनंदन केले.




### मंद्रुपमध्ये संभाजी आरमार शाखेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ डिसेंबर-**

मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेकडो युवा कार्यकर्त्यांनी संभाजी आरमारच्या डॅशिंग कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत संभाजी आरमारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. मंद्रूप येथे संभाजी आरमारच्या शाखेचा उदघाटन सोहळा संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले.

शाखेच्या नूतन शाखाप्रमुखपदी ओंकार झेंडेकर, उपशाखाप्रमुख कलप्पा वाघमोडे, सचिव आकाश बुरगुडे, संघटक वासुदेव नाटीकर, खजिनदार रवी वाघमोडे यांची निवड करण्यात आली. यावेळी श्रीकांत डांगे यांनी ज्याप्रमाणे अठरा पगड जाती, बारा बलुतेदारांचा विश्वास शिवरायांनी संपादन केला होता तोच विश्वास संभाजी आरमारने मागील १६ वर्षाच्या कामाच्या जोरावर संपादन केला असून मंद्रुव भागातील युवा वर्गाला सोबत घेऊन परिसरातील जनतेच्या रोजच्या जगण्यात प्रगती साधण्यासाठी संभाजी आरमार अहोरात्र कार्यरत राहील, असा मनोदय व्यक्त केला. याप्रसंगी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, दक्षिण तालुका प्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, शिक्षण संघटना प्रमुख अजिंक्य पाटील, उपशहरप्रमुख रेवण कोळी, युवा सेनेचे अर्जुन शिवसिंगवाले, उद्योजक महेश घोडके उपस्थित होते.

### श्रीपूर येथील शहिद निवृत्ती जाधव स्मारक रस्त्याचे काँक्रीटीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ९ डिसेंबर-**

श्रीपूर येथील वीर जवान निवृत्ती जाधव यांच्या श्रीपूर येथील चंद्रशेखर आगाशे विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या स्मारकाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रीटीकरण केल्याने स्मारकाचे सौंदर्य वाढणार आहे.

शहीद निवृत्ती जाधव हे गडचिरोली येथे कार्यरत असताना नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरुंगामध्ये त्यांचे निधन झाले होते. देशासाठी शहीद झालेल्या आपल्या पतीचे स्मारक होण्यासाठी पत्नी सुरेखा जाधव यांनी वीर जवान शहीद निवृत्ती जाधव यांचे नावे प्रतिष्ठान काढले त्यास सारिका नाईकनवरे यांनी साथ दिली . तर चंद्रशेखर विद्यालयाचे विद्यमान मालक डॉ. रामदास देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शहीद निवृत्ती जाधव यांचे कार्याचे स्मरण व प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने शाळेची जागा स्मारकासाठी मोफत दिली. त्या ठिकाणी आज सुंदर स्मारक उभे आहे. महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे नगरसेवक राहुल रेडे-पाटील, तेजश्री विक्रमसिंह लाटे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी माढ्याचे माजी आ. बबनदादा शिंदे यांच्या फंडातील रकमेतून स्मारकाकडे जाणारा रस्ता क्रॉंकीटचा केला. यावेळी नगरसेवक सोमनाथ मुंडकणे, वीर पत्नी सुरेखा जाधव, मौला पठाण, विक्रमसिंह लाटे, दत्ता दोरगे, बापू रेडे-पाटील, जगदीश इंगळे, पत्रकार दत्तात्रय नाईकनवरे, इम्रान शेख, रमेश देवकर, सतीश पवार, धर्मेश जाधव उपस्थित होते.



### महाळुंग-श्रीपूरचे प्रेरणा स्थळ

देशाच्या सीमांचे रक्षण करताना तसेच अंतर्गत दहशतवाद विरोधी काम करताना अनेकांना वीर मरण येते. तसेच आपल्या गावाचा सुपुत्र वीर जवान निवृत्ती जाधव नक्षलवाद्यांच्या भूसुरंग स्फोटात शहीद झाला, त्याचे स्मारक म्हणजे येणाऱ्या तरुण पिढीला प्रेरणा देणारे आहे. ते स्थळ विकसित झाले पाहिजे. या भावनेतून हे काम होत आहे.
**-राहुल रेडे-पाटील, नगरसेवक**




### करमाळ्यातील गांधी हायस्कूलचे माजी विद्यार्थी ४५ वर्षांनंतर भेटले

#### वर्ग मित्रांचे भरले संमेलन; जुन्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ९ डिसेंबर-**

करमाळा येथील महात्मा गांधी हायस्कूलमध्ये शिक्षण घेतलेले मित्र ४५वर्षानंतर एकत्र येत वर्गमित्रांचे संमेलन भरले. यावेळी एक सुखद झुळुक आसल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

करमाळा येथील मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष सचिन साखरे यांच्या पुढाकाराने मेडिकल स्टोअर आहे. त्याच्या मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने करमाळा येथील महात्मा गांधी हायस्कूलमध्ये १९७९ साली दहावी 'अ' तुकडीतील मित्र, मैत्रिणींचा स्नेहमेळावा आयोजित केला. जुन्या आठवणी जागवत मैत्रीच्या नात्याला उजळा देण्याची संधी न सोडता वीस जण दिवसभर एकत्र येऊन प्रथम सर्वांनी कमलाभवानी मंदिरात दर्शन घेऊन आपल्या शाळेत जाऊन जुन्या आठवणी जागवल्या. यावेळी त्यांचे शिक्षक कुंभार व मोरे यांना आवर्जून आमंत्रित करण्यात आले होते. सध्या ८६ वर्षीय असलेले आर. आर. मोरे यांच्या प्रकृतीचे रहस्य सर्वांना प्रेरणादायी ठरले. यावेळी एकमेकाची चेष्टा, मस्करी, विनोद करत सर्वांनी आपल्या जीवनातील सुख-दुःख एकमेकांसमोर व्यक्त केले

यावेळी पुण्याहून अनिल कोकिळ, दिनेश भंडारे, रवींद्र चव्हाण, रवींद्र जगताप, ललित बिनायकीया, सुनंदा जाधव-ढेरे, संगीता शिंदे-घावटे, अरविंद सोळंकी, अहिल्यानगरहून सतिश कुलकर्णी, इचलकरंजीहून सुरेंद्र दास यांनी हजेरी लावली. करमाळा स्थानिकमधून राजेंद्र महाजन, डॉ. राजेश शाह, सचिन साखरे, शिवलाल संचेती, नितीन शियाळ, डॉ. जयंत कापडी, विद्युलता झोळ-अडसूळे, निनाद चंकेशवरा, रत्नाकर हेबांडे, विठ्ठल भणगे असे एकूण २० जण उपस्थित होतो. सूत्रसंचालन सुरेंद्र दास यांनी केले.

#### पुन्हा पुन्हा भेटू, आनंद वृद्धिंगत करु

महात्मा गांधी विद्यालय करमाळा येथील सहा वर्षाच्या शालेय जीवनाने दिलेले आनंदाने क्षण आपण वारंवार अनुभवत राहिलो तर आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात नविन शक्ती प्राप्त होतेच आणि निर्भेळ आनंद प्राप्त होतो, याची खात्री पटली. पुन्हापुन्हा भेटून हा आनंद वृद्धिंगत करण्याचे निश्चित करून सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला.

# सोलापूर जिल्ह्यातील केळी पिकावर 'चिलिंग'चे संकट

## केळी उत्पादकांच्या अर्थकारणावर विपरित परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ९ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील केळी पिकावरील चिलिंग समस्येमुळे केळी उत्पादक शेतकरी अडचणीत आला असून याचा परिणाम जिल्ह्यातील केळी निर्यातीवर होऊन शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर होणार आहे.

केळी हे उष्ण व दमट हवामानात येणारे पीक असून सर्वसाधारणपणे जिल्ह्यातील वातावरण अनुकूल असले तरी सलग काही दिवसांच्या कडाक्याच्या थंडीमुळे पिकावर चिलिंग इंज्युरी होऊन याचा परिणाम पिकाच्या दर्जावर होतो. सध्या जिल्ह्यात काही ठिकाणी पिकावर चिलिंग दिसू लागल्याने केळी निर्यातीसाठी याची अडचण निर्माण होत आहे. शेतकऱ्यांना पिकाचे भरघोस उत्पादन मिळून ही अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्याचे फार मोठे आर्थिक नुकसानीला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. यावर्षी १५ ते ३० नोव्हेंबर दरम्यान सोलापूर जिल्ह्यात थंडी वाढल्याने याचा मोठा परिणाम काढणीला आलेल्या केळीवर जाणवत आहे. काही केळी बागांवर चिलिंग इंज्युरी दिसू लागल्याने केळी दरावर याचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली असून केळी उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत . काही केळी व्यापारी चिलिंगचे कारण सांगून चांगल्या केळीचाही दर पाडून केळी खरेदी करण्याचा प्रयत्न करत आहे यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. केळीच्या रोपांपासून ते दुहेरी ठिबकचा वापर , शेणखत महागड्या रासायनिक व विद्राव्य खतांचा वापर यासाठी लाखो रुपये खर्च करून भरघोस उत्पादन घेतले असतानाही केवळ चिलिंगमुळे आपली केळी निर्यात होऊन चांगला दर मिळणार नसेल तर फार मोठ्या आर्थिक संकटात सापडणार आहे.



केळी पिकावर चिलिंग झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा शेतकऱ्यांनी हिवाळा सुरू होताच केळीमध्ये थंडीच्या काळात उबदार वातावरण राहिल याची काळजी घेतली पाहिजे. थंडी असली तरी पाणी व खत व्यवस्थापन नियमितपणे सुरूच ठेवले पाहिजे. केळीला पाणी शक्यतो रात्री किंवा सकाळी थंडी असल्याच्या वेळेतच सोडण्याचा प्रयत्न करावा. याशिवाय स्कर्टिंग बॅगचा वापर, मल्चिंग करणे, जास्त थंडीच्या वेळी केळी बागांमध्ये लाकडाचा, गव्हाचा, भाताचा भुसा जाळून याचा धूर करून वातावरण उबदार ठेवण्यासारखे उपाय केले पाहिजेत.
**-के. बी. पाटील, केळी पीक तज्ज्ञ, जैन इरिगेशन, जळगाव)**



मागील काही दिवसांच्या थंडीमुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या केळी भागांवर चिलिंग दिसू लागली आहे. पाच ते दहा टक्के चिलिंग असलेली केळी बहुतांश निर्यात कंपन्या खरेदी करतातच परंतु जादा चिलिंगची केळी बाहेर पाठवल्यास या केळीचे पेमेंट अडकण्याची शक्यता असल्याने केळी खरेदीदार ती जोखीम घेत नाहीत. आपल्या केळीवरची लिंग येणार नाही, याची काळजी शेतकऱ्यांनी घेणे गरजेचे आहे.
**-विष्णू पोळ, केळी निर्यातदार प्रतिनिधी, सनरिया ग्रो कंपनी**



# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री भगवंत हॉस्पिटल येथे नर्सिंग जीएनएम कॉलेजची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ डिसेंबर -**



श्री भगवंत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे नर्सिंग ऋछच् कॉलेजची स्थापना सह्याद्री नर्सिंग कॉलेजच्या नावाने जीएनएम बॅचचे स्वागत समारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नर्सिंग क्षेत्राच्या संस्थापिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल व श्री भगवंतच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे नियम व कायदे, शैक्षणिक वेळापत्रक आणि उपलब्ध विविध सुविधांची माहिती देण्यात आली. आपल्या भाषणात श्री भगवंत सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध न्युरोसर्जन डॉ. अमित पडवळ यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवरील शिक्षण उपलब्ध करुन देण्याची ग्वाही दिली. ऑर्थोपेडीक सर्जन डॉ. सुमित पडवळ यांनी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे स्वागत केले आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षण,क्लिनिकल एक्सपोजर,संशोधन संधी आणि विद्यार्थी सहाय्य सेवांच्या वचनबद्धतेवर भर देण्यास सांगितले. बालरोगतज्ज्ञ डॉ. दिग्गज दापके-देशमुख यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करण्याचा, गंभीर विचार विकसित करण्याचा, प्राध्यापक आणि मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन घेण्याचा सल्ला दिला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तात्रय पडवळ, न्युरोसर्जन डॉ.अमित पडवळ, डॉ. सुमित पडवळ यांच्यासह संचालक दादासाहेब कोरके, पांडुरंग घोलप, ज्ञानेश्वर गिरी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### टेंभुर्णीतील बौद्ध प्रतिष्ठानच्या शिबिरात ६७ जणांचे रक्तदान

**टेंभुर्णी, दि. ९ डिसेंबर-**

शिवाजीनगर, टेंभुर्णी येथील बौद्ध प्रतिष्ठान यांच्यातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर राबविण्यात आले. या शिबिरामध्ये ६७ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपला सामाजिक उपक्रमाचा वाटा उचलला. या कार्यक्रमाप्रसंगी नाना भैया युवा मंचचे सुरज देशमुख, यशपाल लोंढे, विकास धोत्रे,अविनाश धोत्रे, जयवंत पोळ, बुद्धभूषण लोंढे, गोरख देशमुख, सोनाईचे संचालक गणेश केचे, गणेश देशमुख, विजय कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य आप्पा हवलदार, शैलेश ओहोळ, वैभव देशमुख, यांचबरोबर गणेश खरात, गणेश लोंढे, गणेश खरे उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी बौद्ध प्रतिष्ठानचे सुरज शिंदे, अर्जुन साळवे, संदीप साळवे, भीमराव साळवे, विजय साळवे, रोहित भोसले, विनोद भोसले, अनिकेत कांबळे, करण कांबळे, कुणाल साळवे, आकाश लोंढे यांनी परिश्रम घेतले.

### मारकडवाडीत आ. गोपीचंद पडळकर, आ. सदाभाऊ खोत यांची आज सभा

**पिलीव, दि. ९ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी हे गाव विधानसभा निवडणूकीनंतर महाराष्ट्रातील एक मुख्य निवडणूकीचे केंद्र बनले आहे. कारण या ठिकाणी मोहिते पाटील व उत्तमराव जानकर गटाला वाटत आहे की याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उत्तम जानकर यांना गावाने जास्त बहुमत दिले आहे पण याठिकाणी प्रत्यक्षात भाजपाचे उमेदवार रामभाऊ सातपुते यांनाच प्रत्यक्षात जास्त मतदान झाले आहे.



यावरुन याठिकाणी ईव्हीएमवर संशयाचे भूत निर्माण करणयात आले आहे. प्रत्यक्षात मात्र आमदार रामभाऊ सातपुते यांनी या गावाला २१ कोटी ८९ लाख रुपये एवढा निधी दिला आहे. यामुळेच या गावाने रामभाऊ सातपुते यांना लिड दिले आहे. पण विरोधी गटाला हे अजिबात मान्य यामुळे यांनी फेक नरेटिव्ह सेट करीत ई व्हिम वर संशय व्यक्त केला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात हा मुद्दा चांगलाच गाजला असुन अगदी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनीही या गावाला भेट देत संशय व्यक्त केला आहे. तर याच फेक नरेटिव्हला सडेतोड उत्तर देणयासाठी मंगळवार दि. १० डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर व आ. सदाभाऊ खोत यांची मारकडवाडी येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

### आमदार ॲड. दिलीप सोपल यांचा बार्शीत रविवारी नागरी सत्कार

**बार्शी, दि. ९ डिसेंबर**

बार्शी विधानसभा निवडणुकीत विजय मिळवत आमदारपदी निवड झाल्याने तसेच वयाच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त ॲड. दिलीपराव सोपल यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन बार्शीकरांच्यावतीने रविवार दि.१५ डिसेंबर रोजी सायं. ६ वाजता जुना गांधी पुतळा सोमवार पेठ येथे करण्यात येणार आहे. यावेळी श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूरचे मुख्य महंत तुकोजी बुवा, परंडकर बृहन्मठ बार्शीचे श्री.ष.ब्र. राचलिंग शिवाचार्य परंडकर महाराज, तगरभूमी धाराशिवचे भंते सुमेदजी नागसेन, श्री भगवंत मंदिर बार्शीचे मुख्य पुजारी मधुकर बडवे, सोलापूरचे हाजी अय्यूबसाब कुरेशी, ख्रिश्चन धर्मप्रसारक रेव्ह विश्वास साळवी या विविध धर्मगुरुंच्या हस्ते नूतन आमदार दिलीप सोपल यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी धाराशिवचे खा. ओमप्रकाशराजे निंबाळकर व माढाचे खा. धैर्यशिल मोहिते-पाटील प्रमूख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.



### नराळे ग्रामपंचायत सरपंचपदी वैशाली भोसले बिनविरोध

**सांगोला, दि.९ डिसेंबर-**

नराळे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शेतकरी कामगार पक्षाच्या वैशाली पांडुरंग भोसले यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच पदाच्या रीक्त झालेल्या जागेच्या निवडीसाठी सहा डिसेंबर रोजी सर्व ग्रामपंचायत सदस्यांची विशेष बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीमध्ये सरपंच पदासाठी वैशाली भोसले यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली भिटकर यांनी जाहीर केले. यावेळी ग्राम महसूल अधिकारी स्नेहल पाटील, ग्रामपंचायत अधिकारी बिभीषन सावंत व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. गावातील विविध कामे मार्गे लावण्यासाठी आपण आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्यामार्फत पाठपुरावा करणार आहोत. गोरगरीब जनतेसाठी, महिलांसाठी शासनाच्या ज्या काही योजना आहेत, त्या सर्व योजनांचा लाभ घराघरापर्यंत पोहोचण्याचा आपण प्रयत्न करणार असल्याचे वैशाली भोसले यांनी यावेळी सांगितले.



# पंढरीत एक थाळी, एक थैली उपक्रम

## ● प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यासाठी नियोजन; निसर्गप्रेमी युवकांचे मोठे योगदान




**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.९ डिसेंबर -**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे मकर संक्रांतीपासून ते महाशिवरात्री पर्यंत महाकुंभमेळा होणार आहे. या कुंभमेळ्याच्या वेळी होणारा पत्रावळीचा कचरा टाळण्यासाठी आणि कचऱ्या पासून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी थाळी व पिशवी देण्याचा स्तुत्य असा उपक्रम सध्या सर्वत्र राबविण्यात येत आहे.

या उपक्रमा अंतर्गत पश्चिम महाराष्ट्रातून आत्तापर्यंत सुमारे चाळीस हजार स्टील थाळी आणि कापडी पिशवी संकलित करण्यात आलेल्या आहेत. पंढरपूरात देखील या उपक्रमात येथील निसर्गप्रेमी युवकांचा मोठा सहभाग असून शहर आणि तालुक्यातील हजारो लोक या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद देत आहेत. दरम्यान येत्या २० डिसेंबर पर्यंत नागरिकांना या उपक्रमात सहभागी होवून देणगी देता येणार आहे. या कुंभ मेळ्यासाठी जगभरातून भाविक प्रयागराज येथे दाखल होणार आहेत. कुंभमेळ्या दरम्यान येथे आलेल्या लाखों भाविकांना दररोज तेथील शेकडो आखाड्यांच्या मार्फत जेवणावळीचे नियोजन केले जात आहे. बहुतेक ठिकाणी जेवणावळींसाठी आतापर्यंत प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळी वापरल्या जात होता. ज्या की वापरल्यानंतर फेकून दिल्या जातात. यामुळे मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, थर्मोकोलचा कचरा होतो. मात्र अशा प्रकारचा प्लास्टिक, थर्माकोलच्या पत्रावळींचा कचरा पर्यावरणासाठी घातक ठरू नये, त्यामुळे या कुंभमेळ्या दरम्यान अशा प्रकारचा कचरा साठणार नाही यासाठी पश्चिम महाराष्ट्रात पूर्णम इको व्हिजन या संस्थेतर्फे 'एक थाळी, एक थैली' हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमा अंतर्गत कुंभमेळ्यात रोजच्या जेवणासाठी आत्ता पर्यंत स्टीलची तब्बल तब्बल ४० हजार ताटे संकलित झाली आहेत.

### ४० कोटींहून अधिक भाविक येण्याचा अंदाज

महाकुंभमेळा हा दर १२ वर्षानी एकदा आयोजित केला जातो. तीन पवित्र नद्यांच्या संगमासह भारतीय संस्कृती,अध्यात्म आणि परंपरा यांचा अद्‌भुत संयोग जुळून येतो. १३ जानेवारीपासून अर्थात पौष पौर्णिमेपासून ते २६ फेब्रुवारी महाशिवरात्री पर्यंत महाकुंभमेळा सुरू असणार आहे. यापूर्वी २०१३ मध्ये प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याचे आयोजन केले होते. यावेळी देखील कुंभमेळ्यात ४० कोटींहून अधिक भाविक येण्याचा अंदाज शासन आणि प्रशासनाकडून वर्तविला जात आहे.

### पर्यावरण प्रेमी संस्थांचा एक थाली, एक थैली उपक्रम

कुंभमेळ्यासाठी प्रयागराज येथे येणाऱ्या भाविकांना सर्व सोयी-सुविधा देण्यासाठी उत्तर प्रदेश प्रशासन प्रयत्नशील आहे.याचाच एक भाग म्हणून विविध संस्था, संघटना, प्रशासनाकडून मोफत भोजनाची व्यवस्था केली जाते. मात्र, जेवण देताना प्लास्टिक व धर्माकोलच्या ताटांचा वापर होतो. ज्यामुळे महाकुंभमेळ्या दरम्यान दररोज १ हजार २०० टन कचरा निर्माण होण्याची शक्यता आहे. या कचऱ्यामुळे पर्यावरणाला नुकसान होऊ नये, यासाठी गेले काही दिवस पर्यावरणप्रेमी संस्थांनी 'एक थाली, एक थैली' हा उपक्रम राबविला आहे.

### आत्तापर्यंत ४० हजार ताटे व पिशव्या जमा

एक थाली,एक थैली उपक्रमा अंतर्गत केवळ १२५ रुपये दान करण्याचे नागरिकांना आवाहन करण्यात आलेले आहे. या १२५ रुपयांमध्ये एक कापडी पिशवी व एक स्टीलचे (चारकप्प्यांचे) ताट हे या महाकुंभमेळ्यासाठी दिले जाणार आहेत. या आवाहनाला समाजातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमा अंतर्गत आतापर्यंत सुमारे ४० हजार स्टीलची ताटे व कापडी पिशव्या जमा करण्यात आल्या आहेत.




### ताट, थैलीचे असे होणार वितरण

पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी पिशव्या आणि कप्प्याचे ताट उत्तरप्रदेश येथील प्रयागराजला पाठविले जाईल, त्याठिकाणी पिशव्या दुकानदारा मार्फत भाविकापर्यंत पोहोचतील. अन्नछत्र चालविणाऱ्या संस्था, मठ, मंदिरे व आखाड्यांना ताटाचे वाटप केले जाणार असल्याची माहिती येथील पर्यावरण व निसर्गप्रेमी जागरुक नागरिक म्हणून खास ओळख असणाऱ्या आनंद नगरकर यांनी दिली.

### निसर्गाची, पर्यावरणाची होणारी हानी टाळली जाणार

झाडाच्या पानांपासून तयार केलेल्या पत्रावळी वापरल्या तर निसर्गाची हानी होईल व थर्माकोलच्या पत्रावळ्या वापरल्या तर पर्यावरणाची हानी होईल तसेच प्लास्टिक मुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी चांगल्या दर्जाची चार कप्प्याची स्टीलची थाळी व दर्जेदार कापडी पिशवी आलेल्या प्रत्येक भाविकास देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

### नागरिकांना केवळ १२५ रुपये देणगी देण्याचे आवाहन

एक थाळी व एक पिशवीसाठी साधारण १२५ रुपये इतका खर्च गृहित धरण्यात आला आहे. त्यामुळे एक थाळी व एक पिशवी खरेदीसाठी १२५ इतका खर्च येतो. त्यामुळे १२५ रुपयांच्या पटीत आपण कितीही देणगी (डोनेशन) देऊ शकता. आत्तापर्यंत पंढरपुरातून हजारो भाविकांनी देणगी (डोनेशन ) दिली आहे. येत्या २० डिसेंबर २०२४ पर्यंत इच्छुक नागरिकांना या उपक्रमासाठी देणगी देता येणार आहे. या कामी पर्यावरण संरक्षण गतिविधी पंढरपूरचे सदस्य प्रा.अभय उत्पात, विवेक बडवे, आनंद नगरकर, तुकाराम खंदाडे यांनी हातभार लावला.

## संत नामदेव पालखी सोहळ्याचे पंढरीत आगमन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ डिसेंबर-**

नामा म्हणे आता, लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर, समाधिस्थ ।। आलंकापूरी आळंदी येथे कैवल्य साम्राज्य श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करून परतीच्या दिशेने निघालेल्या संत नामदेव महाराज पालखी सोहळ्यांचे सोमवारी पंढरी नगरीत आगमन झाले.



मंगळवार दि.२६ नोव्हेंबर रोजी उत्पत्ती एकादशी व गुरुवार दि. २८ नोव्हेंबर रोजी आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळा साजरा झाला. या सोहळ्यासाठी संत-महंतांच्या पालख्यांसह लाखो भाविक आळंदीत दाखल झाले होते. अमावस्येपर्यंत पालखी सोहळ्यांचा मुक्काम आळंदी येथील श्री विष्णु मंदिर येथे होता. रविवार दि. १ डिसेंबर रोजी अमावस्येनिमित्त काल्याचा कार्यक्रम झाल्यानंतर संतांच्या पालखी सोहळ्यांनी परतीच्या दिशेने प्रवास सुरु केला.

सोमवार दि. ९ डिसेंबर, मार्गशीर्ष शु. ९ दिवशी पालखी सोहळ्यांचे दुपारी पाच वाजता इसबावी येथील विसावा मंदिराजवळ आगमन झाले. याठिकाणी महाराज मंडळी, मानकरी व नागरिकांनी दर्शन घेवून पालखी सोहळ्याचे स्वागत केले. याठिकाणी अभंग व आरती करण्यात आली. पालखी रथ फुलांनी सजविण्यात आला. त्यानंतर शाही लवाजम्यासह सनई-चौघड्याच्या निनादात, हरिनामाचा गजर करत पालखी सोहळा कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, सरगम चौक, भोसले चौक, भादुले चौक, महाद्वार यामार्गे संत नामदेव पायरी येथे आला. यावेळी अभंग, आरती करण्यात आली. त्यानंतर पालखी सोहळा संत नामदेव मंदिरात विसावला. नामदास परिवारातील सुवासिनी महिलांनी पालखीचे औक्षण केले. याठिकाणी श्री केशवराज, संत नामदेव-जनाबाई यांची आरती झाल्यानंतर मानकर्यांना श्रीफळ प्रसाद देण्यात आला. दरम्यान पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी ह.भ.प. माधव महाराज, मुकुंद महाराज, केशव महाराज, कृष्णदास महाराज, ज्ञानेश्वर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ महाराज, विठ्ठल महाराज, हरि महाराज, निवृत्ती महाराज, मुरारी महाराज, केदार महाराज, भावार्थ महाराज, आदित्य महाराज यांच्यासह नामदास महाराज परिवार व फडकर्यांनी परिश्रम घेतले.

### वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप

संत नामदेव महाराज पालखी सोहळ्यातील वारकर्यांना क्रांतीसिंह नाना पाटील चौक येथे संत नामदेव शिंपी समाज, युवक संघटनेच्यावतीने चहा, केळी व शाबू खिचडी या अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष गणेश उंडाळे, उपाध्यक्ष संजय जवंजाळ, खजिनदार शशिकांत जवंजाळ, विश्वस्त राजेश धोकटे, बाबासाहेब म्हैंदरकर, विलास पोरे, सेवक कृष्णा जवंजाळ, जयवंत कांबळे, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर भावलेकर गुरुजी, विष्णु पोरे, गोविंद वेल्हाळ, रत्नाकर पिसे, दत्ता चांडोले, शिवकुमार भावलेकर, युवक संघटनेचे अध्यश शैलेश धट, महेश गानमोटे यांच्यासह हजारो वारकरी, समाज बांधव उपस्थित होते.

## १० व १२ वी बोर्ड परीक्षेसाठी मुख्याध्यापकांची लवकरच बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने लवकरच दहावी व बारावी परीक्षेचे नियोजन करण्यासाठी मुख्याध्यापकांच्या बैठकींचे आयोजन केले जाणार आहे. त्यासाठी बोर्डाचे अधिकारी पुढील आठवड्यात सोलापुरात दाखल होतील, अशी माहिती सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग यांच्याकडून देण्यात आली आहे.



दरम्यान, दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केल्यानंतर, परीक्षेच्या सूक्ष्म नियोजनासाठी शिक्षण मंडळ (बोर्ड) सज्ज झालेले आहे. परीक्षेच्या अनुषंगाने शहरात आणि जिल्ह्यात किती परीक्षा केंद्र असतील, याचा संपूर्ण अभ्यास करून परीक्षा केंद्र वाढवण्यावर चर्चा केली जाणार असल्याचे सांगण्यात आले. त्याच पद्धतीने संवेदनशील परीक्षा केंद्रांवर आणि कॉपीमुक्त परीक्षा केंद्रांसाठी उपाय योजना कशा पद्धतीने राबवता येईल. यावर चर्चा घडवली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. मुख्याध्यापक संबंधित गटशिक्षणाधिकारी आणि विस्ताराधिकारी यांची बैठक संपन्न झाल्यानंतर प्रत्यक्षात कामकाज सुरू होईल. दहावी व बारावी बोर्ड परीक्षेला बराच कालावधी बाकी असून, त्यासंदर्भात पूर्व सूक्ष्म नियोजन करण्यासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. त्यामुळेच या बैठकीचे आयोजन केल्याचे सांगण्यात आले आहे. एकूण पाहता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेसाठी शिक्षण मंडळ तसेच माध्यमिक शिक्षण विभाग सज्ज झाल्याचे दिसून येत आहे.

# आता गावगाड्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची चिंता

## नेत्यांची चाचपणी सुरु; वरिष्ठांकडे कार्यकर्त्यांची फिल्डिंग

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव. दि. ७ डिसेंबर -**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या यामध्ये महायुती सरकारने दैदिप्यमान यश संपादन केले. यामध्ये भाजपने न भुतो भविष्यतो विजय संपादन केला आहे. तर महायुतीचे घटक पक्ष शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने सुद्धा जोरदार मुसंडी मारत विजय संपादन केला. यामध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर एकनाथ शिंदे व अजितदादा पवार उपमुख्यमंत्री झाले. बाकीचे मंत्रिमंडळ लवकरच स्थापन होईल. केंद्रात व राज्यातही भाजपा सरकार आल्यामुळे सध्या सर्वत्र कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यामध्ये जोरदार आनंदी



आनंदमय वातावरण आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुका संपल्यानतर गावगाड्यातील पुढाऱ्यांना आता वेध लागले आहेत गेली दोन-अडीच वर्षापासून रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, नगरपालिका व ग्रामपंचायतीच्या निवडणुका आता तरी होतील व गावातील प्रशासकावर सुरु असणारा कारभार लोकप्रतिनिधीच्या ताब्यात येईल यामुळे खरे तर विकासकामांना गती येईल व सर्व सामान्य जनतेची रखडलेली कामे लोकप्रतिनिधी म्हणून मार्गी लागतील. यामुळे गावगाड्यात आमदार असो ,की खासदार किंवा वेगवेगळ्या पक्षाचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी गावगाड्यातील पुढारी चांगलेच हपापलेले आहेत. पण शासन या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कधी लावते.

याकडे गावगाड्यातील पुढारी लक्ष ठेवून सध्या गावगाड्यात याची जोरदार चर्चा सुरु आहे. सध्या महाराष्ट्रात भाजपा प्रणीत महायुतीचे सरकार सत्तेत असल्याने सरपंच, नगराध्यक्ष याची निवड थेट जनतेतून होणार हे तर निश्चित झाले आहे. यामुळे गावगाड्यात गावाचा सरपंच होण्यासाठी सर्व गुणसंपन्न व आर्थिकदृष्ट्या सक्षम असणारा उमेदवाराची चाचपणी सध्या गावगाड्यात सुरु झाल्या आहेत. तर जिल्हा परिषद व पंचायत समितीला कोणते आरक्षण आहे यावरुन इच्छुकांची सध्या गावगाड्यात जोरदार चर्चा चालू झाली आहे.



### ग्रामपंचायतींच्या निवडणुका कधी होणार?

सध्या गावगाड्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका अगोदर होणार का ग्राम पंचायतीच्या निवडणुका होणार याची ही जोरदार चर्चा सुरु आहे. आता लोक सभा व विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपंचायत, नगरपरिषद यांच्याच निवडणुका होणार आहेत याकडे सध्या गावगाड्यातील सर्वच पुढाऱ्यांचे लक्ष लागले आहे

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बांगलादेश हिंदू अत्याचार प्रकरणी आज धाराशिवात धरणे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**
बांगलादेश मध्ये मागील काही दिवसांपासून हिंदू बंधू-भगिनींवर प्रचंड अन्याय अत्याचार सुरू आहेत. या अन्याय अत्याचाराला प्रतिबंध घालून या हिंदू बांधवांना तत्काळ न्याय द्यावा, भारत सरकारने त्यांच्या न्याय हक्कासाठी पुढाकार घेऊन तातडीने पावले उचलावीत या प्रमुख मागणीसाठी धाराशिव शहरात उद्या १० डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की भारता शेजारील बांगलादेशात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अराजक परिस्थितीत तेथील हिंदू बांधवांवर प्रचंड अन्याय अत्याचार सुरू आहेत. तेथील हिंदू बांधवांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे. त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि या अन्याय अत्याचाराला वाचा फोडून ते बंद व्हावे यासाठी भारत सरकारने पुढाकार घ्यावा या विषयात तात्काळ पावले उचलावीत.

या प्रमुख मागणीसाठी उद्या १० डिसेंबर रोजी जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त धाराशिव येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी दहा वाजता सकल हिंदू समाजाच्या वतीने निदर्शने केली जाणार आहेत.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दत्ता सोनटक्के यांच्या हस्ते सत्कार

**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**
महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्यानंतर भारतीय जनता पार्टी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष दत्ताभाऊ सोनटक्के यांनी नूतन मुख्यमंत्र्यांचा सत्कार केला. मुंबई येथे सागर बंगल्यात हा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य मकरंद पाटील, सोशल मीडिया सहसंयोजक किशोर तिवारी, गोविंद हूळवणकर, हनुमंत पाटील, विनोद जाधवर, सिद्धेश्वर माने, विठ्ठल चिकुंद्रे यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे इतर पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



### सॉफ्ट टेनिस राष्ट्रीय स्पर्धेसाठी यशराज हुंडेकरीची निवड

**जळकोट, दि.९ डिसेंबर -**
बारामती येथे पार पडलेल्या अंडर १९ राज्यस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद (जळकोट) येथील राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू यशराज हुंडेकरी याने घवघवीत यश संपादन केले आहे. यशराज हुंडेकरी याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यशराजच हुंडेकरी या खेळाडूची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल खेळाडू विद्यार्थी व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ, जळकोट तथा राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष चव्हाण, अलियाबादचे सरपंच सुर्यकांत चव्हाण, प्रकाश चव्हाण, मुख्याध्यापिका आशा पवार यांनी सत्कार करून अभिनंदन केले आहे. पुढील राष्ट्रीयस्तरावर होणाऱ्या सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. क्रीडा शिक्षक कोकाटे, राठोड, साबळे, दुधभाते, गुरव, कारले, हक्के, कुचंगे, लबडे यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.



### नागनाथ जळकोटे आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**इटकळ, दि.९ डिसेंबर -**
अणदूर येथील कै. दत्तात्रय अणदूरकर सामाजिक संस्थेच्या वतीने तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक नागनाथ जळकोटे यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श सेवानिवृत्त शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल, फेटा, पुष्पहार, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष केशेगावचे सरपंच मल्लीनाथ गावडे तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक सिद्रामाप्पा खजुरे, केशेगावचे उपसरपंच लक्ष्मण क्षिरसागर, शिवसेनेचे नेते बाळकृष्ण घोडके, साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक जयंत जाधव, संस्थेचे अध्यक्ष, अजय अणदूरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी केशेगावचे उपसरपंच लक्ष्मण क्षिरसागर, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. सिद्रामाप्पा खजुरे, केशेगावचे सरपंच मल्लीनाथ गावडे, सत्कार मूर्ती नागनाथ जळकोटे गुरुजी यांची भाषणे झाली.



### शिवसेना नेते जयदेव गोफणे यांचा वाढदिवस साजरा

**परंडा, दि.९ डिसेंबर -**
परंडा तालुक्याचे सुपुत्र शिवसेना नेते तथा संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष समाज सेवक जयदेव गोफणे यांचा वाढदिवस परंडा येथे साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधुन ढगपिंपरीचे सरपंच बप्पाजी काळे यांनी जयदेव गोफणे यांचा शाल, श्रीफळ, पुष्प बुके, देऊन केक कापून साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. यावेळी संजय गांधी निराधार समितीचे पात्र लाभार्थी नागरीकांनीही जयदेव .गोफणे यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छाचा वर्षाव केला. यावेळी विजय काळे, सुरेश हावळे, भागवत डाकवले, रामचंद्र वाटाडे, बाबासाहेब शिरतोडे, गुलाब शिंदे, भाडवंकर, इत्यादी तसेच विविध पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व पत्रकार बांधवानी सुद्धा शुभेच्छा दिल्या.

# पोद्दार स्कूल अत्याचार प्रकरण : सहाय्यक पोलिस निरीक्षक निलंबित

## ▶▶ सखोल चौकशीसाठी चौकशी समिती नेमली...
## ▶▶ प्राचार्याचा प्रकरणाशी संबंध नसल्याचा दावा खोटा...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ डिसेंबर -**
शहरातील नामांकित असणाऱ्या पोद्दार इंग्लिश स्कूलमधील शिक्षकाने एका ३१ वर्षीय शिक्षिकेला विविध स्वरूपाचे अमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध सोलापूर व धाराशिव येथील लॉजवर नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची घटना घडली आहे. सदरील शिक्षिकेच्या तक्रारीवरून धाराशिव शहरातील आनंदनगर पोलिस ठाण्यात त्या शिक्षकाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याप्रकरणी संबंधित शिक्षकावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली होती. मात्र, यामध्ये प्रकरणाचा तपास करणारे अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक गणेश जांभळे यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणाची संपूर्ण प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने हाताळल्यामुळे किंबहुना आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकरणात आता पोलिस अधिक्षकांनी स्वतः लक्ष घातले असून तपास योग्य पध्दतीने तपास न केल्याने पोलीस अधीक्षकांनी सहा. पोलिस निरीक्षकावर निलंबनाची कारवाई केली आहे.

लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपात तपास करताना पोलिस कोठडी घेणे आवश्यक असते. मात्र पोद्दार शाळेच्या प्रकरणही अंत्यत गंभीर असतानादेखील तपास अधिकाऱ्याने पीसीआर घेतला नव्हता. तसेच तपास अधिकारी जांभळे यांनी पीसीआर न घेता एम सीआर घेतला. यामुळे अशा गंभीर प्रकरणात अप्रत्यक्षपणे आरोपीला वाचवण्याचाच प्रयत्न त्यांनी केला आहे. पोलीस अधीक्षकांनी या बार्बीची गंभीर दखल घेऊन सहायक पोलिस निरीक्षक जांभळे यांना निलंबित करण्याचा आदेश नुकताच दिला.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी तीन अधिकाऱ्यांची एक टीम तयार केली आहे. यामध्ये आनंदनगरचे पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे, महिला सहायक पोलीस निरीक्षक अश्विनी मांजरे, एक उपनिरीक्षक सुरेश कासोळे, कामचंद कांडे यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा छडा लावण्याचे काम या टीमला दिले आहे.

या प्रकरणी पोलीस तपास करत आहेत. तसेच या प्रकरणी या समितीने सखोल चौकशी करावी असेही या आदेशात नमुद केले आहे.

### पालक विद्यार्थ्यांचा प्रवेश काढण्याच्या तयारीत?

पोद्दार स्कुलमधील झालेल्या या प्रकारामुळे या स्कुलमधील विद्यार्थ्यांच्या पालकांत असुरक्षितेचे वातावरण तयार झाले आहे. त्यांनी दै. 'तरुण भारत'कडे याप्रकरणीची चौकशी केली. दै. तरुण भारतकडे या प्रकरणची सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्याने पालकांचा या प्रकरणावरील विश्वास दृढ झाला. यामुळे पालक त्यांचा पाल्याचा या स्कुलमधील प्रवेश काढून घेण्याच्या तयारीत आहेत.

### लेखी मागणी करा; माहिती देतो...

दैनिक 'तरुण भारत'ने सोमवारी श्री. कुलकर्णी यांना प्रकरणाशी संबंधित काही गोष्टींची मागणी केली असता त्यांनी आम्हाला लेखी द्या आम्ही माहिती देतो असे तरुण भारतला सांगितले. मात्र ही माहिती न देण्यामागे नेमके काय दडलय हे मात्र उघड होवू शकले नाही.

**दै. 'तरुण भारत'च्या वृत्ताने प्रकरणाला गती...**

### प्राचार्यांचा दावा खोटा...

दै. 'तरुण भारत'ने प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर प्राचार्याचे मत विचारण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांच्याशी संपर्क होवू शकला नाही. स्कुलचे कर्मचारी यांच्याशी संपर्क साधला असता आमच्याकडे कोणतीही तक्रार आले नसल्याचे त्यांनी सांगितले होते. मात्र, एका स्थानिक दैनिकास दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये हे प्रकरण त्यांचे खाजगी बाब असल्याचे म्हटले आहे. मात्र या दोघाचं सुतक याच स्कुलमध्ये जमले होते. यातून ही घटना घडली आहे. यावरुन प्राचार्यांचा हा दावा खोटा असल्याचे स्पष्ट होत आहे.

### दै. तरुण भारतने प्रकरणाला फोडली वाचा

दि.३० नोव्हेंबर रोजी आनंदनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र पोलिस विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रेस नोटमध्ये यातील काही भागाचाच उल्लेख होता. मात्र दैनिक 'तरुण भारत'ने या प्रकरणच्या मुळाशी जाण्याचे ठरवले व या प्रकरणातील कागदपत्रे जमवून घटनेचा पाठपुरावा केला व या प्रकरणाला वाचा फोडली.

## खून प्रकरणात आरोपीस जन्मठेप; पाच हजार रूपयांचा दंड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**
पोटात चाकू मारुन खुन करणाऱ्या आरोपीस जन्मठेपीची शिक्षेसह पाच हजार रुपयाचा दंड कळंब येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश आर.के. राजेभोसले यांनी सुनावला आहे. ही घटना ४ ऑक्टोबर २०१९ रोजी घडली होती.

प्रकरणाची थोडक्यात हकीगत अशी की, आरोपी नामे शहाजी रामा कांबळे त्यांची पत्नी पद्मीनीबाई शहाजी कांबळे, मुलगा सुनिल शहाजी कांबळे, सून रेश्मा सुनिल कांबळे हे एकत्र राहत होते.

परंतु आरोपी शहाजी यास यातील मयत सुनिल शहाजी कांबळे व त्यांची आई पद्मीनीबाई शहाजी कांबळे यांच्यामध्ये अनैतिक संबंध असल्याची शंका घेत असल्यामुळे तुला व तुझ्या आईला मारून टाकतो म्हणून नेहमी शहाजी कांबळे भांड व तंटा करायचा. दि.४ ऑक्टोबर २०१९ रोजी रात्री अंदाजे १९.३० वाजण्याच्या दरम्यान साहेबराव बंडू कांबळे यांच्या घरासमोर त्यांची पत्नी सुशिला व आरोपीची पत्नी पद्मीनीबाई व मयताची पत्नी रेश्मा ही हजर असताना मयत सुनिल शहाजी कांबळे हा वडिलांना तंटामुक्त अध्यक्षांकडे चला प्रकरण मिटवू असे म्हणत असताना त्यांच्यामध्ये भांडणे लागले.

त्यावेळी आरोपी शहाजी हा मयत सुनिल यास तुला ठार करतो. म्हणून आरोपी शहाजी रामा कांबळे हातात चाकू घेवून धावत आला.

व मयत सुनिल कांबळे यांच्या पोट्यात चाकू मारून गंभीर जखमी केले. त्यामुळे मयत सुनिल कांबळे यास उपचारासाठी घेवून रूग्णालयात जात असताना सुनिल मयत झाला. त्यानंतर रेश्मा सुनिल कांबळे यांनी शिराढोण पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर नंबर १४२/१९ कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

९ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आल्यानंतर मुख्य फिर्यादी रेश्मा कांबळे ही फितूर झाली. तरीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अहवाल, न्याय वैज्ञानिक अहवाल व सरकारी अभियोक्ता ॲड. अशिष कुलकर्णी यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीस भा.दं.क. ३०२ प्रमाणे आरोपीस अजन्म कारावास व पाच हजार रूपयांचा दंड कळंब येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश आर.के. राजेभोसले यांनी दि.९ डिसेंबर २०२४ रोजी शिक्षा ठोठावली.

## केसरजवळगा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना गोळ्याचे 'रिॲक्शन'



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ डिसेंबर -**
उमरगा तालुक्यातील केसरजवळगा येथील महात्मा गांधी विद्यालयातील ३५ हून अधिक शालेय विद्यार्थ्यांना आयर्न फॉलिक ॲसिड नावाची गोळी दिल्याने दि.९ रोजी रिॲक्शन झाल्याची अशी प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर उलट्याचा त्रास झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली.

त्रास झालेल्या विद्यार्थ्यांना उपचारासाठी मुरूम येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. यातील १९ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजत आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, या प्रकरणामुळे आरोग्य विभागाने तातडीने तपास सुरू केले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी आरोग्य विभागाकडून तातडीने उपचारास सुरुवात करण्यात आले आहे.

> किशोरवयीन मुला-मुलींना आरोग्य विभागाकडून रक्तवाढीसाठी गोळ्या दिल्या जातात. सदरील गोळ्या घेतल्यानंतर अशक्त मुलांना किंवा जेवण न केलेल्या मुलांना मळमळ होवू शकते. तसेच उलट्याही होवू शकतात. यातील कांही मुलांना उलट्यांचा त्रास झाला होता. त्यांची प्रकृती स्थिर असून विद्यार्थ्यांनी अथवा पालकांनी घाबरून जावू नये.
> **- डॉ. कुलदिप मिटकरी,**
> माता व बालसंगोपन अधिकारी

त्यानंतर दुपारच्या सत्रात आणखी १६ जणांना उपचारासाठी मुरूम येथे प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये शाळेच्या वतीने पाठवण्यात आले आहे.

याबाबत माहिती मिळाल्यानंतर मा.आ. ज्ञानराज चौगुले, शरण पाटील यांनी मुरूम रुग्णालयास भेट देऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

## डॉ. बाबासाहेबांचे विचार व कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी : प्रशांत जाधवर



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.९ डिसेंबर -**
पुस्तक वाचल्याने मस्तक सुधारते, सुधारलेले मस्तक कोणापुढेही, कधीही नतमस्तक होत नाही म्हणून कोणाचेही हस्तक व्हायचे नसेल तर शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ह्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिकवणीच्या मार्गाने जा, असे प्रतिपादन प्रशांत जाधवर यांनी केले. ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दसमेगांव शाळेतील इयत्ता सहावी वर्गाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित केलेल्या बालसभेत बोलत होते.

पुढे बोलताना जाधवर म्हणाले की, बाबासाहेबांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपले शिक्षण पूर्ण केले. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा, प्रथा बंद करण्यासाठी, समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय देण्यासाठी आयुष्यभर लढा दिला. बाबासाहेबांच्या जीवनावरील पुस्तके वाचा, बाबासाहेबांना समजून घ्या आणि आपल्या प्रतिकूल परिस्थितीतवर मात करा व जिवनात यशस्वी व्हा असाही संदेश त्यांनी मुलांना दिला. व्यासपिठावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत मोरे, माजी सरपंच रामभाऊ खंडागळे, मुख्याध्यापक हरिभाऊ रणदिवे, दादासाहेब लगाडे आदींची उपस्थिती होती.

तत्पूर्वी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून, पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील प्रज्वल लगाडे, सई उघडे, रोहिणी शिंदे, प्रिया सुरवसे, रिया काळे, प्राची उघडे, संकेत मोरे, प्रतिक्षा हिंगमिरे, यश हिंगमिरे, प्रांजल मांजरे यांनी आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी शिक्षक भागवत बगाडे व रामभाऊ खंडागळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक सुहास ननावरे, बालाजी कोरे, मंजुषा कवडे व सहावी विदयार्थ्यांनी प्रयत्न केले. श्रीकांत मोरे व दादासाहेब लगाडे यांच्या वतीने मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी तावरे हिने केले. तर आभारप्रदर्शन ओमकार मांजरे यांनी केले.

## राज्य मंत्रीमंडळामध्ये जिल्ह्यातुन कुणाची वर्णी?; जिल्हावासियांची उत्सुकता शिगेला

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.९ डिसेंबर -**
राज्य मंत्रीमंडळामध्ये धाराशिव जिल्ह्यातुन कुणाची वर्णी लागणार याकडे संपुर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे. भाजपचे राणाजगजितसिंह पाटील यांच्या की शिवसेनेचे डॉ. तानाजी सावंत यांच्या गळ्यात पडणार मंत्रीपदाची माळ? महाराष्ट्रात पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. येत्या कांही दिवसात मंत्रीमंडळाचा विस्तार होणार असुन यामध्ये धाराशिव जिल्ह्यातुन मंत्रीपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

धाराशिव जिल्ह्यात महायुतीचे भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेना शिंदे गटाचे डॉ. तानाजी सावंत हे दोन आमदार आहेत.

मागच्या वेळी धाराशिव जिल्ह्यातुन शिवसेना शिंदे गटाचे परंडा मतदार संघातुन निवडुन आलेले डॉ. तानाजी सावंत यांची मंत्रीमंडळात वर्णी लागली होती. अडीच वर्षे डॉ. तानाजी सावंत हे धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री होते. मात्र पालकमंत्री म्हणुन डॉ. तानाजी सावंत हे जिल्ह्याचा विकास करण्यात कमी पडले होते. तरीही आज शिवसेना शिंदे गटाकडुन त्यांचे नाव मंत्रीपदाच्या यादीत आहे.

भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचीही यावेळी मंत्रीमंडळात वर्णी लागणार असल्याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. मंत्री नसताना तुळजापुर विधानसभा मतदार संघात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जी विकासाची कामे केली आहेत




त्याला तोड नाही. मोठयाप्रमाणात विकास करुन त्यांनी मतदार संघाचा कायापालट करुन दाखविला आहे.

अनेक वर्षांपासुन प्रलंबित असलेली कामे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी करुन दाखविले आहे. त्यामुळे या मतदार संघातील मतदारांनी सलग दुसऱ्यांदा त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडुन दिले आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यात विकास कामे करण्याची धमक आहे. त्यामुळे येणाऱ्या पाच वर्षांसाठी त्यांना मंत्रीमंडळात संधी मिळाली तर तुळजापुर विधानसभा मतदार संघामध्ये विकासाला आणखी मोठ्या प्रमाणात चालना मिळु शकते.

या मतदार संघातील अनेक महत्वाची कामे मार्गी लागणे बाकी आहेत. त्यामुळे कांही दिवसात होणाऱ्या मंत्रीमंडळ विस्तारात भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची वर्णी लागणार की शिवसेनेचे आमदार डॉ. तानाजी सावंत यांची वर्णी लागणार हे पाहणे गरजेचे आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासु मानले जातात तर आमदार डॉ. तानाजी सावंत हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जवळचे म्हणुन ओळखले जातात. त्यामुळे या दोघांपैकी कुणाची मंत्रीमंडळात वर्णी लागणार याकडे संपुर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे.

# विद्यार्थ्यांनी दररोज किमान तीन तास अभ्यास करावा : डॉ. विवेकानंद वाहूळे



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.९ डिसेंबर -**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इटकळ येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा घेण्यात आली.

अभिवादन सभेचे अध्यक्ष म्हणून शा.व्य.समितीचे अध्यक्ष प्रविण मशाळकर तर प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून जवाहर महाविद्यालय अणदूरचे डॉ. विवेकानंद वाहूळे उपस्थित होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून महामानवास अभिवादन करण्यात आले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो कोणी ते प्राशन करेल तो गुरगुरल्या राहणार नाही, हा बाबासाहेबांचा संदेश घेवून, सर्व विद्यार्थ्यांनी मन लावून दररोज किमान तीन तास अभ्यास करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दररोज आठरा तास अभ्यास करते होते. म्हणूनच ते आज अमेरिका ह्या देशात ज्ञानाचे प्रतिक म्हणून ओळखले जातात.

हाच आदर्श सर्व विद्यार्थ्यांनी डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घ्यावे, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात प्रविण माशाळकर यांनी डॉ. विवेकानंद वाहूळे सरांचे आभार मानून हर घर संविधान ह्या उपक्रमाचे कौतुक केले.

शाळेच्या वतीने डॉ. विवेकानंद वाहूळे सरांना आंबेडकरी कविता हा ग्रंथ भेट देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतिश ढोणे यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड यांनी केले.

# खेळाडूंसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर असेल : नितीन काळे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**



धाराशिव जिल्ह्याचे विकासासाठी खेळाडूंचेही योगदान महत्त्वपूर्ण असून स्वतःच्या मेहनतीवर राज्य राष्ट्रीय स्पर्धेत पदक कमवणाऱ्या खेळाडूंसाठी आधुनिक साहित्य उपलब्ध करून देण्यावर भर असल्याचे मत नितीन काळे यांनी व्यक्त केले.

धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेच्या वतीने आयोजित सब ज्युनिअर आणि सीनियर वयोगटातील मुला मुलींच्या जिल्हास्तरीय ज्युदो स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेचे अध्यक्ष नितीन काळे बोलत होते. यावेळी उद्योजक रवी नरहिरे, प्रणव नरहिरे, धाराशिव जिल्हा ज्युदो संघटनेचे सचिव प्रवीण गडदे, कोषाध्यक्ष अभय वाघोलीकर, सहसचिव तथा तांत्रिक समिती अध्यक्ष अशोक जंगमे, स्पर्धा विभाग प्रमुख प्रतापसिंह राठोड, तांत्रिक समिती सचिव कैलास लांडगे आदिसह खेळाडू, पालक, प्रशिक्षक व मार्गदर्शकांची प्रमुख उपस्थिती होती.

धाराशिव येथील श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलातील ज्युदो प्रशिक्षण केंद्रात घेण्यात आलेल्या या स्पर्धेतून नाशिक येथे होणाऱ्या सीनियर वयोगटातील आणि पुणे येथे होणाऱ्या सब ज्युनिअर वयोगटातील राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेसाठी धाराशिव जिल्ह्यातील खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.

दरम्यान चालू वर्षात राज्य राष्ट्रीय ज्युदो कामगिरी करत पदक विजेत्या जिल्ह्यातील खेळाडूंचा गौरव यावेळी उपस्थित यांच्या हस्ते करण्यात आला.

# कळंबमध्ये संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ डिसेंबर -**

प्रतिवर्ष प्रमाणे याही वर्षी संतशिरोमणी संताजी महाराज जगनाडे यांची ४०० वी जयंती ८ डिसेंबर रविवार रोजी तेली समाज सेवाभावी संघाच्या वतीने साई मंगल सेवेच्या समोर लक्ष्मी (ढोकी) रोड कळंब येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत जगनाडे महाराजांच्या प्रतिमेचे पुजन वआरती लिंगायत संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र आबा मुंडे, लक्ष्मण फल्ले, सागर मुंडे, डॉ. सुनील थळकरी शिशिर राजमाने यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमास अध्यक्ष अशोक चिंचकर, शिवाजी लोखंडे, विश्वंभर किरवे, निलेश होनराव, बाळासाहेब कथले, त्रिंबक कचरे, बाळकृष्ण गुरसाळे, अश्रुबा शेवते, संजय चिंचकरयांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपूत यांनी संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या जिवन कार्यावर विचार व्यक्त केले. संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या कुटुंबात वारकरी परंपरा असल्याने त्यांच्यावर लहानपणापासूनच वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले, असे ते म्हणाले. कार्यक्रमात शैलेश स्वामी, किरण फल्ले, कैलास बागल, संदीप शेवते, नाना थळकरी, दत्ता शेवडे, नाना शिंगणापूरे, मच्छिंद्र साखरे, अशोक फल्ले, परशुराम देशमाने, दीपक जाधव, रामलिंग कानडे, मनोज फल्ले, गणेश शेवते, सोमनाथ देशमाने, शिवराज पाटील, महारुद्र हुंडेकरी, कुमार किरवे, बालाजी बागल, ओंकार कलशेट्टी, बालाजी देशमाने, अनिल खराडे, पिराजी देशमाने, महारुद्र नक्षे, संजय मुंडे, परशुराम देशमाने, गजानन मुंडे, अशोक फल्ले, शहाजी कानडे, दत्ता किरवे, संतोष शेवते, संदीप शेवते, उत्तरेश्वर देशमाने, गोकुळ बरकसे, ओंकार कलशेट्टी, बालाजी वांकर यांचा सहभाग होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अशोक चिंचकर यांनी केले.

# तांदुळवाडी येथे खंडोबा यात्रा विविध कार्यक्रमाने पडली पार

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.९ डिसेंबर -**



तालुक्यात तांदूळवाडी येथे चंपाषष्ठी निमित्त खंडोबा यात्रा विविध कार्यक्रमाने पार पडली. शनिवारी गावात नगर नैवेद्य मिरवणूक काढून खंडोबा मंदीरा समोर नंगर तोडण्याचा मुख्य कार्यक्रम पार पडला.

यावेळी गावातील व बाहेरगावाती भाविक मोठया संख्येने उपस्थित होते. भंडारा व खोबऱ्याची उधळण करत यळकोट... यळकोट.. जय मल्हार च्या आवाजाने परिसर दुमदुमला गेला होता. यात्रा निमित्त दि.५ रोजी सायंकाळी जय मल्हार जागरन गोधळ पार्टी नांदगाव याचा कार्यक्रम.

दि.६ रोजी कोमल पाटोळे मेंढापूरकर सांस्कृतीक कार्यक्रम, दि.७ रोजी कैलास झगडे प्रस्तुत -रंग नवा ढंग नवा ऑकेस्ट्रॉ पुणे हे कार्यक्रम झाले. रविवार दि.८ रोजी दुपारी यात्रा निर्मात्त कुस्त्या भरवण्यात आल्या होत्या. या कुस्त्यामधील मानाची कुस्ती भैरवनाथ साखर कारखाण्याचे कार्यकारी संचालक केशव सांवत यांनी लावली. या कुस्त्यांला जिल्हातील व बाहेरील जिल्हातील पैलवानानी हाजरे लावली होती.

गावचे यात्रा कमेटीचे सदस्य भागवत चौधरी पोलीस जमादार लोंढे व गावातील व बाहेर गावातील कुस्तीप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

## सकल हिंदू समाजाचा आज नळदुर्गमध्ये मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ डिसेंबर -**

बांगलादेशात हिंदुवर होत असलेले अत्याचार व मंदिरांवर होत असलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ नळदुर्ग येथे दि. १० डिसेंबर रोजी सकल हिंदु समाजाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये हिंदु समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सकल हिंदु समाजाचे गणेश मोरडे, राजकुमार गाढवे, अजय दासकर, अक्षय भोई यांनी केले आहे.

बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदुवर आज मोठ्याप्रमाणात अत्याचार सुरु आहे. त्याचबरोबर मंदिरांवरही मोठ्याप्रमाणात हल्ले होऊन मंदिरामध्ये आगी लावल्या जात आहेत. हे तात्काळ थांबावे व या अत्याचाराच्या निषेधार्थ नळदुर्ग येथे दि.१० डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता अंबाबाई मंदिर ते पोलिस ठाण्यापर्यंत सकल हिंदु समाजाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे.

# विधान परिषदेवरती गुणवंत कामगारांच्या प्रतिनिधीची आमदार म्हणून नियुक्ती करा

## राज्यपालांकडे निवेदनाद्वारे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.९ डिसेंबर -**

भारतीय संविधान तसेच लोकशाहीस अभिप्रेत राज्याचे संविधानिक प्रमुख या नात्याने असलेल्या विशेष अधिकाराद्वारे, समाजातील विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १२ जनांची महाराष्ट्र विधान परिषदेवरती आमदार म्हणून, महामहीम राज्यपाल यांचेवतीने नियुक्ती केली जाते. त्याप्रमाणेच गुणवंत कामगारांच्या एका राज्य प्रतिनिधीस विधीमंडळात कामगार प्रतिनिधी आमदार म्हणून संधी द्या, अशी आग्रही मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनच्या वतीने महामहीम राज्यपाल यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सध्या महाराष्ट्र शासनाच्यावतीने पदवीधर तसेच शिक्षक अशा विविध घटकांप्रती काम पाहण्याकरीता स्वतंत्र आमदार विधान परिषदेवर पाठवले जातात. विविध क्षेत्रात काम करणारा कामगार हा अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी महत्वाचे योगदान देत असतो औद्योगीकरण त्याबरोबर संघटीत व असंघटीत सध्या सहकार, यंत्रमाग, माथाडी, सुरक्षा, बांधकाम या प्रमुख क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांबरोबर लघु उद्योग, दुकाने, रिक्षा ड्रायव्हर, वाहतूक कामगार, सेवा क्षेत्रातील कामगार अशा अनेकानेक क्षेत्रामध्ये कामगार व कष्टकऱ्यांचे हात गुंतलेले आहेत. आणि ते अधिक मजबूत करण्यासाठी, कामगारांचा प्रतिनिधी हा विधी मंडळात असणे गरजेचे आहे.

राज्यातील कष्टकरी गुणवंत कामगारांच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याची दखल घेऊन, महामहीम राज्यपाल महोदयांनी स्वतःच्या विशेष अधिकारात विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त एका कामगाराची, राज्यपाल कोट्यामधून विधान परिषदेवर आमदारपदी नियुक्ती करावी.

अशा आशयाचे निवेदन त्यांना तसेच राज्याचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांना मेलद्वारे तसेच टपालाद्वारे मध्यवर्ती कार्यालयाच्यावतीने असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश केसरकर यांनी पाठविले असल्याचे संघटनेचे सचिव अच्युतराव माने यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

**जळकोट, दि.९ डिसेंबर -** नळदुर्ग शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष म्हणुन सतीश पुदाले यांची तर सचिव म्हणुन संतोष मुळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे नळदुर्ग शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी स्वागत केले आहे. व्यापारी महासंघाच्या धाराशिव जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची दि. ८ डिसेंबर रोजी धाराशिव येथे बैठक पार पडली.

## आ. पाटील यांना मंत्रिपद देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.९ डिसेंबर -**

आ. राणाजगजितसिंह पाटील यांना मंत्रिमंडळात समावेश करण्यात यावा अशी मागणी भारतीय किसान मोर्चा तेरचे सचिव राहुल गायकवाड यांनी निवेदनाद्वारे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतजी बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# सह्याद्री कॉलेज ऑफ नर्सिंगच्या पी.बी.बी. एस्सीच्या नवीन बॅचचे स्वागत समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ डिसेंबर -**



श्री कुलस्वामिनी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित सह्याद्री कॉलेज ऑफ नर्सिंगच्या पी.बी.बी एस्सी. पहिल्या नवीन बँचचे स्वागत समारंभ कार्यक्रम मोठ्या दिमाखात संपन्न झाला. सुरुवातीला नर्सिंगच्या संस्थापक फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

नंतर मान्यवरांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने दिपप्रज्वलन करण्यात आले. संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डॉ. रमेश दापके यांनी या कार्यक्रमात उपस्थित लावली. डॉ. रमेश दापके यांनी विद्यार्थ्यांच्या नवीन बॅचला प्रेरणादायी संबोधण केले. इतरांची सेवा करणे आणि चांगले आदर्श बनण्याचे महत्त्व पटवून दिले. पालन पोषण समजून घेणे आदर, कौशल्य, शिक्षण इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. संस्थेच्या संचालिका तथा स्त्री रोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. वसुधा दापके-देशमुख यांनी नवीन बॅचेस स्वागत करून कठोर परिश्रम करण्याचा, गंभीर विचार विकसित करण्याचा आणि प्राध्यापक आणि मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन घेण्याचा सल्ला दिला.

बिल गेट्स ज्युनिअर कॉलेज चे प्राचार्य सोमनाथ लांडगे यांनी ही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन आकाश जगताप तर आभार ओंकार ढवळे यांनी मानले.

यावेळी मंचावर सह्याद्री फाउंडेशन्स चे संस्थापक डॉ. दिग्गज दापके देशमुख, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिराजदार प्रशासकीय अधिकारी ज्ञानेश्वर गिरी सर्व प्राध्यापक, स्टाफ विद्यार्थी

# संविधानामुळे नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क मिळाला : गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.९ डिसेंबर -**

राज्यघटनेमुळे देशातील प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क मिळाला आहे. प्रत्येकाच्या घरी भारतीय संविधान ग्रंथ असणे ही काळाची गरज आहे.तेव्हा विद्यार्थ्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून उच्च शिक्षण घेऊन प्रशासनातील अधिकारी बनावे, असे विचार रिपाइंचे जिल्हा समन्वयक एस.के. गायकवाड यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वसंतनगर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जि.प. प्राथमिक शाळा वसंतनगर, नळदुर्ग येथे अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विकास कुलकर्णी हे होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन सहशिक्षक दयानंद सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षक अविनाश राठोड यांनी केले.

यावेळी सहशिक्षक हरिदास सुरवसे, श्रीकृष्ण कुलकर्णी, सहशिक्षका व्ही.एल. वाघमारे, नेहा कुंभलकर, युवा केंद्र कार्यकर्ती आर.एस. राठोड उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट नेमणे आहेत

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-२ (कमिशनवर)
तेर, ढोकी, अंबेजवळगे, कसबे तडवळे, पाडोळी (आ.), कनगरा, बेंबळी, पाटोदा, केशेगाव, वडगांव (सि.), पळसप, जागजी, पोहनेर, जुनोनी, कोंड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर शहर, तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, अपसिंगा, काक्रांबा, आरळी (बु.), किलज, चिकुंद्रा, जवळगा, वाणेगाव, वडगाव (देव), सलगरा, वागदरी, गुळहळ्ळी, निलेगाव, सिंदगाव, कुन्सावळी, सलगरा (दि.), होर्टी.

**लोहारा तालुका :** लोहारा शहर-तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, नागराळ, एकोंडी, सास्तुर, तावशीगड, सालेगाव, हराळी, जेवळी, आष्टा, भोसगा, अचलेर, फणेपुर.

**उमरगा तालुका :** शहर प्रतिनिधी, पेठसांगवी, नारंगवाडी, नाईचाकुर, समुद्राळ, बेटजगळगा, कलदेव (लिं), कोराळ, बलसुर, येणेगुर, दाळींब, सुंदरवाडी, आलुर, बेळंब, वरनाळवाडी, कदेर, औराद, खसगी, बेडगा, डिग्गी, मळगी, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, गुगळगाव, माडज, त्रिकोळी, एकूरगा, जेकेकुर, बेटजवळगा.

**कळंब तालुका :** शहर प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, मोहा, मस्सा, सापनाई, चोराखळी, माळकरंजा, निपाणी, पाडोळी (ना.), रायगव्हाण, रांजणी, शिरपूर (अ), शिराढोण, नागुलगाव, करंजकल्ला, लोहटा (पू), डिकसळ, इटकूर, बाहुला, खोदला, कन्हेरवाडी, तांदूळवाडी.

**वाशी तालुका :** तालुका प्रतिनिधी, पार्डी, कन्हेरी, सरमकुंडी, इझोरा, घाटनांदूर, चांदवड, अजनसोंडा, गिरवली, पारगाव, हातोला, फकाबादवाडी, जवळका, पारा, सेलू, पिंपळगाव (लिं), दसमेगाव, सोनारवाडी, मांडवा, सारोळा (मां), गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, ढगप्रिंप्री, आसू, कात्राबाद, सरणवाडी, हिंगणगाव (ब्रु), दहिटणा, खासापूरी, जवळा, जकेप्रिंप्री, सोनारी, रोसा, डोंजा, इनगोंदा, शेळगांव, चिंचपूर (बु), अनाळा, रोहकल, पांढरेवाडी, बावची, घारगाव.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, हाडोंग्री, वाकवड, सोनगिरी, सुकटा, देवळाली, माणकेश्वर, वांगी (ब्रु) अंतरगाव, चिंचपूर, वालवड, अंभी, अंतरवली, लांजेश्वर, निपाणी, ज्योतीबाची वाडी, ईराचीवाडी, पाथरूड, पाटसांगवी, अंतरगाव, चुंबळी, पखरूड, ईट.

अनुभवास प्राधान्य : पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.१५ डिसेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा.

: कार्यालय पत्ता :
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा कार्यालय,
ॲड. मसलेकर यांचे निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
मो.नं. ९३७३४३८३५२ / ८४२१४८९७२०

# येरमाळा व परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; नागरिकांत भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.९ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील येरमाळा व येरमाळा परिसरामध्ये चोरट्यांनी येथील आठवडी बाजार सह मंदिर परिसर, येरमाळा घाट व पंचक्रोशीमध्ये जबरी चोरी, किरकोळ चोरीचा धुमाकूळ घातल्याने येरमाळा चोरांचे केंद्रस्थान बनले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

येरमाळा हे गाव सोलापूर, धुळे आणि पंढरपूर खामगाव या महामार्गाच्या केंद्रस्थानी असून आई येडेश्वरीचे गाव म्हणून येरमाळा हे सर्वदूर परिचित आहे. मराठवाड्यासह राज्यातून देवीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची रोज येरमाळ्यामध्ये रेलचेल असते. येरमाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येरमाळा, दहिफळ, तेरखेडा हे प्रमुख बीट असून आठवड्यातून बुधवार, गुरुवार, शनिवार मोठ्या प्रमाणात बाजार भरला जातो. तसेच मंगळवार व शुक्रवार या दिवशी येडेश्वरी देवींच्या भाविकांची मोठी गर्दी



असते याचा फायदा घेण्यासाठी चोरांची संख्या मोठ्या प्रमाणात येरमाळ्यामध्ये सक्रिय असते. या चोरींमुळे भाविकांची जबरीचोरी, किरकोळ चोरी, पाकीटमार, भाविकांची छेडछाड तसेच शेतकऱ्यांच्या शेतातील मोटारी, वायर, स्टार्टर याचबरोबर उद्योग व्यवसायातील दुकान, हॉटेलमधील चोऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे, असे असताना पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेतात का अशी शंका लोकांमध्ये निर्माण होत आहे. येरमाळा व तेरखेडा येथील आठवडी बाजारामध्ये पोलिसांचे पथक बाजारात दाखल असताना नागरिकांचे मोबाईल पाकीट व किरकोळ चोरी समोर होत असतानाही पोलिसांना याचा थांग पत्ता लागत नाही.

याचबरोबर मलकापूर सापनई येरमाळा कळम येडेश्वरी मंदिर परिसर व येरमाळा घाट याठिकाणी दिवसा व रात्री नऊ वाजेपर्यंत व पहाटे येरमाळ्याकडे येणाऱ्या वाहनांना व दुचाकी वाहनधारकांना अडवून त्यांच्या जवळील पैसे दागिने याची लूट करत मारहाण करून जखमी केले जाते.

पहाटे फिरायला जाणाऱ्या स्त्रियांच्या गळ्यातील सोने मारहाण करून लंपास करणे, शेतकऱ्यांचे नवे स्प्रिंकलर सेट चोरून नेणे यामुळे येरमाळा व येरमाळा परिसरामध्ये भाविकासह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तरी पोलीस प्रशासनाने या गोष्टीकडे जातीने लक्ष देऊन या लुटारूंचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

दि.६ चार वाजेच्या सुमारास कळंब व तेरखेडा येथील प्रवासी स्वारगेट पुणे येथून ट्रॅव्हल्स क्रमांक एम.एच.१४ सी.डब्ल्यू. ४१२८ ने गावाकडे येत असताना ट्रॅव्हल्स बस येरमाळा घाटामध्ये आली असता दिघीला लोक नसल्याने अज्ञात चोरट्याने डिकी उघडून डिकीमधील दोन बॅग लंपास करत बॅगमध्ये असलेले सोन्याचे दागिने अंदाजे रक्कम एक लाख ८६ हजार ६०० रुपयाचा मुद्द्यमाल घेऊन फवारा केल्याचे आढळून आल्याने तिकडे येथील पृथ्वीराज शिवाजी धुमाळ व उर्मिला कुंकूलोल यांच्या फिर्यादीडून अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास येरमाळा पोलीस करीत आहेत.

येरमाळा व येरमाळा परिसरामध्ये भरदिवस व रात्री जबरीचोरी पाकीटमारी वाटमारी या गोष्टीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकासह पंचक्रोशीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून येथीलपोलिसाच्या खाकीत दम राहिला नसल्याने लुटारू पोलिसांना खुले आव्हान देत आपली दहशत निर्माण प्रयत्न करत आहेत. तरी पोलीस अधीक्षक या चोरीच्या घटना कडे लक्ष देणार का असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

# एसजीजीएस अभियांत्रिकी संस्थेच्या वसतिगृहात विद्यार्थिनीची आत्महत्या


**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

श्री गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील मुलींच्या वसतिगृहातील राहत्या खोलीतील छताच्या पंख्याला दोरीने गळफास घेवून एका २१ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केली. ही घटना दिनांक ८ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड येथील मूळरहिवासी भक्ती शरदआप्पा पिंपळे ही विष्णूपुरी, नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी अभियांत्रिकी आणि तंत्रशास्त्र संस्थेत (सिव्हिल) स्थापत्य अभियांत्रिकीच्या तृतीय वर्षात शिकत होती. भक्ती पिंपळे ही 'एसजीजीएस' अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेतील 'कृष्णा' मुलींचे वसतिगृहातील ३०७ क्रमांकाच्या खोलीत वास्तव्यास होती. भक्ती पिंपळे ही ८ डिसेंबर रोजी सकाळी तिच्या खोलीतील अन्य साथीदार विद्यार्थिनी नसल्याची संधी साधून खोलीतील छताच्या पंख्याला नायलॉनचे दोरीने गळफास घेवून आपली जीवनयात्रा संपविल्याचे वृत्त आहे.याकालवधीत नातेवाईकानी फोन केले पण फोन उचलत नसल्याने त्यांनी खोलीत राहणाऱ्या दुसऱ्या मुलीना फोन लाउन विचारपुस केली. तसेच वस्तीगृहाच्या संबंधित अधिकारी यांनी सदरील घटना लक्षात येताच फोनवरून सदरील घटनेची माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना दिली. प्रस्तुत माहिती समजताच पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, बीट पोलीस अंमलदार माधव गवळी व पो.कॉ. किशोर इंगळे घटनास्थळी पोहोचले. त्याचवेळी, सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना खोलीचे दार आतून बंद असल्याची बाब निदर्शनास आली. त्याचक्षणी, पोलिसांनी खोलीचे दार तोडून आत पाहिले असता, भक्ती पिंपळे ही पंख्यास दोरीने गळफास घेवून लोंबकळत असल्याचे चित्र पोलिसांना आढळून आले. दरम्यान, सहायक पो. नि. सचिन गढवे तसेच बीट पोलीस अंमलदार माधवराव गवळी यांनी पंख्याला लोंबकळत असलेल्या कु. भक्ती पिंपळे हिस अधिक उपचारासाठी विष्णूपुरी येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी करून दुपारी सव्वाबारा वाजेदरम्यान भक्ती शरद पिंपळे हिचा रूग्णालयात येण्यापूर्वी मृत्यू झाला असल्याचे घोषित केले, अशी माहिती बीट अंमलदार गवळी यांनी दिली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण ठाण्यात तूर्तास आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली असून, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड हे याप्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत, अशी माहिती सहायक पो.नि. सचिन गढवे यांनी दिली.

संचालक डॉ मनेश कोकरे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन सदरील घटनेविषयी माहिती तरुण भारतसी देताना संस्थेचे संचालक डॉ. मनेष कोकरे यांनी अशी दिली की, सदरील मुलीचे वडील गेल्या पाच वर्षांपूर्वी आत्महत्या करून मृत्यू पावले होते. त्यामुळे घटनेचे परिणाम डोक्यावर असल्यामुळे सदरील मुलगी कोणाशी बोलत नव्हती किंवा गप्प अशी असायची तिचा कोणाशीही जास्त दोस्ताना नव्हता व तिच्या नातेवाईकांनीही अशा प्रकारची माहिती यापूर्वीच आम्हाला कळवली होती असल्याची माहिती त्यांनी दिली. अशा घटना घडणे दुर्दैवी असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना असे आवाहन केले की कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक, शारीरिक अशी कुठलीही समस्या असल्यास पालकांनी किंवा विद्यार्थ्यांनी येऊन संस्था प्रशासनास प्रमाणिकपणे कळवल्यास आम्ही त्यांना शंभर टक्के मदत करण्याचा प्रयत्न करू. पण विद्यार्थ्यांनी असे टोकाचे निर्णय निर्णय घेऊ नये असे आवाहन संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी यावेळी केले.

# विष्णुपुरी शासकीय रुग्णालय झाले चकाचक





**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

अस्वच्छतेमुळे चर्चेत असलेले विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालय सध्या स्थितीत मात्र चकाचक झाल्याचे दिसून येत आहे. शासकीय रुग्णालयाचे स्वच्छतेचे कंत्राट एका खाजगी कंपनीला देण्यात आले असून १०० कामगारांच्या माध्यमातून दररोज शासकीय रुग्णालय व परिसराची साफसफाई करण्यात येत आहे.

जवळपास वर्षभरापूर्वी मृत्यूसत्रामुळे विष्णुपुरी शासकीय रुग्णालय राज्यभर चर्चेत आले होते. यावेळी संतप्त झालेल्या तत्कालीन खासदार हेमंत पाटील यांनी रुग्णालयाचे अधिष्ठाता यांना शौचालय साफ करायला लावले होते. या प्रकारामुळे राज्यभर शासकीय रुग्णालयातील अस्वच्छतेची चर्चा सुरू होती. दरम्यान मागील काही दिवसापासून रुग्णालयात मोठ्या प्रमाणात स्वच्छता करण्यात येत असून पुणे येथील स्मार्ट सर्विसेस या कंपनीला दिनांक १८ नोव्हेंबर पासून शासकीय रुग्णालयाचे स्वच्छतेचे कंत्राट दिले आहे. या कंपनीचे १०० कामगार दररोज रुग्णालय व परिसराची साफसफाई करत असून विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात आता चकाचक झाल्याचे दिसून येत आहे.

## संक्षिप्त वृत्त



**देगलूर-महाविद्यालयाचे प्रा. शेरीकर सर यांची उपप्राचार्य पदी निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक तथा संस्थेचे उपाध्यक्ष वाय. आर.गजभारे सर यांच्या मार्गदर्शनाने सावित्रीबाई फुले प्रा. व मा. विद्यालयच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी पाळेकर सर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पाटील सर, संस्थेचे कार्यकारी सदस्य कंधारकर सर, बोरगावकर सर तसेच आदी उपस्थितीत होते.**

### घुंगराळा खंडोबा यात्रेतील कुस्ती स्पर्धेत विजय शिंदे यशस्वी ठरला



**नायगाव**-नायगाव येथील खंडोबा यात्रेतील विशेष आकर्षण असलेल्या भव्य कुस्ती स्पर्धेत वाशिमचा पहिलवान विजय शिंदे याने दिल्लीच्या मनीष कुमार याला असमान दाखवत कै.माधवराव.सुगांवे यांच्या स्मरणार्थ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगांवे यांच्या तर्फे ठेवलेले खंडोबा केसरी २१,१११ रुपयांचे बक्षिस पटकावले आहे. म्हाळसाकांत यात्रे निमित्त आयोजित सदर कुस्ती स्पर्धेत हरियाणा, पंजाब, दिल्ली, यवतमाळ, वाशीम, कोल्हापूर, सातारा या सह नांदेड जिल्ह्यातील विविध ठिकाणचे अनेक मल्ल कुस्ती खेळण्यासाठी आले होते.स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सरकारच्या आयुष विभागाचे संचालक तथा घुंगराळ्याचे भूमिपुत्र डॉ.रामन यलपलवाड व कुंटूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामकृष्ण पाटील, गटविकास अधिकारी वांजे, महिला व बालकल्याण समितीचे सदस्य किशोर नावंदे,अभियंता जाधव साहेब आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.दुपारी कुस्ती स्पर्धेस प्रारंभ करण्यात आला.या कुस्ती स्पर्धेत अंदाजे २०० ते २५० लहान ते मोठ्या वयोगटातील कुस्त्या लावण्यात आल्या.रात्री ९ वाजेपर्यंत सदर कुस्त्यांचा डाव सुरूच होता.कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी ५ ते १० हजार कुस्ती शौकीनांची उपस्थिती होती.या कुस्ती स्पर्धेला नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप साहेब यांनी भेट देऊन तास भर कुस्ती स्पर्धा पाहण्याचा आनंद घेतला व मल्लांशी चर्चा करून आनंद व्यक्त केला. कुस्ती स्पर्धेचे बक्षीस वितरणाचे कामकाज माजी विस्तार अधिकारी बालाजीराव मातावाड, ग्रामविकास अधिकारी सूर्यकांत बोंडले, शिवाजी पा.ढगे, श्यामराव यमलवाड यांनी पाहिले.या वेळी ज्येष्ठ नागरिक केरबा पा.सुगावे, संभाजीराव तुरटवाड, ग्रामविकास अधिकारी हणमंतराव शिंदे, माजी विस्तार अधिकारी दंडेवाड साहेब, मारोतराव कंचलवाड, बालाजीराव हाळदेवाड, शंकर मामा यलपलवाड, मा.उपसरपंच शेषेराव पा. ढगे, ग्रा.पं.सदस्य प्रतिनिधी व्यंकटराव कंचलवाड, माधवराव पा. ढगे, प्रल्हादराव पा. ढगे, साईनाथ पा. सुगावे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष माधव पा. ढगे, ग्रा. पं. सदस्य गंगाधर सूर्यवंशी, व्यंकटराव कंचलवाड, गोविंदराव पा. शिंदे, विठ्ठलराव माधवराव यमलवाड, तंटामुक्ती अध्यक्ष श्याम पा.ढगे, प्रल्हाद बोधनकर, अच्युतराव पांचाळ, श्रीराम पा. सुगावे, माजी ग्रामपंचायत सदस्य गंगाधर पा. ढगे, ग्रा. पं. सदस्य गंगाराम सूर्यवंशी, गंगाधर पा.सुगावे, बालाजी पा. ढगे, ग्रा.पं.सदस्य बंटी यलपलवाड, विलास पा. सुगावे, ग्रा.पं.सदस्य प्रतिनिधी रोहिदास पा. ढगे, मा. ग्रा.पं. सदस्य प्रतिनिधी मुरहारी तुरटवाड, राम पा. सुगावे, मा.ग्रा.पं. सदस्य प्रतिनिधी गंगाधर पांचाळ, सूरज पा. सुगावे, साईनाथ पा.सुगावे, माधवराव जलदेवार, शंकर यमलवाड, राजेश पा. ढगे, विलास पा.ढगे, प्रदीप पा.सुगावे, शंतनू पा. ढगे, योगेश पा.ढगे, उमेश पा.कदम आदींनी कुस्ती स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले

# माजी आमदार हंबर्डे यांच्या प्रवेशाने राष्ट्रवादीची ताकद वाढणार :खावेद नवाज



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार, मुख्यमंत्री यांच्या महाराष्ट्रात सर्वात जास्त चांगले स्ट्राईक रेट ४१ आमदार निवडून आले व नांदेड येथील माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे राष्ट्रवादीचे आमदार झाल्याने जिल्ह्यात अनेक माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, माजी नगरसेवक हे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीत प्रवेश करून येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत निवडणूक जिंकण्यासाठी कॉंग्रेसचे माजी आमदार म्हणून मोहन अण्णा हंबर्डे व अनेक माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य घेऊन राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याने राष्ट्रवादीची ताकद वाढणार असल्याचे नांदेड शहर जिल्हा अल्पसंख्याकचे जिल्हाध्यक्ष खालेद नवाज यांनी सांगितले.

# रायझिंग स्टार इंटरनॅशनल स्कूल मध्ये शिक्षक पालक सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

गंगाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था हिमायतनगर द्वारा संचलित कासराळी येथील रायझिंग स्टार इंटरनॅशनल स्कूल दि.०८ डिसेंबर रोजी रविवारी पालक सभा संपन्न झाली.नव्याने सुरू झालेल्या या शाळेमध्ये पहिल्याच वर्षी पहिल्या पालक सभेमध्ये अनेक पालकांनी लक्षणीय उपस्थिती नोंदवली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.एम पी पाटील साईबाबा ज्युनिअर कॉलेज शंकर नगर यांनी भूषवले व पालकांना मार्गदर्शन केले. तसेच पालक प्रतिनिधी म्हणून सचिन सुभानकर सर, महिला पालक प्रतिनिधी म्हणून भाग्यश्री कर्वेडकर, सिमा अजिमोद्दीन शहा, गोपाल हरडपकर, तसेच पोलीस पाटील माधव ठक्करवाड, शाळेच्या मुख्याध्यापिकाअश्विनी हरडपकर, शाळेचे समन्वयक विठ्ठल कामनासे सर व सर्व शिक्षक व शिक्षिका या कार्यक्रमास उपस्थित होते.

# धर्माबाद येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## गुन्हा दाखल करताच अवघ्या एका तासात आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ०९ डिसेंबर**

धर्माबाद तालुक्यातील एका गावामध्ये बारा वर्षीय मुलीवर एका नराधामाने विनयभंग केल्याची घटना घडली होती, सदर घटनेबाबत पिडीतेच्या आईने धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करताच अवघ्या एका तासाच्या आत धर्माबाद पोलिसांनी सदर आरोपीला म्हैसा येथून अटक केली आहे.

याबाबत सविस्तर वृतांत असे की दि. ४ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५:५० च्या सुमारास धर्माबाद तालुक्यातील एका गावामध्ये १२ वर्षीय चिमुकली ही खेळत असताना आरोपीने स्वत:जवळ बोलवून तिचा विनयभंग केला होता. सदरची घटना ही त्या चिमुकलीने आपल्या आईला सांगितले असता तिच्या आईने धर्माबाद पोलीस ठाण्यात येवून पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांना घडलेला वृत्तांत सांगत न्याय देण्याची विनंती केली होती, घडलेली घटनेचे गांभीर्य ओळखून लगेचच पोलीस निरीक्षक यांनी पोलीस अधीक्षक यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली सूत्रे हलवत आरोपीचा भ्रमणध्वनी नंबर नेमका कुठे चालू आहे का? याची चाचणी केली होती. गुन्हा दाखल होताच अवघ्या एका तासाच्या आत आरोपीला गजाआड केले होते. पिडीतेच्याआईने दिलेल्या तक्रारीनुसार धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीस न्यायलयिन कोठडी सुनावण्यात आली आहे. ही कारवाई पोनि रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस हवालदार कुमरे व सचिन गडपवार यांनी पार पाडली.

# मुदखेडमध्ये EVM विरोधात कॉंग्रेसची स्वाक्षरी मोहीम

## लोकशाही वाचविण्यासाठी 'मत पत्रिके'ची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०९ डिसेंबर**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने राज्यात लोकशाही वाचविण्यासाठी एतच् हटाओ स्वाक्षरी मोहिम राबविली जात असून याच धर्तीवर मुदखेड तालुक्यात एतच् हटविण्यासाठी ५० हजार स्वाक्षरीचा संकल्प कॉंग्रेस कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. या मोहिमेची सुरवात मुदखेड तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने दि.०८ डिसेंबर रोजी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातून करण्यात आली आहे.लोकसभा निवडणूक असो की, महाराष्ट्र तथा हरियाणा विधानसभा निवडणुक असो यांच्या निकालात झालेला संख्यात्मक गोंधळ आणि निवडणूक आयोगाकडून न मिळणारी समाधानकारक उत्तरे यामुळे देशात एतच् विरोधात मोठा रोष व्यक्त होत आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते तथा कॉंग्रेस खा राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने महाराष्ट्रात एतच् हटाओ स्वाक्षरी मोहिम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आ अमित देशमुख यांच्या आदेशाने प्रत्येक जिल्ह्यात एतच् विरोधात स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यात मुदखेड तालुका व शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने 'एतच् हटाओ देश बचाओ' स्वाक्षरी मोहिमेचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात करण्यात आले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष बी आर कदम, कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, तिरुपती पाटील कोंडेकर, भगवानराव मनूरकर, माधवराव पवळे, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, कार्याध्यक्ष मोहम्मद गौस, मुजिब पठाण, संदीपकुमार देशमुख, माधव हामंद, साहेबराव गोरखवाड, सुरेश सूर्यवंशी, आकाश सोनटक्के, संजय बोकेफोड, दादाराव पाटील, बळवंत पाटील, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, यशवंत रानखांबे, अब्दुल रजाक, भगवान पवार, राजेश पवार, रमेश बोडके, अविनाश हटकर, बालाजी गुळेवाड, प्रशांत पाटील, शिवाजी वडजे, युसूफ भाई, अश्फाक मौली, मोईन फुलवाले अनिल कल्याणे आदी उपस्थित होते.

### ५० हजार स्वाक्षरीचा निर्धार

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ कलम ६१ मध्ये अनुल्लेखित आहे की, देशातील मतदान हे मत पत्रिकेवरच घेतले जाईल. तर नव्याने १९८९ मध्ये त्यात करण्यात आलेल्या सुधारणे नुसार एका किंवा काही मतदारसंघातील विशिष्ट परिस्थिती पाहूनच EVM² चा वापर केला जाऊ शकतो असा कायदा असतांना कुठलेही ठोस कारण नसताना देशात सरसगट एतच् चा वापर करणे बेकायदेशीर असून लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मधील कलम ६१ ची देशात पायमल्ली चालू आहे अशी प्रतिक्रिया प्रा संदीपकुमार देशमुख यांनी दिली.

# भव्य हिंदू न्याय यात्रा व आक्रोश मोर्चाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

बांगलादेश येथे होत असलेल्या हिंदूंच्या अनन्वित आणि अमानुष अत्याचारांविरोधात नांदेड येथे उद्या दिनांक १० डिसेंबर २०१४ रोजी भव्य हिंदू न्याय यात्रा व आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

१० डिसेंबर हा जागतिक मानवाधिकार दिवस जागतिक मानवाधिकार परिषदेने हिंदूंवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची कधीच दखल घेतली नाही. बांगलादेशात हिंदूंवर व अन्य अल्पसंख्य समुदायावर अनन्वित अत्याचार होत आहेत. संयुक्त राष्ट्र व मानवाधिकार परिषद यावर सोयीस्कररित्या दुर्लक्ष करीत आहे .बांगलादेशात हिंदू संत, मंदिर, हिंदू संस्था असुरक्षित असून दररोज हल्ले होत आहेत .भारत सरकार जागतिक पातळीवर बांगलादेशी हिंदूंच्या रक्षणासाठी प्रयत्न करत आहे. हिंदू बांधवांवर जगात कुठेही अन्याय होत असेल तर त्याचा हिंदू समाजाकडून तीव्र निषेध आणि विरोध होणे व हा संदेश संपूर्ण जगात जाणे आवश्यक आहे. हिंदू समाज हा भारतात बहुसंख्य असला तरी जागतिक पातळीवर अल्पसंख्य आहे यासाठी संयुक्त राष्ट्राने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होत असलेल्या अत्याचारा विरोधात सर्वांनी एकत्र येऊन याचा निषेध करणे आवश्यक आहे. त्याकरिता उद्या दिनांक १० डिसेंबर, मंगळवार रोजी नांदेड येथे जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा सकल हिंदू समाजातर्फे भव्य मोर्चा आयोजित करण्यात आलेला असून त्यात संत महंतांची उपस्थिती देखील असणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा येऊन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले जाईल व मोर्चाची समाप्ती होईल. या मोर्चात अधिकधिक संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे.

# येवती येथील विद्यालयाचे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात यश



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ डिसेंबर**

नुकत्याच पार पडलेल्या हुतात्मा माधव विद्यालय येथे ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्री.शिवाजी माध्यमिक विद्यालय येवती या विद्यालयाचा माध्यमिक गटात चि.बोमनाळे शिवम पांडुरंग या विद्यार्थ्याने विज्ञान विषयाचे शिक्षक श्री.तळेगावे एस.जी.यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या 'सोलार मळणी यंत्र' या प्रयोगास 'तृतीय पारितोषिक' प्राप्त झाले आहे. इंधनाच्या ज्वलनातून होणाऱ्या प्रदूषणावर एक उपाय म्हणून या प्रयोगाकडे पाहता येते. तर अध्यापक निर्मित शैक्षणिक साहित्य या प्रकारात प्राथमिक गटातून सहशिक्षक तळेगावेसंतोष गणपतराव यांच्या टाकाऊ वस्तूंपासून शैक्षणिक साहित्याची निर्मिती या साहित्यास 'प्रथम पारितोषिक' प्राप्त झाले आहे. सदरील प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सुभेदार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मारोती कंतेवाड, तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

# भक्तांच्या अलोट गर्दीत जागृत खंडोबा देवांचा नरसीत पालखी सोहळा

## भक्तांच्या व वारु -वाघे यांच्या यळकोट यळकोट जय मल्हार शिवानंदाचा येळकोट येळकोट घे या जय घोषाने नरसी नगरी भक्तीत न्हाऊन गेली!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०९ डिसेंबर**

नरसी येथील भंडारा डोंगरावरील लाखो अनुयायांचे आराध्य दैवत व परिसरातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान जाज्वल्य तिर्थक्षेत्र जागृत खंडोबा देवाचा रविवारी नरसी परिसरातील हजारो भाविक भक्तांच्या अलोट गर्दीत, श्री क्षेत्र खंडोबा देवाचा सविसावा वार्षिक महोत्सवाचा पालखी सोहळा संपन्न मागील गेल्या काही चाळीस वर्षा पूर्वी पासून तालुक्यातील नरसीतील भंडारा डोंगर माथ्यावरील हजारो भाविक भक्तां च्या नवसाला पावण होणारे येथील तिर्थक्षेत्र म्हणून कमी कालावधीत नरसीत नावारूपास आलेले जाज्वल्य जागृत दैदिप्यमान श्री.क्षेत्र खंडोबा मंदिर असू.त्यामुळे येथील तिर्थ क्षेत्राची ख्याती सर्व दुर पर्यंत पसरली आहे. येथील तिर्थक्षेत्राच्या स्थळी गेल्या काही वर्षापासून हजारो भाविक भक्तांनी मनोभावे पूजापाठ, अभिषेक करण्यासाठी भक्तांच्या संख्येत खुप मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. येथे येत असलेल्या भक्ताच्या संख्येच प्रमाण लक्षात घेऊन. मंदिर कमिटीतील संचालक मंडळ व अध्यक्ष माधवराव मेकॉले यांनी याठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी ऊन, वारा पाऊस सुरक्षित राहावे यासाठी येथे विज, पाणी व सभागृह या सारख्या भौतिक सुविधेची उपलब्धता करून देण्यात आली. नरसी सह परिसरातील भाविक भक्तांच्या वतीने दर रविवारी येथे अन्नदानाच्या रुपाने मोठ्या प्रमाणात भंडारे देखील केल्या जातात. गेल्या अनेक वर्षापासून मंदिर कमिटी च्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून प्रति वर्षातील मार्गशिर्ष शुध्द सप्तमी शके १९४६ या शुभ मुहूर्तावर वार्षिक महोत्सव पालखी सोहळ्याची परंपरेला सुरुवात केली आहे.



त्या अनुषंगाने या वर्षातील मार्गशिर्ष शुध्द सप्तमी शके १९४६ दि.०८ डिसेंबर २४ रोज रविवार दुपार नंतर पुजारी पांडुरंग गणपती महाराज पाटे मल्हार नगरातील निवासस्था ना पासून सरपंच,पोलिस पाटील. इब्राहिम बेग पटेल, मंदिर कमिटीतील सर्व सन्माननीय सदस्य व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती व नरसी सह परिसरातील हजारो भाविक भक्त वारु -वाघे यांच्या उपस्थितीमध्ये श्री खंडोबा देवाची सविसाव्या वार्षिक महोत्सवाच्या पालखी सोहळ्याला सुरुवात करण्या त आली. तद्नंतर या पालखी सोहळ्या वेळी हजारो भाविक भक्तांनी वारु -वाघे बेल भंडार्याची उधळण करीत पालखी सोहळा नरसीतील मुख्यचौकाला वळसा घालीत हीभंडारा डोंगरावरील मंदिरा प्रस्थान केली असता.भक्त मंडळीच्या यळकोट यळकोट जयमल्हार शिवानंदाचा येळकोट येळ- कोट घे या जय घोषाने नरसी नगरी भक्ती रसात न्हाऊन गेली होती.व पालखी भंडारा डोंगरावरील मंदिरा मध्ये पोह चल्यानंतर पांडुरंग गणपती महाराज पाटे यांच्या वेदोच्या रात श्री खंडोबा देवाचा अभिषेक करून महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. त्या नंतर रात्री आठ ते पहाटे पाच या वेळेपर्यंत नरसी सह परिसरा तील हजारो भाविक भक्त मंडळी व मंदिर कमिटी तील सर्वच सन्मानिय संचालक मंडळाच्या उपस्थितीत मंदिरच्या भव्य प्रांगणात केशव महाराज माने शिनगारवाडीकर, नांदेड जिल्हयातील सर्व वाघे मंडळाचा जागरणाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वर्षातील सविसाव्या वार्षिक महोत्सवाचा पालखी सोहळा यशस्वी पणे पार पाडण्यासाठी गेल्या काही दिवसां पासून नरसी सर्कलचे माजी जि.प सदस्य माणिक लोहगांवे, नरसी नगरीचे माजी.सरपंच व्यंकट कोकणे, गांव स्तरावरील तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष गंगाधर वडगावे,बाबाराव पाटे, पांडुरंग गुणाजी महाराज पाटे, व्यंकटी महाराज पाटे माधव वडजे व मंदिर कमिटीचे अध्यक्ष माधवराव मेकॉले,मारोती मांजरमे,मंदिर कमिटीचे सदस्य संग्राम मुगांवे, सदस्य पांडुरंग बागडे, दत्ता गागलेगावे, सदस्य हाणमंत मिसे, सदस्य शिवाजी नारे, ग्रामपंचायत सदस्य श्यामसुंदर कोकणे, गोविंदराव टोकलवाड, नागनाथ कोकणे, विठ्ठलराव कोकणे, माधव तुप्पेकर, प्रकाश तुप्पेकर, गोविंदराव तुप्पेकर, आदिनी मंडळी अथक परिश्रम घेऊन पालखी सोहळा यशस्वी केला आहे. भंडारा डोंगरावरील जागृत जाज्वल्य खंडोबा देवाचा पालखी सोहळा नरसीतील मुख्यचौकाला वळसा घालतांना चा हा क्षण आहे.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बांगलादेश हिंदू अत्याचार प्रकरणी आज निलंगा बंद

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

बांग्लादेशातील हिंदू समाजावर सातत्याने होणारे अन्याय अत्याचार, महिलावर बलात्कार, साधु संतांचा अमानुष छळ या सारखा घटनांच्या निषेधार्थ निलंगा येथील सकल हिंदूसमाजाच्या वतीने मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी निलंगा बंद व धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

बांगलादेशातील हिंदू समाजावर सातत्याने होणारे अन्याय अत्याचार, महिलावर बलात्कार साधु संतांचा अमानुष छळ या सारखा घटना त्वरीत थांबाव्यात यासाठी सदरील घटनांच्या निषेधार्थ संपुर्ण देशभरात अतिशय तीव्र संताप व्यक्त केला जात असुन, त्याचे पडसाद महागाष्ट्रातील गाव खेडयातील हिंदु समाजात उमटत आहेत. या




सर्व बाबींची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जावी म्हणुन मिलंगा येथे सकल हिंदू समाजाच्याः वतीने दि.१० डिसेंबर मंगळवार रोजी निलंगा बंद व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

याबाबत येथील तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनावर सकल हिंदू समाजाच्या शेकडो जनतेच्या स्वाक्षऱ्या आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### शिवाजी महाविद्यालयाची पल्लवी तेलंगे हिची विद्यापीठ योगा संघात निवड

**लातूर, दि.९ डिसेंबर -**

कलिंगा इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रीयल टेकनॉलॉजी (किट) भुवनेश्वर (ओडिशा) येथे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन (महिला) स्पर्धेसाठी येथील शिवाजी महाविद्यालय उदगीरच्या तेलंगे पल्लवी राजकुमार (एम.कॉम. व्दितीय वर्ष) हिची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या योगासन संघात उत्कृष्ट कौशल्याच्या आधारावर संघात निवड झाली आहे. खेळाडूच्या या यशाबद्दल खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहित करणारे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उपाध्यक्ष माधवराव पाटील, सचिव पांडुरंग शिंदे, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, व इतर कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.जी.जी. सूर्यवंशी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले. खेळाडूला कीडा विभाग प्रमुख प्रा. नेहाल अहेमद, प्रा. गजानन माने यांनी तंत्रशुध्द पद्धतीचे मार्गदर्शन केले.

### दत्त जयंतीनिमित्ताने दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**लातूर, दि.९ डिसेंबर -**

लातूर येथील भक्तांचे जागृत देवस्थान असलेले सदानंद दत्त मठ औसा रोड येथील मंदिर समितीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वेळी दत्त जयंती निमित्ताने भव्य दिव्य



अखंड हरिनाम सप्ताह, गुरुचरित्र, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात राज्यातील मान्यवर किर्तनकरांची मेजवानी तसेच लातूरकरांना मिळणार आहे. तसेच संगीत दरबाराचे आयोजन करण्यात आले असून दत्त जयंती निमित्ताने दत्त जयंती महोत्सव दि.१ ते १७ डिसेंबरपर्यंत दत्त मंदिर येथे आयोजीत करण्यात आला आहे. या सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सदानंद दत्त मठ विश्वस्त मंडळ लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. १० डिसेंबर पासून दत्त जयंती महोत्सवाला प्रारंभ भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दत्त मंदिरात दत्त जयंती निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून महाप्रसाद होईल रात्री ८.३० ते १०.३० पर्यन्त भजन किर्तन प्रवचन होईल.

# भाजपा औसेकरांचा लाल दिव्याचा दुष्काळ संपविणार ?

## ६२ वर्षापासून प्रतिक्षा; आश्वासन पुर्ण करण्याची नेतेमंडळींना संधी...

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**लातूर, दि.९ डिसेंबर -**

सलग दोन विधानसभेच्या निवडणुकीत प्रचारासाठी आलेल्या भाजपाच्या नेतेमंडळीनी तुम्ही विजयी करा. आम्ही तुमची लाल



दिव्याची अपेक्षा पुर्ण करु असे आश्वासन दिले होते. भाजपाच्या नेतेमंडळीवर विश्वास ठेवून सलग ६२ वर्षाची प्रतिक्षा तरी संपेल अशा अपेक्षेने मतदारांनी एकापेक्षा एक अशा सरस विक्रमी मतांनी निवडून दिले.यावेळी राज्यात महायुतीचे निर्विवाद बहुमत आल्याने दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याची संधी चालून आली असून कोणते खाते मिळणार याकडे औसेकरांचे लक्ष लागले आहे.

माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांच्या माध्यमातून औशाला मंत्रीपदाची संधी मिळेल आणि विकासकामांना अधिकाधिक गती मिळून मतदारसंघाची वेगळी ओळख निर्माण होईल. अशा अपेक्षेने सलग दोन वेळा संधी दिली.

या काळात त्यांनी तालुक्याची जुनी ओळख पुसून विकासाच्या नव्या उंचीवर नेवून ठेवले. परंतू मतदारसंघाला जे हवे होते तेच पक्षातील नेतेमंडळीनी औसेकरांना दिले नाही.

यामुळे विकासरुपी ओळख असूनही २०१९ च्या निवडणुकीत मतदारांनी डावलून आ. अभिमन्यू पवार यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालिन केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंग यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून २७ हजार मतांनी विजयी केले. मात्र भाजपा व शिवसेनेच्या युतीमध्ये दरार आल्याने राज्यातील सत्तेची सुत्रे आघाडीकडे गेली. आणि अडीच वर्षानी पुन्हा आघाडीत बिघाडी होवून महायुतीकडे अडीच वर्षासाठी राज्याची सत्ता आली. या पाच वर्षात झालेल्या राजकीय घडामोडीमुळे औशाला मिळणारी संधी गेली.तर या निवडणुकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची एकमेव प्रचारसभा झाली. या सभेस मतदारांनी भरभरुन



प्रतिसाद दिला. मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहून औसेकर जे कांही मागतील ते देणारच.

त्यापेक्षा अधिक देणार असा शब्द उपस्थितांना दिला होता. केंद्रीयमंत्री गडकरी जे बोलतात ते करतात.

अशी त्यांची ओळख औसेकरांना आहे. आता महायुतीचे सरकारही राज्यात आले आणि आ. अभिमन्यू पवार दुसऱ्यांदा विजयी झाल्यामुळे मतदारसंघाचे स्वप्न साकार होणार असल्याचा विश्वास मतदारसंघात दिसून येत आहे. या पाच वर्षाच्या काळात जिल्हाअंतर्गत वादळी झालेले पक्षीय राजकारण जसे मतदारापर्यंत पोहंचले आहे. तेवढेच भाजपाच्या नेतेमंडळीपर्यंत पोहंचले आहे.

याचप्रमाणे यापुर्वीच्या व नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीतील पक्षाअंतर्गत झालेल्या कुरघोड्यानंतरही औसा मतदारसंघातील मतदारांनी उघड्या डोळ्यांनी पाहून मुंबई, दिल्लीकडे पाठवित भाजपाच्या नेतेमंडळीवर विश्वास ठेवून सलग दुसऱ्यांदा आणि पहिल्या निवडणुकीतील मतापेक्षा अधिक मतांची आघाडी देऊन विजयी केले. याचा नेतेमंडळी पुर्णपणे विचार करतील. असा लातूर जिल्ह्यातील राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

भाजपातील नेतेमंडळीच्या आश्वासनावर विश्वास ठेवून औसेकरांनी उत्स्फुर्तपणाने यावेळीही दाद दिली आहे. यामुळे औसा मतदारसंघातील मतदारांमध्ये लाल दिव्याचा दुष्काळ संपणार असल्याचा विश्वास दिसून येत आहे.

### ६२ वर्षानंतर औसेकरांना संधी...

राज्याच्या पहिल्या मंत्रीमंडळात आशिव येथील डॉ. देविसिंग चौहान



यांना संधी मिळाली होती. यानंतर झालेल्या निवडणुकीत मतदारांनी सत्तेच्या विरोधात कौल देत संधी घालवली खरी मात्र यामागे जिल्ह्यातून औशात होणारे राजकारण कारणीभुत ठरले. उर्वरीत काळात सत्ता आली पण मित्रपक्षाचे सरकार आल्याने जागावाटपात कमी जागा आल्याने संधी गेली. या निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकुन वर्चस्व मिळवले आहे. यामुळे ६२ वर्षानंतर आ. अभिमन्यू पवार यांच्या माध्यमातून पहिली संधी मिळली आहे. नेतेमंडळीनी या मिळालेल्या संधीचे मंत्रीपद देऊन सोने केले तरच औसेकरांचा आश्वासनासनावरील विश्वास कायम टिकणार आहे.

## अवैध धंद्यावर पोलीसांची कारवाई; ५० लाखांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ डिसेंबर -**

लातूर स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यावर कारवाई केली असून जवळपास ५० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथके तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मटका, देशी-विदेशी दारू, हातभट्टी व वाळू यांची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्यावर कारवाई करत एकूण ११ गुन्हे दाखल केले असून मटका, दारू, हातभट्टी व वाळू तसेच गुन्ह्यात वापरलेल्या वाहनासह ५० लाख ६८ हजार ३२० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अवैध धंदे करणाऱ्या एकूण १२ लोकाविरुद्ध कार्यवाही करण्यात आली असून वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या पोलीस पथकांनी केली आहे.

## लातूर जिल्ह्यातील खंडोबा यात्रेत बारा बैल गाड्या एकहाती ओढण्याचा थरार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ डिसेंबर -**

लातूर जिल्ह्यातील सेलू जवळील जवळगा गावात भरत असलेल्या खंडोबा यात्रेला राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावतात. या यात्रेची वैशिष्ट्य म्हणजे एका व्यक्तीकडून बारा बैल गाड्या एकत्र ओढल्या जाण्याचा अनोखा आणि थरारक प्रकार. या आगळ्या-वेगळ्या परंपरेमुळे ही यात्रा चर्चेचा विषय ठरते.

यात्रेत एका मानाच्या व्यक्तीकडून बारा बैल गाड्या ओढल्या जातात. गाड्यांवर लहान मुले, तरुण मंडळी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने बसतात. हा थरारक प्रकार ५०० मीटर अंतरासाठी केला जातो. विशेष म्हणजे, या यात्रेच्या निमित्ताने जवळपासच्या १० ते १५ गावांतील वारूही शोभायात्रेत सहभागी होत असल्याने वातावरणात उत्साह आणतात. तसे पाहता खंडोबा यात्रेचा इतिहास सुमारे १०० वर्षे जुना आहे.

हा सांस्कृतिक सोहळा भाविकांना केवळ धार्मिक अनुभव देत नाही तर परंपरेचा वारसा जपण्याचा संदेशही देतो. गाड्या ओढणाऱ्या व्यक्तीला यात्रा सुरू होण्याआधी खंडोबाच्या देवळात आंघोळ घालून तयार केले जाते. त्यानंतर, मारुती मंदिराभोवती पाच प्रदक्षिणा घालून हा थरारक सोहळा सुरू होतो. याच बोरोबर यात्रेच्या ठिकाणी लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी उपलब्ध असतात. लाकडी घोडे, फुगे, गाड्या यांसारख्या खेळण्यांचे स्टॉल्स मुलांच्या आनंदात भर घालतात. तसेच खंडोबा यात्रेतील बारा बैल गाड्यांचा प्रकार हा या उत्सवाचा प्रमुख आकर्षण आहे. हा सोहळा पाहण्यासाठी भाविक लांबून लांबून येतात, ज्यामुळे यात्रेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

यात्रेच्या दरम्यान गावात मेळावा भरतो, ज्यामध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होतात. आजूबाजूच्या गावांतील लोक यात्रेला येऊन आपले योगदान देतात. आणि तीर्थ व प्रसादाचा लाभ घेतात.

## जखमी मुलीवरील उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा

### एमआयएमची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.९ डिसेंबर -**

गेल्या चार वर्षापासून अनेकवेळा मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करण्याची मागणी करुनही नगरपालिका प्रशासनाने शहरवासियांच्या या मागणीकडे जाणीवपुर्व डोळेझाक केली आहे. या काळात कुत्र्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाल्यामुळे दररोज दोन तीन चावा घेण्याच्या घटना घडत आहेत.तर दोन दिवसापुर्वी मोकाट कत्र्याने कहर करीत तीन वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर हल्ला करुन गंभीर जखमी केले. या जखमी मुलींचे आई वडील गरीब असुन उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा, अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

औसा शहरातील शहरवासियांना गेल्या तीन वर्षापासून मोकाट कुत्र्यांनी चावा घेण्यास सुरुवात केली. या मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करावा, अशी मागणी २०२१ मध्ये एमआयएमच्या वतीने निवेदनाद्वारे पालिकेकडे करण्यात आली होती. याचबरोबर अनेक नागरिकांनी अनेकवेळा मागणी केली. मात्र संबंधित पालिका प्रशासनाने आजपर्यंत टोलवाटोलवी करीत तीन वर्ष घालवले आहेत.



आज या मोकाट कुत्र्यांची संख्या एवढी प्रचंड वाढली आहे. शहरात जिथे मोकाट झुंड फिरत नाही असा असा शहरातील एक प्रभाग दाखवा आणि योग्य बक्षीस मिळवा, असे आवाहन केले तरी एक रुपयांचे बक्षीस देण्याची वेळ येणार नाही. एवढी मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे.य ामुळे महिला, वृध्द व लहान मुलांना याचा फटका बसत आहे. गेल्या तीन वर्षापासून कुत्रे चावल्याच्या घटना सर्वाधिक औसा शहरात घडत असतानाही पालिका प्रशासन गप्प का आहे. शहरात घडत असलेल्या या सर्व घटनांना नगरपालिका प्रशासन जबाबदार आहे. लहान मुलीच्या घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. कुटुंबियाना उपचाराचा खर्च करणे अशक्य आहे.

यापुढे होणाऱ्या अनपेक्षित घटना टाळण्यासाठी मोकाट कुत्र्यांचा नगरपालिकेने तात्काळ बंदोबस्त करावा व लहान मुलीवर होर्णाय़ा उपचाराचा खर्च पालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात यावा, अशी मागणी इनामदार यांनी मुख्यमंत्री व नगरपालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे. अन्यथा टाळे ठोको आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनात दिला आहे.

## उदगीरात आज 'मानवी साखळी' आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

बांगला देशातील हिंदूवरील अन्याय व इस्कॉन मंदिराचे चिन्मय कृष्णदास यांच्या सुटकेसाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून १० डिसेंबर रोजी सकाळी उदगीर शहरातील छत्रपती शाहू महाराज चौक ते उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हातामध्ये फलके घेऊन मानवी साखळीद्वारे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. अशा आशयाचे निवेदन सकल हिंदू समाजाच्या वतीने उदगीर उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बांगला देशातील हिंदू समाजावर होत असलेले हल्ले व इस्कॉनचे धार्मिक नेते चिन्मय कृष्णदास यांनी बांगला देशातील हिंदू समाजाला जागृत करण्यासाठी केलेल्या आव्हानामुळे बांगलादेशाने त्यांना देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक केली. न्यायालयातून सुध्दा त्यांना जामीन मिळला नसून




त्यांच्यासाठी केस लढणाऱ्या वकिलावरही जीव घेणे हल्ला करण्यात आला.

यामुळे तेथील परिस्थिती खूप बिकट असून बांगलादेशाच्या सरकारने चिन्मय कृष्णदास यांना सध्या कोठे ठेवले आहे. ते कोणत्या परिस्थितीत आहेत, याचीही माहिती सरकार देत नाही.

आरक्षणाच्या नावाखाली बांगला देशात सुरु झालेल्या हिंसाचारामागे थेट हिंदूंवर हल्ले होत असून महिलांचे अपरहरण, बलात्कार, कतली केल्या जात आहेत.

मंदिरे उद्वस्त होत आहेत. पूर्णपणे षड्यंत्र करून इस्लामिक राष्ट्र बनवण्याची तयारी आहे. तेथील हिंदू समाज भयभीत झाला असून त्यांना वाचवण्यासाठी व बांगलादेशाच्या सरकारवर दबाव आणण्यासाठी भारत सरकारने लवकरात लवकर ठोस पाऊल उचलावी व युनोमध्ये आवाज उठवावा. यासाठी १० डिसेंबर रोजी मानवी साखळीद्वारे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

## उदगीरच्या दत्त मंदिरात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ डिसेंबर -**

सेवा येथील सर्वोदय सोसायटीमधील श्री दत्त मंदिर संस्थान, श्री सिध्दसिंहासन पीठ, श्रीमद सदगुरू गुंडा महाराज सिध्दरस उदगीरकर भक्त मंडळ उदगीर यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवार दि.८ ते १४ डिसेंबर दरम्यान श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, रविवारपासून या सोहळ्यास प्रारंभ झाला आहे.



या भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात श्री. सदगुरू गुंडा महाराजांचे ७ वे वंशज भागवताचार्य प.पू. चक्रीनाथ महाराज सिध्दरस पंढरपूर यांच्या रसाळ वाणीतून भागवताकथा भक्तांना श्रवण करण्यास मिळत आहे. रविवारी दुपारी २ वाजता गोकर्ण महात्म्य व कथेला प्रारंभ झाला. दि.९ डिसेंबर रोजी शुक उपदेश श्री वराह अवतार व कपील चरित्रावर वाचन, दि. ९ रोजी जडभरत आख्यान व श्री. नृसिंह अवताराचे वाचन, दि.११ रोजी श्री. वामन अवतार, श्रीराम कथा व श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे वाचन, दि.१२ रोजी गोपाळ काला व श्रीगोवर्धन पुजन याचे वाचन, दि.१३ रोजी रुक्मिणी स्वयंवर व सुदामा चरित्राचे वाचन करण्यात येणार आहे. दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता या कथेची समाप्ती होणार असून श्री. दत्त जयंतीचा महोत्सव उत्साहात साजरा होणार आहे.

या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सर्वोदय हाउसिंग सोसायटीचे अध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव श्रीनिवास मालशेटवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे

### उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मुंबई पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, लातूर आयोजित विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी संभाजीनगर येथे १८ दिवसीय निशुल्क निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील युवक, युवती व महिलांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. वरील प्रशिक्षण कार्यक्रम निशुल्क असून सोबत प्रशिक्षण सर्टिफिकेट मिळणार आहे.

## आ. संभाजीराव निलंगेकर यांच्या मंत्रीपदासाठी ग्रामदैवत निळकंठेश्वरास साकडे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.९ डिसेंबर -**

आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांची मंत्री मंडळात वर्णी लागण्यासाठी भाजपा कार्यकर्त्यांनी सोमवार दि.९ डिसेंबर रोजी निळकंठेश्वरास साकडे घालण्यात आले.



लातूर जिल्ह्यात भाजपाला झिरो ते हिरो करणारे, संपूर्ण जिल्हा भाजपमय करत भाजपची एकहाती सत्ता आणणारे नेतृत्व लोकनेते आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांची मंत्रिमंडळात मंत्रीपदी वर्णी लागावी यासाठी निलंगा नगरीचे ग्रामदैवत श्री निळकंठेश्वर महादेव मंदिर येथे भाजप परिवार निलंगा शहरच्या वतीने अभिषेक करून साकडं घालण्यात आले.

यावेळी उपस्थित दगडू सोळुंके, बाळासाहेब शिंगाडे, वीरभद्र स्वामी, संजय हलगरकर, गोविंद शिंगाडे, किशोर जाधव, वैभव पाटील, मनोज कोळे, जयंत देशपांडे, सुमित ईनानी, अविराज पाटील, पिंटू पाटील, रवी फुलारी, आकाश गाडीवान, प्रकाश पटणे, पप्पू तेलंग, भाऊसाहेब जाधव, रमेश कांबळे, प्रकाश नाटकर, पिंटू पांचाळ, भगवान वरवटे, धम्मानंद निंबाळकर, कशीनाथ जाधव, मंचक पांचाळ, नाना आकडे, शरद पेटकर, बालाजी दंडगुले, आशिष अट्टल, सौरभ नाईक, पांडुरंग तोष्णीवाल, गणेश ममाळे, आकाश पेटकर सचिन गायकवाड. निळकंठ पेटकर, संजय पेटकर, परीक्षेत राजमल्ले दत्ता जाधव, कविता तोष्णीवाल, संध्या पाटील, जाधव, मोरे इत्यादी निलंगा शहरातील माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.